# पंचायत राज

## MPSC - PSI - STI - ASO

पुर्व व मुख्य परिक्षांसाठी अत्यंत उपयुक्त

संपादक : मनोहर पाटील

लेखक : नागेंद्र गिरी









Reliable Academy 9222333999

The Reliable Publication, Pune

Reliable Academy 9222333999

UPSC, राज्यसेवा पूर्व परीक्षा, PSI-STI-ASO पूर्व व मुख्य परीक्षा
तसेच इतर स्पर्धा परीक्षांकरिता उपयुक्त

# पंचायत राज

Reliable Academy 9222333999

## वैशिष्ट्ये :-

1) अद्ययावत माहितीवर आधारित.
2) प्रत्येक प्रकरणावर सविस्तर माहिती.
3) संपूर्ण अभ्यासक्रमाच्या आधारावर विश्लेषण .
4) परीक्षाभिमुख मांडणी

श्री. मनोहर एकनाथ पाटील

Reliable Academy
For
MPSC-PSI-STI-ASO

The Reliable Publication, Pune

# पंचायत राज

## UPSC-MPSC-PSI-STI-ASO & Tax Assistant, Excise Inspector

संपादक
श्री. मनोहर एकनाथ पाटील

लेखक
श्री.नागेंद्र गिरी सर
श्री. मनोहर एकनाथ पाटील

प्रकाशक
The Reliable Publication, Pune
कार्यालयीन पत्ता : ५ वा मजला, सी. जे. जोशी कॉम्पलेक्स, वोडाफोन स्टोअरच्या वर, रेल्वे रिझर्व्हेशन सेंटर समोर, कल्याण (प.) ४२१ ३०१
Website : www.reliableacademy.com
Email : thereliableacademy@gmail.com
Facebook : http://www.facebook.com/@reliableacademy
Telegram : @mpscofficers

मुखपृष्ठ : श्री. मनोहर एकनाथ पाटील
अक्षरजुळणी : पुष्पा शंकर गागरे, अमोघ जयंत देसाई
मुद्रणस्थळ : पुणे
मूल्य : १५०/-

द्वितीय आवृत्ती : मार्च २०१८
वितरणासाठी संपर्क : 9222333999

© सर्वाधिकार प्रकाशकाधीन

© All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted, in any form or by any means, without permission. Any person who does any unauthorized act in relation to this publication may be liable to criminal prosecution and civil claims for damages.

Reliable Academy 9222333999

# अनुक्रमणिका


| क्रमांक | प्रकरण | पान क्र. |
|---|---|---|
| १ | पंचायतराज पार्श्वभूमी | १ – १६ |
| २ | ग्रामपंचायत | १७ – २७ |
| ३ | पंचायत समिती | २८ – ३२ |
| ४ | जिल्हापरिषद | ३३ – ४१ |
| ५ | नागरी प्रशासन | ४२ - ४६ |
| ६ | नगरपालिका / नगरपरिषद | ४७ - ५२ |
| ७ | कटक मंडळे | ५३ – ५५ |
| ८ | मुलकी प्रशासन | ५६ – ६१ |
| ९ | पोलीस प्रशासन | ६२ - ६५ |



Reliable Academy 9222333999

# 1. पंचायत राज पार्श्वभुमी

## पंचायती राज व्यवस्था







मद्रास महानगरपालिका | लॉर्ड मेयो | लॉर्ड रिपन

## पार्श्वभूमी

- ब्रिटीश कालखंडामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण होऊन स्थानिक स्वराज्य संस्था जवळपास नष्ट झाल्या. परंतु याच कालखंडामध्ये 1687 ला देशातील पहिली महानगरपालिका मद्रास येथे स्थापन करुन या संस्थांना उजाळा देण्यात आला. 1870 ला लॉर्ड मेयो यांनी आर्थिक विकेंद्रीकरणाचा ठराव मांडला. त्यामुळेच त्यांना आर्थिक विकेंद्रीकरणाचे जनक म्हणतात. 1882 ला लॉर्ड रिपन या गव्हर्नर जनरलने पंचायत राज संबंधी कायदा केला. त्यामुळे त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थेचे जनक म्हणतात.

- भारतामध्ये प्राचीन काळापासून स्थानिक स्वराज्य संस्था अस्तित्वात आहेत. प्राचीनकाळी गावचा कारभार पंचायत मार्फत होत असे. वैदिक काळामध्ये गावचा कारभार ग्रामसभा पाहत असे व अशा ग्रामसभेची निवड जनतेमार्फत केली जात असे. तसेच गावच्या प्रमुखाला ग्रामिणी या नावाने संबोधले जायचे. तसेच रामायण व महाभारतामध्ये गावसभा व जनपद या शब्दांचा उल्लेख आढळतो. बुध्दकालीन जातक कथामध्ये भारतातील शिलालेखावरील गाव हे स्वयंशासित होते असा उल्लेख आढळतो. त्याचप्रमाणे कौटिल्याच्या "अर्थशास्त्र" या ग्रंथामध्ये सुध्दा ग्राम प्रशासनाचा स्पष्ट उल्लेख आढळतो. तसेच प्राचीन कालखंडालाच पंचायत राजचे सुवर्ण युग मानले जाते. ग्रीस मधून आलेल्या "मॅगेस्थेनिस" या प्रवाशाने आपल्या प्रवास वर्णनात ग्रामपंचायतीचे सविस्तर वर्णन केले आहे.






## प्राचीन पंचायत राज पार्श्वभूमी

- उत्तर भारतामध्ये ग्राम प्रशासनाची जबाबदारी पंचकुली या पाच सदस्यांवर निर्भर होती.
- डी टॉकविल यांच्या मते, स्थानिक स्वराज्य संस्था म्हणजे लोकशाहीचे पाळण घर होय.
- इंडिका हा ग्रंथ चंद्रगुप्त मौर्य यांच्या कालखंडामध्ये मॅगेस्थेनिस यांनी लिहिला.
- प्राचीन कालखंडामध्ये पंचायतीच्या प्रमुखास 'गोपा' या नावाने संबोधले जाई.
- मॅगेस्थेनिसने आपल्या इंडिका या प्रवास वर्णनामध्ये नगर प्रशासनाचे वर्णन केले आहे.
- कौटिल्याच्या अर्थशास्त्र या ग्रंथामध्ये ग्राम प्रशासनाचा उल्लेख आढळतो.
- बुध्दकालीन जातक कथांमध्ये पंचायतीचा उल्लेख आढळतो.
- प्राचीन कालखंडातील मौय व चोल या राज घराण्याच्या कालखंडामध्ये पंचायत राजाचा उत्कर्ष झाला.
- मनुस्मृती या प्राचीन ग्रंथामध्ये न्यायपंचायतीचा उल्लेख आढळतो.
- महाभारतामध्ये ग्रामसभा या शब्दाचा उल्लेख आढळतो.
- रामायणामध्ये जनपद संघ या शब्दाचा उल्लेख आढळतो.
- वैदिक काळामध्ये गावाच्या प्रमुखास ग्रामिणी या नावाने संबोधले जात होते.
- वेद काळामध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख समिती या नावाने सापडतो.
- प्राचीन कालखंडाला पंचायत राजचा सुवर्ण कालखंड मानला जातो

Reliable Academy





मुगल सम्राट बाबर इब्राहीम लोधी बहादुरशहा जाफर

## मध्ययुगीन पंचायत राज पार्श्वभूमी

- भारतावर पहिले आक्रमण महंमद बीन कासीम यांनी सन 712 ला केले.
- भारतामध्ये सर्वात प्रथम (20 मे 1498) पोर्तुगीज आले सर्वात शेवटी (1961) पोर्तुगीज गेले. इ.स. 1526 ला इब्राहीम लोधी यांचा पराभव करुन मोगल भारतात आले. (पहिला बादशहा–बाबर –1526 ते 1858 बहादुरशहा जफर शेवटचा बादशहा)
- मोगल कालखंडामध्ये पंचायत राज संस्थांना उतरती कळा लागली.
- मोगल कालखंडामध्ये गावातील प्रशासन चालविण्यासाठी कोतवाल, सरपंच व मुखिया या नावाची पदे निर्माण करण्यात आले.
- मोगल कालखंडामध्ये गावातील जनतेकडून कर वसूल करण्यासाठी पटवारी हे पद निर्माण करण्यात आले.
- मोगल कालखंडामध्ये गावस्तरावर न्याय देण्याचे कार्य करण्यासाठी चौधरी नावाचे पद निर्माण करण्यात आले.
- छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कालखंडामध्ये अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून पंचायतींना अधिक सक्षम करण्याचा प्रयत्न करण्यात आला.
- मोगल कालखंडामध्ये शहरी व्यवस्थापणावर अधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले.
- मोगल कालखंडामध्ये जिल्हाधिकारी सारख्या पदाला अमीर किंवा अंमलगुजर या नावाने संबोधले जात होते.




ब्रिटीश पंचायत राज ईस्ट इंडिया कंपनी


## ब्रिटिश पंचायतराज पार्श्वभूमी


- 31 डिसेंबर 1600 ला ईस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून ब्रिटीश भारतात आले.
- 1687 ला देशातील पहिली महानगरपालिका मद्रास येथे स्थापन झाली.
- 1793 ला मुंबई व कोलकाता येथे पहिल्या चार्टर ॲक्ट कायद्यानुसार नगरपालिका निर्माण करण्यात आल्या.
- 1757 ला प्लासीची लढाई झाली व तेव्हापासून ब्रिटिशांचा राजकीय क्षेत्रामध्ये हस्तक्षेप वाढला.
- 14 मे 1772 रोजी वॉरन हेस्टींग्ज यांनी जिल्हाधिकारी हे पद निर्माण केले.
- 1853 ला लॉर्ड डलहौसी यांनी सर्वप्रथम ग्राम प्रशासनासंदर्भात तरतूद केले.
- देशातील पहिली रेल्वे 1853 ला मुंबई ते ठाणे सुरु करण्यात आली.
- ब्रिटिश कालखंडात जिल्हाधिकारी होण्यासाठी ICS परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक होते.
- सुरेंद्रनाथ बॅनर्जी भारतातील पहिले ICS परिक्षा उत्तीर्ण तर सत्येंद्रनाथ टागोर भारतातील पहिले ICS अधिकारी होय.

Reliable Academy 9922233999

## ब्रिटिश पंचायतराज पार्श्वभूमी

- 1857 ला मुंबई विद्यापीठाची स्थापना करण्यात आली.
- 1861 च्या इंडियन कौन्सील ॲक्टनुसार देशातील पहिले उच्च न्यायालय 1862 ला मुंबई, मद्रास, कोलकाता येथे स्थापन करण्यात आले.
- भारतात 1766 साली लॉर्ड क्लाईव्हने फक्त सरकारी कामकाजांकरिता टपाल सेवा सुरु केली.
- 1842 ला बंगाल प्रांतासाठी पहिला म्युनिसीपल कायदा संमत करण्यात आला.
- 1850 ला संपूर्ण भारतासाठी म्युनिसीपल कायदा संमत करण्यात आला.
- 14 डिसेंबर 1870 ला लॉर्ड मेयो यांनी स्थानिक स्वशासनासंबंधी आर्थिक विकेंद्रीकरणाचा ठराव मांडला. (त्यामुळे त्यांना आर्थिक विकेंद्रीकरणाचा जनक म्हणतात)
- 1872 ला लॉर्ड मेयो यांच्या कालखंडामध्ये देशातील पहिली जनगणना करण्यात आली.(जनगणना 10 वर्षे, प्राणीगणना 5 वर्षे, वाघांची गणना 1 वर्षे)
- वेद काळातील ग्रामव्यवस्था स्वयंपूर्ण व एकसंघ होत्या असे उद्गार मेन्टकाफने काढले.
- 18 मे 1882 ला लॉर्ड रिपन यांनी स्थानिक स्वशासनासंबंधी पहिला कायदा केला. (यामुळेच त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांचे जनक म्हणतात)
- 1884 ला मुंबई लोकल बोर्डाची स्थापना करण्यात आली.
- 1888 ला मुंबई महानगरपालिकेची स्थापना करण्यात आली.
- 1892 च्या विधीमंडळ कायद्यानुसार प्रथमच जिल्हा लोकल बोर्ड व इतर संस्थामधून निवडलेल्या सभासदांना काही जागा राखीव ठेवल्या व अप्रत्यक्षपणे निवडणूक तत्त्वाला मान्यता दिली.
- हॉब हाऊस यांच्या अध्यक्षतेखाली 1907 ला रॉयल विकेंद्रीकरण आयोगाची स्थापना करण्यात आली. (प्रत्येक गावाला आधारभूत घटक मानून एक ग्रामपंचायत असावी)
- 1920 च्या मुंबई ग्रामपंचायत अधिनियमानुसार मुंबई प्रांतातील ग्राम पंचायतीना वैधानिक दर्जा प्राप्त झाला.
- 'ली' कमिशनच्या शिफारशींच्या आधारावर 1926 ला सांघिक लोकसेवा आयोगाची स्थापना करण्यात आली.
- 1923 ला शिक्षण खाते स्थानिक स्वशासनाकडे सोपविण्यात आले.
- 1924 ला भारतामध्ये छावणी मंडळाची स्थापना करण्यात आली.
- 1933 ला बॉम्बे व्हीलेज पंचायत ॲक्ट अस्तित्वात आला. (गावातील कारभार स्थानिक प्रशासनामार्फत चालविण्यासाठी)
- 1934 ला स्थानिक स्वशासनामध्ये महिलांचा मार्ग मोकळा करण्यात आला.
- 1937 पासून स्थानिक स्वराज्य संस्थेवर सरकार नियुक्त सभासद नेमणे बंद करण्यात आले.
- 1914 ते 1918 या कालखंडामध्ये पहिले महायुध्द झाले.
- 1939 ते 1945 या कालखंडामध्ये दुसरे महायुध्द झाले.
- जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठी 1945 ला युनोची स्थापना करण्यात आली.
- 15 ऑगस्ट 1947 ला भारताला स्वातंत्र्य मिळाले.
- 1949 ला स्थानिक वित्तीय समितीची स्थापना करण्यात आली.
- 26 जानेवारी 1950 पासून भारतीय राज्यघटनेची अंमलबजावणी सुरु झाली.






## जनसहभागासाठी भारतातील उपक्रम

- रविंद्रनाथ टागोर यांनी 1921 ला श्रीनिकेतन प्रकल्प सुरु केला.
- महात्मा गांधी यांनी 1937 ला सेवाग्राम प्रकल्प सुरु केला.
- मद्रास सरकारतर्फे 1946 ला फिरती विकास योजना तयार करण्यात आली.
- मुंबई सरकारतर्फे 1948 ला सर्वोदय योजना तयार करण्यात आली.
- आचार्य विनोबा भावे यांनी 1951 साली भारतातील आंध्रप्रदेशात भूदान चळवळ सुरु केली.
- अमेरिका या देशामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेस म्युनिसिपल प्रशासन असे म्हणतात.
- फ्रान्समध्ये पंचायतराज संस्थांना स्थानिक प्रशासन असे म्हणतात.
- भारतीय राज्यघटनेमध्ये स्थानिक शासन असा शब्द प्रयोग केला आहे.

Reliable Academy 9222333999



**आचार्य विनोबा भावे**

**यांनी पंचायत राज संस्थेला ग्रामसभा संबोधले**

**राजकुमारी अमृता कौर**

**भारतातील पहिल्या महिती कॅबिनेट मंत्री**



## स्वातंत्र्योत्तर पंचायतराज पार्श्वभूमी

- ग्रामसभेला लोकशाही व्यवस्थेची शेवटची कडी मानले जाते.
- स्थानिक स्वराज्य संस्थेला लोकशाहीचा पाळणा असे म्हटले जाते.
- पंचायत राजचा मुख्य उद्देश सत्तेच्या विकेंद्रीकरणातून ग्रामीण भागाचा विकास करणे हा होय.
- भारतीय राज्यघटनेच्या कलम 40 मध्ये ग्रामपंचायतीचा उल्लेख आढळतो. आणि ग्रामपंचायतीची व्याख्या 243 या कलमात आढळते.
- ग्रामीण भागाच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या पुढाकाराने 2 ऑक्टोबर 1952 ला सामुदायिक विकास प्रकल्प तयार करण्यात आला.
  - ➢ या योजनेला अमेरिका या देशाने अर्थसहाय्य केले.
  - ➢ या योजनेचा उद्देश ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करणे.
  - ➢ या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी गटविकास अधिकारी ;ठक्व्द्व हे पद तालुका स्तरावर निर्माण करण्यात आले.
  - ➢ भारतात 1952 ला लोकसभेच्या पहिल्या निवडणुका पार पडल्या.
- 2 ऑक्टोबर 1953 ला राष्ट्रीय विस्तार योजना तयार करण्यात आली.

1 या योजनेच्या माध्यमातून संपूर्ण देशांमध्ये 55 प्रकल्प राबवविण्यात आले.

2 उद्देश–ग्रामीण भागाचा–आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक विकासातून जनसहभाग वाढविणे.

- या दोन्ही योजना चुकीच्या गृहितकावर आधारित असल्यामुळे व जनसहभाग न मिळाल्यामुळे अपयशी ठरल्या.
- जून 1954 ला केंद्रीय आरोग्यमंत्री राजकुमारी अमृता कौर यांनी भारतातील सर्व ग्रामविकास मंत्र्यांची परिषद सिमला येथे बोलावली.
- सप्टेंबर 1954 ला आचार्य विनोबा भावे यांनी ग्रामपंचायतीसाठी एक पंचसूत्री योजना तयार केली. (उद्देश – गावात रामराज्य प्रस्थापित करणे)
- सामुदायिक विकास योजना राष्ट्रीय विस्तार योजना या दोन्ही योजनेचे मूल्यमापन करण्यासाठी 16 जानेवारी 1957 ला बलवंतराय मेहता समितीची स्थापना करण्यात आली.
- बलवंतराय मेहता समितीने आपला अहवाल 1957 ला सादर केला व त्या अहवालामध्ये त्रिस्तरीय पंचायत राजची शिफारस केली.
- बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीच्या आधारावर 2 ऑक्टोबर 1959 ला राजस्थानमधील नागोर या ठिकाणी देशातील पहिली ग्रामपंचायत स्थापन करण्यात आली. (पंचायत राज स्विकारणारे राजस्थान हे प्रथम राज्य होय)
- आंध्रप्रदेशमध्ये 1959 पासून स्थानिक स्वराज्यसंस्था स्थापन करण्यात आली. (दुसऱ्या क्रमांकाचे राज्य)

1 पंचायत राज स्विकारणारे आसाम तिसऱ्या क्रमांकाचे राज्य होय. (1960)

2 पंचायत राज स्विकारणारे महाराष्ट्र नवव्या क्रमांकाचे राज्य होय. (1 मे 1962)

3 पंचायत राज स्विकारणारे पश्चिम बंगाल दहाव्या क्रमांकाचे राज्य होय. (1964)

- बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशींचा महाराष्ट्राच्या दृष्टिकोनातून अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे जून 1960 ला वसंतराव नाईक समितीची स्थापना करण्यात आली. (अध्यक्ष – वसंतराव नाईक)
- वसंतराव नाईक समितीने आपला अहवाल 1961 ला शासनाकडे सादर केला.
- 1 मे 1962 पासून महाराष्ट्रामध्ये त्रिस्तरीय पंचायत राजची स्थापना करण्यात आली.
- भारतातील आसाम राज्यामध्ये एकस्तरीय पंचायत राज संस्था अस्तित्वात आहे. (फक्त जिल्हा परिषद)
- भारतातील नागालॅंड व दादरा नगर हवेली या ठिकाणी द्विस्तरीय पंचायतराज संस्था अस्तित्वात आहे. (ग्रामपंचायत व जिल्हा परिषद)
- पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात यावा अशी शिफारस सर्वप्रथम डॉ. एल. एम. सिंघवी यांनी सभागृहामध्ये केली.
- पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा मिळवून देण्यासाठी पहिला प्रयत्न 1989 साली राजीव गांधी यांनी केला. नया पंचायतराज – (एल. एन सिंघवी शिफारशीनुसार)
- पी. व्ही. नरसिंहराव यांच्या कालखंडामध्ये 1992–93 साली 73 वी घटनादुरुस्ती करण्यात आली व या घटनादुरुस्तीमुळे पंचायत राज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात आला.
- भारतीय राज्यघटनेच्या कलम 243 (ऐ ते ओ) मध्ये तरतूद करण्यात आली व राज्यघटनेला 11 वे परिशिष्ट जोडण्यात आले.
- 73 व्या घटनादुरुस्तीमुळे म. गांधींचे ग्रामस्वराज्याचे स्वप्न साकार झाले आहे.

Reliable Academy 9222333999

## ❖ बलवंतराय मेहता समिती (१९५७) :





- स्थापना – १६ जानेवारी १९५७
- अहवाल सादर – २७ नोव्हेंबर १९५७
- सदस्य – १ + ३ = ४
- बलवंतराय मेहता - अध्यक्ष
- ठाकूर फुलसिंग – सदस्य
- डी. पी. सिंग – सदस्य
- व्ही. जी. राव – सदस्य

या समितीच्या शिफारशीवरुन सर्व प्रथम राजस्थानमध्ये नागोर जिल्हयात प. नेहरुंनी पंचायत राजचे उद्घाटन केले. – २ ऑक्टोंबर १९५९

### शिफारशी

१. समुदाय विकास कार्यक्रम व राष्ट्रीय विस्तारण योजना या दोन्ही कार्यक्रमात जनतेचा सहभाग वाढविण्यासाठी स्थानिक पातळीवर लोकशाहीचे विकेंद्रीकरा करणे.
२. पं समिती हा जिल्हा परिषद व ग्रामपंचायत यांच्यात समन्वय – साधणारा प्रभावी घटक म्हणून कार्य करेल.
३. त्रिस्तरीय ग्रामप्रशासन व्यवस्था निर्माण करावी. ग्रामस्तर - ग्रामपंचायत गट / तालुका स्तर – पंचायत समिती
४. जिल्हा स्तर – जिल्हा परिषद
५. जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या आमदार खासदारांना प्रतिनिधित्व द्यावे परंतु त्यांना मताधिकार देऊ नये. पंचायत समितीच्या सदस्यांची निवडणूक अप्रत्यक्षरित्या (ग्रामपंचायतीच्या सदस्याकडून) व्हावी.
६. जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये कोणीही स्त्री सदस्य निवडून न आल्यास दोन स्त्री सदस्याची नेमणूक करावी.
७. राज्य सरकारने केवळ नियंत्रण, मार्गदर्शन व नियोजन करण्याचे कार्य करावे. ग्रामपंचायतीचा विकास सचिव ग्रामसेवक असावा.
८. १ लाख लोकसंख्येचा एक विकास गट असावा.
९. ग्रामसभेत सर्व प्रौढ मतदारांचा समावेश असावा.
१०. पंचायत राज्यात सहकारी चळवळीचा समावेश असावा.
११. न्यायपंचायतीची ग्रामसभेकडून स्थापना करण्यात यावी.
१२. जिल्हाधिकारी हा जिल्हा परिषदेचा पदसिद्ध अध्यक्ष असावा.

## ❖ व्ही. टी. कृष्णम्माचारी प्रशासन सुधार आयोग (१९६०) :



### शिफारशी

१. लोक कल्याणकरी प्रशासन तातडीने अंमलात येण्यासाठी गाव, तालुका, व जिल्हा स्तरावर, ग्रामपंचायती, समिती व जिल्हा परिषदा उभारण्यात याव्यात.
२. १९६६ पासून स्वीकारले जाणारे सक्तीचे शिक्षण धोरणाची वयोमर्यादा ११ वरुन १४ पर्यंत न्यावी.
३. विकास गट हा नियोजनाचा घटक मानावा.
४. कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण व सहकारी संस्थाचा सहभाग यावर भर देण्यात यावा.
५. पंचवार्षिक योजनेकरता प्रत्येक जिल्हयाचा स्वतंत्र आराखडा असावा.

## ❖ तखतमल जैन अभ्यासगट (१९६६) :

- जिल्हाधिकाऱ्यांना फक्त सर्वसाधारण देखरेख व नियंत्रण एवढेच काम असावे.
- राज्य शासन व पं. समितीने ठरवून दिल्याप्रमाणे जमिनीचे वाटप ग्रामपंचायतीने करावे व ग्रामसभेला अहवाल सादर करावा.
- "पंचायत राज्य फायन्सास कॉर्पोरेशन" स्थापन करावे. – (राज्य विल आयोगासारखा)
- सर्व राज्यात ग्रामसभा स्थापन कराव्यात.

Reliable Academy 9922339999

## ❖ अशोक मेहता समिती (१९७७) :


Asoka Mehta


जन्म:१९४७, पंजाब मृत्यू:१५ ऑगस्ट २०१२, मुंबई

- स्थापना १३ डिसेंबर १९७७
- अहवाल सादर २१ ऑगस्ट १९७८
- एकूण सदस्य १३
- १९७७ साली मोरारजी देसाई पंतप्रधान असताना, समाजवादी विचारवंत 'अशोक मेहता' यांच्या अध्यक्षतेखाली केंद्र शासनाने ही समिती नेमली. एकूण शिफारशी - १३२

### शिफारशी

१. द्विस्तरीय पंचायतराज स्थापन करावे
२. जिल्हा स्तर – जिल्हा परिषदअसावी
३. ग्रामस्तर – मंडल पंचायत असावी
४. पंचायत समिती हा मधला स्तर वगळण्याची शिफारस अशोक मेहता समितीने केली.
५. मंडल पंचायतीत साधारणत :– १५ ते २०००० लोकसंख्येच्या खेडयांचा समावेश असावा.
६. न्यायपंचायती ग्रामपंचायतीपासून स्वतंत्र कराव्यात.
७. मंडल पंचायती व जिल्हा परिषदेचा कार्यकाल ४ वर्ष करावा.
८. पंचायत राज्य संस्थाना वैधानिक दर्जा देण्यात यावा.
९. राज्यशासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्तीने कर बसविण्याचा अधिकार द्यावा.
१०. जिल्हा पातळीवर नियोजनाची जबाबदारी ZP वर सोपवावेत.
११. प्रौढ शिक्षणासारखे कार्यक्रम ZP कडे सोपवावेत. सहकारी चळवळीची जबाबदारी ZP वर सोपवू नये.
१२. कृषी व layXuउद्योग, कुटीर उद्योग व ग्रामोद्योग यांच्या विकासाठी पंचायतराज संस्थांची उभारणी झाली पाहिजे व त्यातुन विकेंद्रीकरण साध्य झाले पाहिजे.
१३. जिल्हा परिषदेत एकूण सहा प्रकारचे सदस्य असावेत आणि लोकसंख्येच्या प्रमाणानुसार मतदार संघ निश्चित करावे.
१४. नियमित लेखापरीक्षणासाठी जिल्हा स्तरावर समिती नेमली जावी.
१५. पंचायतराज्यांच्या कारभारासाठी (नियंत्रणासाठी) राज्याच्या मंत्रिमंडळावर पंचायत राज संस्थांसाठी मंत्र्याची नियुक्ती करावी.
१६. या शिफारशी लागु करण्यात आल्या नाहीत. कारण सत्ता परिवर्तन झाले.

## ❖ डॉ. एल. एम. सिंघवी समिती (१९८७)



लोकशाही व विकास याकरिता पंचायत राज मजबूत कसे करता येईल या संबंधी अभ्यास करण्यासाठी सरकारने सिंधवी समिती स्थापन करण्यात आली.

### शिफारशी

१. पं. राज संस्थांना घटनात्मक दर्जा देण्यात यावा.
२. ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचे मार्ग निश्चित ठरवून द्यावेत.
३. स्थानिक स्वराज्य संस्थांना जास्त वित्तीय साधने मिळावीत.
४. स्थानिक स्वराज्य संस्था कृतिशील बनवाव्यात.
५. लघुउद्योग व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन दयावे.

## ❖ सरकारिया आयोग (१९८६) :

- केंद्र राज्य संबंधाबाबत हा आयोग नेमला होता.
- स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका नियमितपणे होण्यासाठी राज्याच्या कायद्यामध्ये समानता आणण्याचे या आयोगाने सुचवले.

Reliable Academy 9222333999

## ❖ जी. व्ही. के. राव समिती (१९८५) :

- ग्रामीण विकास कार्यक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी व पाहणीच्या कामात जिल्हास्तरीय व त्याखालील पंचायत राज संस्थांना महत्त्वाची भूमिका देण्यात यावी.प्रभावी विकेंद्रीकृत नियोजनासाठी काही राज्यस्तरीय नियोजनविषयक कामे जिल्हास्तरीय नियोजन यंत्रणेकडे हस्तांतरित करण्यात यावी.पंचायत राज संस्थांच्या निवडणुका नियमितपणे घेण्यात याव्या.
- अहवाल सादर – १९८६
- विकास प्रशासनाचे लोकशाहीकरण होणे आवश्यक आहे. नोकरशाहीकरण होत असल्याने जनतेचा प्रतिसाद मिळत नाही. असे या समितीने अहवालात नमूद केले होते.

## ➢ प्रमुख शिफारशी :

- जिल्हा परिषदेस महत्वाचे स्थान असावे.
- जिल्हा पातळीवर जिल्हा विकास आयुक्त पद निर्माण करुन त्यांच्याकडे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून जबाबदारी सोपवावी.
- केंद्र सरकारने पंचायत राजच्या संदर्भात स्थापन केलेल्या विविध समित्या व अभ्यासगट.
  - ➢ व्ही.टी. कृष्णम्माचारी समिती– इ.स. 1960
  - ➢ तखतमल जैन अभ्यासगट– इ.स. 1966
  - ➢ आर चोप्रा प्रशासन सुधारणा आयोग– इ.स. 1967
  - ➢ व्ही.के. राव समिती– इ.स. 1985
  - ➢ व्ही.स. रमादेवी समिती– इ.स. 2007

## ❖ भारतातील पंचायत राज :

| सर्वप्रथम पंचायत राज पद्धती स्विकारणारे राज्य | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | राज्यस्थान (२ ऑक्टोबर १९५९) | २) | आंध्रप्रदेश | ३) | आसाम |
| ४) | तामिळनाडू | ५) | कर्नाटक | ६) | ओरिसा |
| ७) | पंजाब | ८) | उ. प्रदेश | ९) | महाराष्ट्र – १ मे १९६२ |
| १०) | प. बंगाल | | | | |

## ❖ महाराष्ट्रातील पंचायत राज :

- वसंतराव नाईक समिती , स्थापना – २७ जुन १९६०, अहवाल – १५ मार्च १९६१,सदस्य – १ + ५ =६ मंजूरी – महाराष्ट्राच्या विधानसभेने – 8 सप्टेंबर, 1961

| | | | |
|---|---|---|---|
| १ | वसंतराव नाईक (महसूलमंत्री / अध्यक्ष) | २) | भगवंतराव गाढे (ग्रामीण विकास मंत्री ) |
| ३) | बाळासाहेब देसाई ( शिक्षण मंत्री ) | ४) | एम. आर यार्दी (अर्थखात्याचे सचिव ) |
| ५) | डी. डी. साठे (सहकार व ग्रामीण विकास सचिव) | ६) | एस. पी. मोहिते (विभागीय आयुक्त पुणे ) |
| ७) | पी. जी. साळवी (सचिव) | | |

- समितीने 226 शिफारशी केल्या त्यानुसार 1961 मध्ये महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायतसमिती अधिनियम, 1961 निर्माण करण्यात आला.
- 05 मार्च 1962 रोजी या अधिनियमास राष्ट्रपतींची मंजूरी मिळाली.
- 1 मे 1962 रोजी या अधिनियमाची अंमलबजावणी महाराष्ट्रात सुरू झाली म्हणजे महाराष्ट्रात पंचायतराज सुरू झाले.

✓ पंचायतसमितीला महत्त्व न देता जिल्हा परिषदेला अधिक महत्व द्यावे.

✓ जिल्हयातील आमदार व खासदार यांना जिल्हापरिषदेवर प्रतिनिधीत्व नसावे.

✓ जिल्हयाधिकाऱ्यास जिल्हा परिषदेच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेत करण्याचा अधिकार नसावा.

Reliable Academy 9222333999

- ✓ जिल्हा परिषदेचा कारभार वेगवेगळया विषय समित्यांच्या माध्यमातून चालवला जावा.
- ✓ गटविकास अधिकारी हा पंचायत समितीचा प्रशासकीय प्रमुख असावा.
- ✓ या समितीने जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरांबाबत खालील प्रमाणे शिफारशी सुचविल्या.
- ✓ जिल्हा परिषद मध्ये 50–75 सदस्य असावेत.
- ✓ सदस्यांची निवड जनतेकडून प्रत्यक्ष मतदानाने व्हावी.
- ✓ जि.प.चा एक मतदार संघ 40,000 लोकसंख्येचा असावा.
- ✓ जिल्हयातील सर्व पंचायत समित्यांचे सभापती जि.प चे पदसिध्द सदस्य असावेत.
- ✓ जि.प ची निवडणूक दर 5 वर्षांनी घ्यावी.
- ✓ पंचायत समिती स्तरावर केलेल्या महत्वपूर्ण शिफारशी –
- ✓ प्रत्यक्ष गटासाठी पंचायत समिती स्थापन करण्यात यावी.
- ✓ पंचायत समितीवर तिच्या क्षेत्रातील जि.प वर निवडलेले सर्व सदस्य, खरेदी – विक्री संघाचा अध्यक्ष SC/ST चा एक सदस्य 01 महिला सदस्य असावेत.
- ✓ जि.प च्या एका मतदारसंघात पंचायत समितीचे 2 मतदार संघ असावेत.

## ❖ ल. ना. बोंगीरवार समिती :

वसंतराव नाईक समिती , स्थापना – २७ जुन १९६० , अहवाल – १५ मार्च १९६१,सदस्य – १ + ५ =६ मंजूरी–महाराष्ट्राच्या विधानसभेने – 8 सप्टेंबर, 1961

1. •स्थापना – 26 सप्टेंबर 1970
2. •अहवाल सादर – 15 सप्टेंबर 1971
3. •एकूण सदस्य–11
4. •एकूण शिफारशी – 202

### शिफारशी

- स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये प्रत्यक्ष निवडणूकीचा स्वीकार करावा.
- ग्रामपंचायतचा कार्यकाल 5 वर्ष असावा. वर्षातून 2 ग्रामसभा व्हाव्यात.
- कृषि उद्योग निगमची स्थापना करण्यात यावी.
- ग्रामपंचायत स्थापनेसाठी ५०० – ६०० लोकसंख्येचा गट निश्चित करावा, १०००० पेक्षा जास्त लोकसंख्येच्या ठिकाणी नगरपरिषद स्थापन करावी.
- ग्रामपंचायतीवर देखरेख व नियंत्रण ठेवण्यासाठी सरपंच समितीची नियुक्ती करावी.
- न्यायपंचायती पूर्णपणे रद्द कराव्यात.
- सहकार हा विषय जिल्हा परिषदेकडून काढून घेण्यात यावा व दुग्धविकास व पशुसंवर्धन हा स्वतंत्र विषय जिल्हा परिषदेकडे देण्यात यावा.
- स्थानिक स्वराज्य संस्थाना जास्तीचे अधिकार देण्यात यावेत.
- जिल्हानियोजनाचा C. E. O. हा प्रमुख असावा.
- नियोजन व पुनर्विलोकन समितीची स्थापना करावी.
- ५०% B. D. O च्या जागा M. P. S. C द्वारे भराव्या.
- जिल्हा परिषदेकडून कोणतीही माहिती मागवण्याचा कलेक्टरचा हक्क काढून घेण्यात यावा.
- सरपंचांना मानधन दयावे. ग्रा. प. चा कार्यकाल ५ वर्षे करावा.
- C. E. O. ची बदली ३ वर्षांनी करावी.

## ❖ पी. बी. पाटील समिती :

- स्थापना –1 जून 1984
- अहवाल सादर –जून 1986
- एकूण शिफारशी – 228

Reliable Academy 9222333999

## शिफारशी

1) 2000 लोकसंख्येपर्यंत 1 ग्रामसेवक असावे.
2) 1,00,000 लोकसंख्येपर्यंत 1 पंचायत समिती असावी.
3) 15 ते 20 लाख लोकसंख्येपर्यंत 1 जिल्हा परिषद असावे.
4) आमदार व खासदारांना जिल्हा परिषदेचे प्रतिनिधित्व नको.
5) सरपंचाची निवड ही पंचाकडून न होता, प्रौढ मतदाराकडून व्हावी.
6) जिल्हा परिषदेची सदस्यसंख्या 40 ते 75 च्या दरम्यान असावी.
7) महाराष्ट्रातील ग्रामपंचायतीची अ, ब, क, ड अशी वर्गवारी करण्यात यावी.
8) राज्यस्तरावर विकास मंडळाची स्थापना करण्यात यावी.
9) जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 यांचे एकत्रिकरण करण्यात आले.

### ❖ बाबुराव काळे समिती (१९८०) :

## शिफारशी

१. ग्रामपंचायतीस मिळणारे सामाजिकरण अनुदान १ रु. ऐवजी २रु. करावे.
२. ग्रामसेवकाकडे दोन पेक्षा अधिक ग्रामपंचायती असू नये.
३. IRDP जिल्हा परिषदाक्डे एजन्सी योजना म्हणून द्यावा.
४. जिल्हा पातळीवर मलेरिया, कुष्ठरोग, क्षयरोग, निर्मूलन इ. विविध रोगांचे निर्मुलन जि. प. कडे सोपविण्यात यावे.
५. जिल्हा परिषदेच्या आर्थिक व प्रशासकीय व्यवहाराची नियमित तपासणी व्हावी.

➢ **इतर समित्या :**

- ग्रामपंचायतीचा कारभार आर्थिक कार्यक्षमतेने चालावा यासाठी – सदिक अली समिती
- भूषण गगरानी - ग्रामपंचायतींना आर्थिक स्वायत्तता मिळावी .
- दिवाकर समिती – पंचायत राज पद्धतीत ग्रामसभेचा सहभाग.

➢ महाराष्ट्रातील पंचायत राजची सुरूवात 28 सप्टेंबर 1961, महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम मंजूर करण्यात आला व 1 मे 1962 ला लागू करण्यात आला.

## ७३ वी घटनादुरूस्ती – 24 एप्रिल 1993

1) पी. व्ही. नरसिंहराव यांच्या काळामध्ये वरील घटनादुरूस्ती झाली.
2) 22 डिसेंबर 1992 रोजी पंचायत राज विधेयक संसदेत मांडले गेले व ते मंजुर झाले.
3) राज्यसभेच्या मंजुरीनंतर 20 एप्रिल 1993 ला राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली व या विधेयकाला घटनात्मक दर्जा मिळाला.
4) घटनेतील 243 या कलमामध्ये याची तरतूद करण्यात आली आहे. सोबत 11 वे परिशिष्ट जोडण्यात आले.
5) कलम 243 ते 243 (0) असे 29 विषय समाविष्ट करण्यात आले आहेत.
6) पंचायत राज हा विषय राज्यसूचीत येतो. तो राज्याच्या ग्रामविकास खात्याअंतर्गत येतो.
7) देशातील पंचायत राज हे स्वप्न महात्मा गांधींचे होते.
8) आरक्षणाची व्यवस्था
अ) पं. राज संस्थामध्ये अनुसूचित जाती व जमातींना लोकसंख्येच्या प्रमाणात जागा
ब) मागासप्रवर्गातील लोकांना २७% जागा राखीव
क) राखीव जागांपैकी १/३ जागा महिलांसाठी (आत ५०% आरक्षण)
९) निवडणूका - कलम २४३ (के) नुसार राज्य निर्वाचन आयोग स्थापन करुन पं. राज संस्थांच्या मतदार याद्या तयार करणे.

Reliable Academy 9222333999

## ७४ वी घटनादुरुस्ती

**स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण : ७४ वी घटनादुरुस्ती व पंचायत राज :-**

१. पी. व्ही. नरसिंहराव शासनाने ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती करुन ग्रामीण व नागरी स्थानिक शासनास घटनात्मक दर्जा प्राप्त करुन दिला. तेव्हापासून स्थानिक शासन तिसरा स्तर म्हणून अस्तित्वात आले व खऱ्या अर्थाने त्यातील स्थानिक लोकांचा सहभाग वाढला.

२. महाराष्ट्र शासनाने १९५८ वर्षाचा मुंबई राज्य ग्रामपंचायत कायदा आणि १९६१ वर्षाचा महाराष्ट्र जिल्हा परिषद आणि पंचायत समितीविषयक कायद्याच्या आधारे राज्यात त्रिस्तरीय स्थानिक स्वराज्य संस्था निर्माण केल्या. ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीनुसार स्थानिक शासनसंस्थांमध्ये पूरक बदल केले.

## ग्रामीण क्षेत्र

- त्रिस्तरीय पंचायती राज व्यवस्थेतील सर्वात कनिष्ठ स्तर ग्रामपातळीवर आहे.

१) ग्राम सभा :

- ग्रामसभा ही खेडेगावातील सर्व मतदारांची सर्वसाधारण सभा असते.
- महाराष्ट्र राज्यात ग्रामसभेची किमान ४ वेळा (२६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट व २ ऑक्टोबर) बैठक होते.
- ग्रामपंचायत अधिनियमामध्ये १९ जुलै २०१२ रोजी राज्य विधान परिषदेने संमत केलेल्या विधेयकानुसार ग्रामसभांच्या बैठकीची संख्या (आर्थिक वर्षात) ६ वरुन पुन्हा ४ (२६ जानेवारी, १ मे, १५ ऑगस्ट, २ ऑक्टोंबर) करण्यात आली आहे.
- या विधेयकाची अंमलबजावणी २ ऑक्टोबर २०१२ पासून सुरु झाली.

## ग्रामसभेची कार्यपध्दती व कामे

- बहुतेक राज्यांत ग्रामसभेची वर्षातून २ वेळा बैठक होते. ग्रामसभेची कामे खालीलप्रमाणे आहेत :

(अ) ग्रामपंचायतीचे वर्षाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

(ब) मागील वर्षाचे हिशेब व ऑडिट अहवाल मंजूर करणे.

(क) मागील वर्षाचा प्रशासनाबाबतचा अहवाल मंजूर करणे.

(ड) चालू वर्षातील विकासाबाबत व इतर कार्यक्रमांना मंजुरी देणे.

(इ) खेडयातील उत्पादनव्यवस्थेची योजना मंजूर करणे.

(फ) ग्रामपंचायतीचे सभासद निवडणे.




- ग्रामपंचायत हा महाराष्ट्रातील पंचायतीराजचा पायाभूत घटक आहे. सद्य:स्थितीत
- महाराष्ट्रात २,२७,२४१ ग्रामपंचायती आहेत.

Reliable Academy 9222333999

## रचना

- ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असते. महाराष्ट्रात ग्रामपंचायतीच्या सभासदांची संख्या ७ ते १७ असून जिल्हाधिकारी लोकसंख्येनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्यांची संख्या निर्धारित करतो. ६०० पेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्यात येते. तर ६०० पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या गावांसाठी 'ग्रुप ग्रामपंचायत (गट ग्रामपंचायत)' स्थापन करण्यात येते.

- ग्रामपंचायतीच्या सभासदांची निवड प्रौढ मताधिकार व गुप्त मतदान पध्दतीने होते. यासाठी ग्रामपंचायतीच्या क्षेत्रातून जितके सभासद निवडायचे असतील तितके प्रभाग करण्यात येतात. प्रत्येक प्रभागातून एक प्रतिनिधी निवडण्यात येतो.

- अनुसूचित जाती-जमातींसाठी सुरुवातीपासून (लोकसंख्येच्या प्रमाणात व त्यापैकी ५० टक्के जागा या वर्गातील महिलांसाठी) राखीव जागांची तरतूद होती. ७३ व्या दुरुस्तीद्वारे महिलांसाठी ३३ टक्के जागा आरक्षित केल्या होत्या.

- महाराष्ट्राच्या राज्य मंत्रिमंडळाने ९ मार्च २०११ रोजी महिलांना पंचायत राज व्यवस्थेत ५० टक्के आरक्षण देण्याचा निर्णय घेतला. राज्य विधिमंडळाने १४ एप्रिल २०११ रोजी हे विधेयक संमत केले.

- २०१२ सालापासून या कायद्याची अंमलबजावणी सुरु झाली. हे आरक्षण एकूण सदस्यसंख्या, विशिष्ट प्रवर्गनिहाय आणि अधिकारपदांना (उदा. सरपंच, महापौर वगैरे) लागू आहे. नागरिकांच्या मागासवर्गासाठी (भटक्या जमाती, विमुक्त जाती आणि इतर मागास) २७ टक्के जागा (यामध्ये ५० टक्के जागा याच प्रवर्गातील महिलांसाठी) राखीव असतील, अशी तरतूद आहे.

- ग्रामपंचायतीचा कार्यकाल ५ वर्षांचा निश्चित करण्यात आला आहे. त्यामुळे राज्य सरकारला ग्रामपंचायतींना मुदतवाढ देता येणार नाही आणि त्या बरखास्त करण्यात आल्यास ६ महिन्यांच्या कालावधीत फेर निवडणुका घेणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे.

❖ **ग्रामसेवक :** ग्रामपंचायतीचे कार्यालयीन कामकाज व दैनंदिन व्यवहार पाहण्यासाठी ग्रामसेवक या शासकीय कर्मचाऱ्याची नियुक्ती केली जाते. ३००० किंवा त्यापेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसाठी एका ग्रामसेवकाची तरतूद असते. मात्र गावाची लोकसंख्या कमी असल्यास पंचक्रोशीतील ४-५ गावांसाठी एक ग्रामसेवक असतो.

➢ **ग्रामपंचायतीची उत्पन्नाची साधने** :सर्वसाधारणपणे जमीन महसूल कर, उपकर, घरपट्टी, व्यवसाय कर, वाहन कर, मच्छिमारी कर व सरकारी अनुदाने यांचा त्यात समावेश होतो.

➢ **ग्रामपंचायतीचे कार्य व अधिकार:** ग्रामपंचायतीची अनेक कामे आहेत. या कामाची दोन विभागात विभागणी करता येते. (अ) अनिवार्य कार्ये व (ब) ऐच्छिक कामे

**(अ) अनिवार्य कार्ये :**

१)सार्वजनिक सुरक्षितता,
२) सार्वजनिक आरोग्य,
३) सार्वजनिक बांधकाम,
४) समाजशिक्षण दिवाबत्ती,
५) साफसफाई,
६) रोगराई व रोगाच्या साथीचा बंदोबस्त,
७) पिण्याच्या पाण्याची सोय करणे,
८) सांडपाण्यासाठी मोऱ्या बांधणे,
९) सार्वजनिक करमणूक,
१०) जन्म-मृत्यू, विवाह यांची नोंद ठेवणे,
११) गुरांची नोंद,
१२) सार्वजनिक रस्ते,
१३) सार्वजनिक इमारती,
१४) वाचनालये,
१५) झाडे लावणे इत्यादी

**(ब) ऐच्छिक कामे :** विकासविषयक

१) बांधकामविषयक सोयी, २) शेती, पशू, सहकारी संस्था, ग्रामोद्योग, अल्पबचत इ.

- विकासासाठी ग्रामयोजना तयार करुन त्यांची कारवाई होते की नाही ते पाहणे.

Reliable Academy 9922333999

❖ **समाजकल्याण :** दुष्काळ किंवा आणीबाणीच्या काळात साहाय्य करणे, अपंगांना मदत करणे.

❖ **इतर कामे :**
१.न्याय पंचायतीकडे तंटे देण्यापूर्वी मध्यस्थी करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीला आहे.
२.सरपंचाची निवड करणे.
३.महसूल गोळा करणे.
४.अंदाजपत्रक तयार करणे.
५.ग्रामपंचायतीच्या शाखांवर व ग्रामपंचायतीच्या नोकरवर्गावर देखरेख ठेवणे.

❖ **उत्पन्नाची साधने :** पंचायत समित्यांना उत्पन्नाची स्वतंत्र साधने नाहीत. त्यांच्या प्रशासकीय व विकासात्मक खर्चाची जबाबदारी जिल्हा परिषदेकडे असते.

❖ **जिल्हा परिषद :**
महाराष्ट्रामध्ये सध्या एकूण ३६ जिल्हे आहेत. मुंबई (शहर) जिल्हा आणि मुंबई (उपनगर) जिल्हा हे नागरी लोकवस्तीचे भाग आहेत. त्यामुळे त्यांच्यासाठी जिल्हा परिषदा नाहीत. जिल्हा परिषदांच्या कार्यक्षेत्रातून महानगरपालिका आणि नगरपरिषदांचा भाग वगळलेला आहे. अशा रितीने जिल्हा परिषदा या फक्त ग्रामीण लोकवस्तीच्या भागासाठी असतात. सध्या महाराष्ट्र राज्यामध्ये ३४ जिल्हा परिषदा आहेत.

❖ **जिल्हा परिषदेच्या उत्पन्नाची साधने:**
जिल्हयाच्या क्षेत्रातील व्यवसाय, व्यापार, धंदा किंवा नोकरी करीत असलेल्या व्यक्तीवर बसवायचा कर, सार्वजनिक नळावर बसविण्यात येणारा कर, सार्वजनिक मनोरंजन व करमणूक यांवरील कर, यंत्रांवरील कर, जमिनी व इमारती यांवरील विशिष्ट कर, जकात कर, बाजार शुल्क इ. याव्यतिरिक्त राज्य सरकार जिल्हा परिषदेत विविध प्रकारची अनुदाने आणि जमीन महसुलाचा वाटा देते.

❖ **महापौर:**
- महानगरपालिकेचे सदस्य दरवर्षी आपणातून एका सदस्याची महापौर म्हणून निवड करतात. ७४ व्या घटनादुरुस्तीनंतर अनुसूचित जाती व जमाती, मागासवर्ग यांतील सदस्य आणि स्त्री सदस्य यांसाठी नेमून दिलेल्या पध्दतीने महापौरपद क्रमश: राखीव ठेवले जाते.

- महापौर हा नगरचा पहिला नागरिक मानला जातो. तो महानगरपालिकेच्या सभांचे अध्यक्षस्थान भूषवितो आणि कामकाजाचे नियमन करतो. महानगरपालिकेचे सदस्य आपणातूनच एका सदस्यांची उपमहापौर म्हणून निवड करतात. महापौराच्या अनुपस्थितीत उपमहापौर महानगर पालिकेच्या सभांचे अध्यक्षस्थान स्वीकारतो. महापौर आणि उपमहापौराचा कार्यकाल अडीच वर्षांचा आहे. महापौर आपल्या पदाचा राजीनामा लेखी स्वरुपात महानगरपालिकेला देतात तर उपमहापौर राजीनामा महापौरांकडे देतात.

❖ **महानगरपालिका आयुक्त :**
- हा महानगरपालिका प्रमुख प्रशासक असतो. राज्यशासन भारतीय प्रशासकीय सेवेतील ज्येष्ठ अधिकाऱ्याची आयुक्तपदी ३ वर्षांच्या कालावधीसाठी नियुक्ती करते. कालावधी संपल्यानंतर राज्यशासन त्याची फेरनियुक्ती देखील करु शकते. तसेच कालावधी पूर्ण होण्याआधी त्याची अन्यत्र बदली करण्याचा अधिकार राज्यशासनास आहे. महाआयुक्ताला बडतर्फ करण्यासाठी महानगरपालिकेत ठराव संमत व्हावा लागतो. ठरावाला पाच अष्टमांश सदस्यांनी मान्यता दिल्यास राज्य सरकारला महाआयुक्ताला परत बोलावून घ्यावे लागते. महानगरपालिकेला महाआयुक्ताला बडतर्फ करता येत नाही. साधारणत: पुढील कारणांसाठी महाआयुक्ताला परत बोलावण्याची मागणी केली जाऊ शकते.

- महाआयुक्ताने महानगरपालिकेच्या हितसंबंधांविरुध्द कामकाज केल्यास
- महाआयुक्ताने महानगरपालिकेच्या ठरावाची अंमलबजावणी न केल्यास किंवा त्याबाबत टाळाटाळ केल्यास
- महाआयुक्ताने निष्काळजीने कामकाज केल्यास
- प्रशासकीय अकार्यक्षमतेच्या कारणास्तव

Reliable Academy 9222833999

**महाआयुक्त हा महानगरपालिकेचा प्रशासकीय प्रमुख असल्यामुळे त्याला अनेक महत्त्वाची कामे करावी लागतात. ती पुढीलप्रमाणे**

I. महानगरपालिकेचया सभेत महापौराला साहाय्य करणे.
II. महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे.
III. महानगरपालिकेच्या धोरणाची अंमलबजावणी करणे.
IV. कनिष्ठ कर्मचाऱ्यांची नेमणूक करणे.
V. महानगरपालिकेच्या वतीने करार, कराराची माहिती स्थायी समितीला देणे.
VI. अंदाजपत्रक तयार करणे.
VII. महानगरपालिकेच्या सदस्यांना महानगरपालिकेच्या कामासंबंधीची माहिती देणे.

- महाआयुक्ताला कामात मदत करण्यासाठी चार उपमहाआयुक्त असतात. यांची नेमणूक महानगरपालिका राज्य सरकारच्या सल्ल्याने करते. याशिवाय महानगरपालिकेचा चिटणीस, शहर अभियंता, आरोग्यधिकारी, शिक्षणाधिकारी इत्यादींची नेमणूक महानगरपालिका राज्य सरकारच्या सल्ल्याने करते.

## ७३ वी घटनादुरुस्ती : महत्त्वपूर्ण तरतुदी

- ७३ व्या घटनादुरुस्तीद्वारे भारतीय संविधानात ९ व्या भागात कलम २४३ समाविष्ट करण्यात आले. तसेच पंचायती राजसंस्थांकडे २९ बाबी हस्तांतरित करण्यात आल्या. त्यांचा अंतर्भाव असलेले ११ वे परिशिष्ट संविधानात समाविष्ट करण्यात आले आहे. ७३ व्या घटनादुरुस्तीतील महत्त्वपूर्ण तरतुदी खालीलप्रमाणे आहेत.

**(१) ग्रामसभा :** कलम २४३ (A) नुसार ग्रामसभा स्थापन करणे आणि त्यांचे अधिकार, यासंबंधी तरतुदी दिलेल्या आहेत.

**(२) पंचायती राजसंस्था :** कलम २४३ (B) नुसार ग्राम, मध्य आणि जिल्हा स्तरावर अनुक्रमे ग्रामपंचायत, तालुका पंचायत आणि जिल्हा परिषद स्थापन करण्याची तरतूद आहे.

**(अ) लोकनिर्वाचित प्रतिनिधी** : कलम (C) नुसार लोकसंख्येच्या आधारे ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषदेची संख्या निर्धारित केल्यानंतर त्यांच्या लोकप्रतिनिधींची मतदारांद्वारे प्रत्यक्षरीत्या निवड करण्याची तरतूद करण्यात आली.

**(ब) पदसिध्द प्रतिनिधी :** राज्य विधिमंडळाने ग्रामपंचायतीच्या सरपंचांना पंचायत समितीचे आणि पंचायत समित्यांच्या सभापतींना जिल्हा परिषदेचे पदसिध्द प्रतिनिधित्व देण्यासंबंधीच्या तरतुदी करण्याचे निर्देश राज्य विधिमंडळांना देण्यात आले आहेत.
स्थानिक नेतृत्वास वाव देण्यासाठी स्थानिक आमदार व खासदारांना पंचायती राजसंस्थांपासून वगळण्याची तरतूद १९६२ सालापासून महाराष्ट्रात अस्तित्वात आहे आणि त्यात बदल करण्यात आलेला नाही.

**(३) आरक्षित जागांसंबंधीची तरतूद :** कलम २४३(D) मध्ये निर्वाचित जागांमध्ये अनुसूचित जाती व जमाती आणि महिलांसाठी आरक्षित जागांसंबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. अनुसूचित जाती व जमातींसाठी त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात जागा आरक्षित असाव्यात. अनुसूचित जाती व जमातींसाठी आरक्षित असलेल्या जागांपैकी एक-तृतीयांश जागा त्या गटांतील महिलांसाठी आरक्षित असाव्यात. तिन्ही स्तरावरील एकूण निर्वाचित जागांपैकी एक-तृतीयांश जागा (अनुसूचित जाती व जमातीतील महिलांसाठी राखीव असलेल्या जागांसह) महिलांसाठी आरक्षित असाव्यात. अशा राखीव जागा असलेले मतदारसंघ चक्राकार पध्दतीने निर्धारित करण्यात यावी. त्याप्रमाणे तिन्ही स्तरांवरील पदाधिकाऱ्यांच्या जागांमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व महिलांसाठी एक-तृतीयांश अधिकारपदे राखीव ठेवण्यासंबंधीचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी राखीव अधिकारपदे चक्राकार पध्दतीने निर्धारित करण्यात यावी.

केंद्रीय कॅबिनेटने राज्यघटनेतील कलम २४३ (D) मध्ये दुरुस्ती करण्यासाठी २७ ऑगस्ट २००९ रोजी मान्यता दिली. त्यानंतर 'घटनादुरुस्ती (११० वे) विधेयक २००९' लोकसभेमध्ये २६ नोव्हेंबर २००९ रोजी पंचायत राज मंत्री सी. पी. जोशी या विधेयकाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या विधेयकाद्वारे उपरोक्त कलमातील तरतुदींमध्ये दुरुस्ती होऊन महिलांसाठी राखीव असणाऱ्या जागांचे प्रमाण ५० टक्के होईल या जागांचे प्रमाण ५० टक्के होईल. या विधेयकाद्वारे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थातील

१. प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरल्या जाणाऱ्या एकूण जागा,
२. पदाधिकारी आणि
३. अनुसूचित जाती आणि जमातींसाठी आरक्षित असलेल्या जागा इत्यादींमध्ये महिलांसाठी ५० टक्के आरक्षण असेल. सध्या हे विधेयक लोकसभेमध्ये प्रलंबित आहे. विधेयकाला अंतिम मंजुरी मिळाल्यानंतर ही तरतूद संपूर्ण देशात अंमलात येईल.
४. पंचायती संस्थांचा कार्यकाल : कलम २४३(E) प्रमाणे तिन्ही स्तरांवरील संस्थांचा सामान्य कार्यकाल ५ वर्षांचा असेल अशी तरतूद करण्यात आली आहे. काही कारणास्तव या संस्था मुदतपूर्व बरखास्त करण्यात आल्या असतील तर त्यांचे पुनर्गठन ६ महिन्यांच्या आत करणे राज्य शासनावर बंधनकारक असेल. अशा पुनर्गठित संस्था उर्वरित कालखंडासाठी अस्तित्वात राहतील.
५. पंचायती संस्थांचे अधिकार व कार्ये : कलम २४३(G) मध्ये पंचायती संस्थांचे अधिकार, कार्ये आणि जबाबदाऱ्या या संबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत.

Reliable Academy 9422333999

## अकराव्या परिशिष्टात खालील बाबींचा समावेश आहे

१. कृषीविस्तारासह कृषी
२. भू-विकास, जमीन सुधारणांची अंमलबजावणी, जमिनीचे एकत्रिकरण, मृदूसंसारण
३. छोटे पाटबंधारे, पाण्याचे व्यवस्थापन व पाणलोट विकास
४. पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन
५. मच्छिमारी
६. सामाजिक वनीकरण, शेत वनीकरण
७. किरकोळ जंगल उत्पन्न
८. अन्नावरील प्रक्रियांचे उद्योगांसह लघुउद्योग
९. खादी, ग्राम व कुटीरोद्योग
१०. ग्रामीण घरबांधणी
११. पिण्याचे पाणी
१२. इंधन व चारा
१३. रस्ते, नाले, पूल, तळी, जलमार्ग आणि दळणवळणाची अन्य साधने
१४. ग्रामीण विद्युतीकरण, विजेचे वाटप
१५. अपारंपारिक ऊर्जा साधने
१६. दारिद्रयनिर्मूलन कार्यक्रम
१७. प्राथमिक व दुय्यम शाळांसह शिक्षण
१८. तांत्रिक प्रशिक्षण व व्यावसायिक शिक्षण
१९. प्रौढ व अनौपचारिक शिक्षण
२०. ग्रंथालये
२१. सांस्कृतिक कार्यक्रम
२२. बाजार व जत्रा
२३. रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे व दवाखाने यांसह आरोग्य व स्वच्छता
२४. कुटुंबकल्याण
२५. स्त्रिया व बालविकास
२६. अपंग व मतिमंद यांच्या कल्याणासह समाज कल्याण
२७. दुर्बल घटकांचे, विशेषत: अनुसूचित जाती व जमाती कल्याण
२८. सार्वजनिक वाटप योजना
२९. समाजाच्या मालमत्तेचा प्रतिपाळ

Reliable Academy 9222333999

१९६१ च्या महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायती समिती कायद्यातील तरतुदींद्वारा वर नमूद केलेल्या बाबींपेक्षाही अधिक व्यापक अधिकार जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांना देण्यात आले आहेत. १९५८ च्या ग्रामपंचायत कायद्याने यातील अनेक बाबींसंबंधीचे अधिकार ग्रामपंचायतींना बहाल केले आहेत.

६. उत्पन्नाची साधने : कलम २४३(H) मध्ये पंचायत संस्थांच्या उत्पन्नाच्या साधनसंबंधीच्या तरतुदली करण्यात आल्या आहेत. त्यानुसार राज्य विधिमंडळ कायदा करुन खालील आर्थिक तरतुदींची पूर्तताकरेल.
(अ) पंचायतींना कायद्याच्या मर्यादा सांभाळून व कायदेशीर कार्यपध्दतीचा अवलंब करुन कर, जकाती व पथकर लादण्याचा, वसूल करण्याचा आणि वापरण्याचा अधिकार देईल.
(ब) राज्य शासनाने लादलेले व वसूल केलेले कर, जकाती, पथकर इ. कायद्याने निश्चित केलेल्या उद्देशांसाठी आणि मर्यादित पंचायतीकडे सोपवले.
(क) राज्याच्या एकत्रित निधीमधून पंचायतींना अनुदान देण्याची तजवीज करील आणि
(ड) अशा निधींची स्थापना करील की त्यामध्ये पंचायतीकडे येणारा पैसा जमा होईल व खर्चाला लागणारा पैसा त्यामधून काढता येईल.

७. राज्य वित्त आयोग : कलम २४३(I) मध्ये राज्य वित्त आयोगाच्या गठनासंबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. त्यानुसार १९९२ च्या ७३ व्या दुरुस्ती कायद्याच्या अंमलबजावणी पासून एक वर्षाच्या आत आणि त्यानंतर प्रत्येक पाचवे वर्ष संपल्यावर पंचायतीच्या आर्थिक स्थितीचे परीक्षण करुन शिफारशी करण्यासाठी राज्यपाल वित्त आयोगाची स्थापना करतील.

- वित्त आयोग राज्यशासनाला खालील बाबींसंबंधी शिफारशी करेल.

(अ) राज्याने वसूल केलेले कर, जकाती, पथकर, शुल्क इ. पासूनच्या मिळकतींची वाटणी राज्य आणि पंचायती यांच्यामध्ये करणे आणि सर्व पातळयांवरील पंचायतींच्या उत्पन्नातील त्यांचा वाटा निश्चित करणे, पंचायतींकडे कोणकोणते कर, जकाती, पथकर इ. सोपवायचे ते ठरविणे, राज्याच्या एकत्रित निधीतून पंचायतींना अनुदान देणे, या तिन्ही शिफारशींमागील तत्त्वे निश्चित करणे.

(ब) पंचायतींची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी आवश्यक ते सर्व उपाय योजणे आणि
(क) पंचायतींच्या उत्तम आर्थिक स्थितीसाठी राज्यपालाने आर्थिक आयोगाकडे निर्देश केलेल्या अन्य बाबी.
आयोगाची रचना : वित्त आयोगाची रचना, सभासदांच्या नेमणुकीसाठी पात्रता, त्यांची निवड करण्याची पध्दती यासंबंधीच्या तरतुदींसाठी राज्य विधिमंडळ कायदा करेल. महाराष्ट्र शासनाने १९९४ साली पहिल्या राज्य वित्त आयोगाचे गठन केले.

८. लेखा परीक्षण : कलम २४३ (J) मध्ये पंचायती संस्थांच्या लेखा परीक्षणासंबंधी आपले हिशेब ठेवावेत व त्यांचे लेखा परीक्षण यासाठी विधिमंडळ कायदा करुन तरतूद करेल.
९. निवडणूक आयोग : कलम २४३ (K) मध्ये राज्य निवडणूक आयोगासंबंधी तरतुदी करण्यात आल्या. महाराष्ट्र शासनाने १९९४ साली राज्य निवडणूक आयोगाचे गठन केले आहे. २६ एप्रिल १९९४
१०. केंद्रशासित प्रदेशातील पंचायती संस्था : कलम २४३ (L) मध्ये हा घटनादुरुस्तीचा कायदा केंद्रशासित प्रदेशांना कसा लागू करावा यासंबंधीची चर्चा आहे.
११. न्यायालयीन हस्तक्षेपास प्रतिबंध २४३ (O) : राज्य निवडणूक आयोगाकडे निर्धारित पध्दतीने अर्ज केल्याशिवाय पंचायतींच्या कोणत्याही निवडणुकीस न्यायालयात आव्हान देता येणार नाही.
१२. जिल्हा नियोजन आणि विकास समिती २४३ (Z-D) : जिल्हा स्तरावरील नियोजन आणि विकासाची जबाबदारी पार पाडणारी जिल्हा नियोजन व विकास समिती स्थापन केली जाईल.

महाराष्ट्र शासनाने २१ एप्रिल २०११ रोजी मुंबई ग्रामपंचायत अधिनियम (१९५७) आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियमामध्ये (१९६१) केलेल्या सुधारणा राजपत्रामध्ये प्रसिध्द केल्या आहेत. यानुसार ग्रामपंचायत, जिल्हा परिषद आणि पंचायत समितींमधील (१) एकूण जागा, (२) पदाधिकारी आणि (३) अनुसूचित जाती व जमातींसाठी राखीव असलेल्या जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी राखीव असणार आहेत.
आंध्रप्रदेश, बिहार, छत्तीसगढ, हिमाचल प्रदेश, झारखंड, केरळ, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, ओडिशा, राजस्थान, त्रिपुरा आणि उत्तराखंड इ. १२ राज्यात महिलांना पंचायत राजमध्ये ५० टक्के आरक्षण देण्यात आले आहे.
स्थानिक स्वराज्य संस्थांचे सक्षमीकरण : ७४ वी घटनादुरुस्ती व नागरी स्थानिक शासन :-
नागरी स्थानिक शासनसंस्था : स्थानिक शासन हा राज्यसूतीतील विषय असल्याने, भारताच्या घटकराज्यांत नागरी स्थानिक शासनसंस्था स्थापन करताना विभिन्न निकष लावले जातात.

| महाराष्ट्र राज्यात स्थानिक शासनसंस्थांचे खालील ५ प्रमुख प्रकार आहेत. | |
|---|---|
| 1 | महानगरपालिका |
| 2 | नगरपरिषद |
| 3 | नगरपंचायत |
| 4 | औद्योगिक नगरवसाहत प्राधिकरण |
| 5 | छावणी क्षेत्र किंवा कटकमंडळ (कँटॉन्मेंट बोर्ड) |

## ७४ वी घटनादुरुस्ती :

डिसेंबर १९९२ मध्ये ७३ वी आणि ७४ वी घटनादुरुस्ती पारित करण्यात आली. काही बाबी केवळ नागरी स्वरुपाच्या असल्याने त्यांचा समावेश ७४ व्या घटनादुरुस्तीत करण्यात आला होता. उभयतांशी निगडित असलेल्या नियोजन आणि विकास समितीची तरतूद केवळ ७४ व्या घटना दुरुस्तीतच करण्यात आली होती.

### (अ) ७३ व्या घटनादुरुस्तीप्रमाणेच ७४ व्या घटनादुरुस्तीत समाविष्ट केलेल्या तरतुदी :

७४ व्या घटनादुरुस्तीत ७३ व्या घटनादुरुस्तीप्रमाणे खालील तरतुदी करण्यात आल्या आहेत.
(१) आरक्षित जागांसंबंधीच्या तरतुदी - कलम २४३ (T), (२) कार्यालयासंबंधीच्या तरतुदी - कलम २४३ (U), (३) अधिकारासंबंधी तरतुदी -कलम २४३ (W), (४) उत्पन्नाच्या साधनांविषयीच्या तरतुदी - कलम २४३ (W), (५) राज्य वित्त आयोगाविषयीच्या तरतुदी - कलम २४३ (Y), (६) लेखापरीक्षण विषयक तरतुदी - कलम २४३ (Z), (७) राज्य निवडणूक आयोगासंबंधीच्या तरतुदील - कलम २४३ (Z - A), (८) केंद्रशासित प्रदेशातील स्थानिक शासनसंस्था - कलम २४३ (Z - B) मधील, (९) न्यायालयीन हस्तक्षेपास प्रतिबंध करणाऱ्या तरतुदी - कलम २४३ (Z - G)
उपरोक्त तरतुदींशिवाय खास नागरी स्थानिक शासनसंस्थांविषयी पुढील तरतुदी आहेत :
**(१) नागरी स्थानिक शासनसंस्था :** अनुच्छेद २४३ (R) मध्ये राज्य विधिमंडळाने कायद्यांद्वारा नागरी क्षेत्रात स्थापन करावयाच्या खालील स्थानिक शासनसंस्थांचा उल्लेख करण्यात आला आहे.
(अ) नगरपंचायत (ब) नगरपरिषद आणि (क) महानगरपालिका

Reliable Academy 9223393999

**(२) नागरी स्थानिक शासनसंस्थांची रचना :** अनुच्छेद २४३ (R) मध्ये नागरी स्थानिक संस्थांच्या रचनेसंबंधीची मार्गदर्शक तत्त्वे समाविष्ट करण्यात आली आहेत.

११२ वे घटनादुरुस्ती विधेयक २४ नोव्हेंबर २००९ रोजी लोकसभेमध्ये मांडण्यात आले. या विधेयकाद्वारे राज्यघटनेतील कलम २४३ (T) मध्ये दुरुस्ती प्रस्तावित आहे. नागरी स्थानिक संस्थांमधील एकूण जागांपैकी, अध्यक्ष पदाच्या एकूण जागांपैकी आणि अनुसूचित जाती व जमातींसाठी राखीव असलेल्या जागांमध्ये ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित करण्याचा प्रस्ताव आहे. सध्या हे विधेयक संसदेपुढे प्रलंबित आहे.

**(३) विभागीय समित्या :** अनुच्छेद २४३ (S) मध्ये ३ लाखांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नागरी क्षेत्रातील स्थानिक शासनसंस्थांमध्ये एक किंवा अधिक विभागीय समित्या स्थापन करण्यात याव्यात अशी तरतूद आहे.

**(४) अधिकार व कार्ये :** अनुच्छेद २४३ (W) मध्ये नागरी स्थानिक शासनसंस्थांचे अधिकार, कार्ये व जबाबदाऱ्यांसंबंधीच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. १२ व्या परिशिष्टात नमूद केलेल्या १८ बाबी या संस्थांकडे सोपविणे अनिवार्य आहे.

**१२ व्या परिशिष्टात खालील बाबी समाविष्ट आहेत.**

(१) नगर नियोजन (२) जमिनीचा वापर आणि बांधकाम यावरील नियंत्रण (३) सामाजिक आणि आर्थिक विकासासाठी नियोजन (४) रस्ते आणि पूल यांचे बांधकाम (५) घरगुती, व्यापारी आणि औद्योगिक वापरासाठी पाणी पुरवठा (६) सार्वजनिक आरोग्य, स्वच्छता आणि मलनि:स्सारण व्यवस्थापन (७) आग प्रतिबंधक यंत्रणा (८) शहरी वनीकरण व पर्यावरण संवर्धन (९) शारीरिक आणि मानसिक विकलांग व्यक्ती आणि समाजातील दुर्बल घटकांच्या हितसंबंधांचे रक्षण (१०) गलिच्छ वस्ती सुधारणा (११) नागरी दारिद्र्यनिर्मूलन (१२) बाग-बगीचे, खेळाची मैदाने आणि अन्य नागरी सुविधांची तरतूद (१३) सांस्कृतिक व शैक्षणिक विकास आणि शहराचे सौंदर्य वाढविण्याच्या उपाययोजना (१४) दफनभूमी, दहनभूमी आणि विद्युत वाहिनीची तरतूद (१५) गुरांसाठी तलावाची तरतूद करणे आणि त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारास प्रतिबंध करणे. (१६) जन्म-मृत्यू नोंदणी (१७) रस्त्यांवरील दिवाबत्ती, वाहनतळ, बस थांबे इत्यादींची तरतूद (१८) कत्तलखाने आणि चर्मप्रक्रिया उद्योगांचे नियंत्रण

**(५) जिल्हा नियोजन आणि विकास समिती :** अनुच्छेद २४३ (Z - D) राज्य विधिमंडळांना जिल्हा नियोजन आणि विकास समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

**(अ) रचना :** समितीच्या एकूण सदस्यांपैकी चार पंचमांश सदस्यांची निवड स्थानिक शासनसंस्थांनी करणे बंधनकारक आहे. नागरी आणि ग्रामीण शासनसंस्थांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात प्रतिनिधित्व देण्यात यावे.

**(ब) अधिकार व कार्ये :** नागरी आणि ग्रामीण क्षेत्रांशी संबंधित जलसंपत्ती, संरचनात्मक साधने, नैसर्गिक साधनसंपत्ती, पर्यावरण संवर्धन इत्यादी समान विषयांचे एकात्मिक नियोजन करणे.

**(क) आर्थिक तरतुदी :** केंद्राच्या योजना आणि राज्याच्या योजना, यातून प्रत्येक जिल्हयाच्या नियोजन आणि विकास कार्यांसाठी आवश्यक असणारा निधी उपलब्ध होईल.

जिल्हा नियोजन आणि विकास समितीने संमत केलेले जिल्हयांच्या विकास योजनेचे प्रारुप (आराखडा) समितीचा कार्याध्यक्ष राज्य शासनाकडे अंतिम मंजुरीसाठी पाठवेल.

**(६) महानगर क्षेत्र नियोजन समिती :** कलम २४३ (Z - E) मध्ये महानगर प्रादेशिक क्षेत्र नियोजन समिती स्थापन करण्याचे संबंधित राज्यांना निर्देश देण्यात आले आहेत. ही समिती महानगर प्रादेशिक क्षेत्रातील ग्रामीण आणि नागरी प्रदेशाच्या विकास आणि नियोजनाची जबाबदारी पार पडेल.

**❖ ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीची कार्यवाही :**

महाराष्ट्र राज्य विधिमंडळाने १९९४ साली जिल्हा परिषद व पंचायत समिती (१९६१) आणि मुंबई ग्रामपंचायत अधिनियम (१९५८) या कायद्यांमध्ये आवश्यक त्या दुरुस्त्या करुन ७३ व ७४ व्या घटनादुरुस्तीची अंमलबजावणी सुरु केली आहे.

पंचायत राज संस्थांमध्ये सर्व स्तरांवर महिलांसाठी ५० टक्के जागा आरक्षित करण्याबाबतचे ११० वे आणि ११२ वे घटनादुरुस्ती विधेयके (२००९) संसदेपुढे प्रलंबित आहेत. ही विधेयके मंजूर झाल्यानंतर महिला आरक्षणाबाबत सार्वत्रिकता निर्माण होईल.

महाराष्ट्र शासनाने आणि विधिमंडळाने मार्च-एप्रिल २०११ मध्ये पंचायत राज संस्थांमधील ५० टक्के महिला आरक्षण धोरणाला मंजुरी दिलेली आहे. या दुरुस्तीची अंमलबजावणी सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीमध्ये सुरु झालेली आहे.

Reliable Academy 9922233999

# 2. ग्रामपंचायत




## पार्श्वभूमी

- वैदिक काळापासून भारतात पं. राज पद्धती अस्तित्वात आली.
- गावातील पंचायतीचा ऋग्वेदात ग्रामसभा असा उल्लेख आहे.
- मनुस्मृती आणि नारदस्मृती या ग्रंथातून स्थानिक पातळीवर पंचायत कार्यरत असल्याचा पुरावा सापडतो.
- मुघलांच्या काळात ग्रामपंचायतचे कामकाज हे कोतवालामार्फत होत असे.
- उत्तर भारतातील ग्रामप्रशासनाची जबाबदारी पंचकुली या समितीवर होती.
- 1793 चा चार्टर ॲक्ट (सुधारणा कायदा) मुंबई, मद्रास या प्रांतात नगरपालिका स्थापन झाल्या व त्याचबरोबर गाव पंचायती ही स्थापन झाल्या.

➢ **तरतूद :–** मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958, कलम 5 नुसार प्रत्येक गावासाठी एक ग्रा. प. किंवा दोन गावांसाठी एक ग्रा. पं.

➢ **सद्यस्थिती :–** महाराष्ट्रात सध्या 27,963 इतक्या ग्रा. प. आहेत.

➢ **रचना :–**

1) 500 लोकसंख्येसाठी 1 ग्रामपंचायत, डोंगरी भागात 300 लोकसंख्येसाठी 1 ग्रामपंचायत.
2) जर 500 पेक्षा कमी लोकसंख्या असेल तर दोन गावांची गट ग्रा. प. करतात.
3) ग्रा. प. चे मुख्यालय ज्या गावाची लोकसंख्या गट दोघात मोठी असेल त्या गावात ठेवले जाते.
4) दोन गावातील गट ग्रा. प. अंतर हे 3 किमी पेक्षा जास्त असू नये.
5) ग्रामपंचायतीच्या एकूण सदस्यसंख्येच्या 50 टक्के जागा महिलांसाठी आणि 27 टक्के जागा इतर मागासवर्गासाठी राखीव असतात. अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींना एकूण लोकसंख्येतील त्यांचे प्रमाण विचारात घेऊन राखीव जागांच्याद्वारे प्रतिनिधीत्व दिले जाते.

➢ **ग्रामपंचायत : नवीन ग्रामपंचायत स्थापनेविषयी राज्यसरकार मान्यता देते.**

➢ **सदस्य संख्या :**

| लोकसंख्या | सदस्य |
|---|---|
| 500 – 1500 | 7 |
| 1501 – 3000 | 9 |
| 3001 – 4500 | 11 |
| 4501 – 6000 | 13 |
| 6001 – 7500 | 15 |
| 7501 – पुढे | 17 |

**ही सदस्य संख्या जिल्हाधिकारी निश्चित करतात.**

**भारतामध्ये ग्रामपंचायतीची सदस्य संख्या ५ ते ३१ इतकी आहे.**

- **निवडणूक पद्धत :–** प्रत्यक्ष व गुप्त मतदान – प्रौढ मताधिकार
- जिल्हाधिकारी हे राज्य निर्वाचन आयोगाचे प्रतिनिधी म्हणून जिल्हयातील ग्रामपंचायतीच्या निवडणूका घेतात.

❑ **कार्यकाल :–** 5 वर्षे

- राज्यशासनाकडून कार्यकाल जास्तीत जास्त 6 महिने इतका वाढवता येतो.
- निवडून आलेल्या सदस्यांना 'पंच' म्हणतात.
- ग्रामपंचायतच्या वार्डाची संख्या व राखीव जागा जिल्हाधिकारी ठरवतो). मात्र घोषित तहसीलदार करतो.
- ग्रामपंचायती बरखास्त करण्यात आल्यास एका महिन्यांच्या कालावधीत फेरनिवडणूका घेणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे.

Reliable Academy 9222333999

❑ पात्रता :

- 21 वर्षे पूर्ण झालेले असावे.
- त्या व्यक्तीला दोनपेक्षा जास्त अपत्य असता कामा नये. (2005 चा लहान कुटुंब अधिनियम नुसार)
- तो व्यक्ती संबंधित गावाचा रहिवाशी असावा.
- कोणत्याही सरकारी सेवेत नसावा.
- ग्रामपंचायतीचा थकबाकीदार नसावा.
- स्वत:च्या राहत्या घरी स्वच्छता गृह असणे बंधनकारक

❑ अमानत रक्कम :

खुला प्रवर्ग – ५०० रु., अनु.जाती / अनु.जमाती – १०० रु.

❑ सरपंच :– (आता ऑक्टोंबर 2017 पासून सरपंच थेट निवडला जाईल.)

1) गावातील सर्व नोंदणीकृत मतदार मतदान करतील
2) सरपंच हे पद क्रमवार आरक्षण पद्धतीने दिले जाते. ;ठल त्वजंजपवदद्ध
3) आरक्षण फक्त सरपंच पदाला लागू आहे, उपसरपंच पदाला नाही.
4) सरपंच पदाची निवडणूक प्रत्यक्ष रित्या होते.

❑ अमानत रक्कम :

खुला प्रवर्ग – ५०० रु., अनु.जाती / अनु.जमाती – २५० रु.

❑ कार्यकाल :– सरपंच उपसरपंचचा कार्यकाल :

1) 5 वर्षे, मुदतीपूर्व राजीनामा देऊ शकतात.
2) मृत्यू, अथवा सदस्यत्व रद्द केल्यास पद रिक्त होते.

❑ अविश्वासाचा ठराव :–

- अकार्यक्षमता व गैरव्यवहार या कारणामुळे सरपंच व उपसरपंचवर अविश्वासाचा ठराव मांडता येतो.
- निवडणूकीनंतर 2 वर्षे अविश्वासाचा ठराव मांडता येत नाही.
- 6 महिने बाकी ठराव मांडता येत नाही.

## बडतर्फी

1) सरपंच, उपसरपंच यांना गैरवर्तन व कामात दिरंगाई या कारणामुळे पदावरून काढले जाते. हे अधिकार जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीस आहेत.

2) सरपंच व उपसरपंचावरील आरोपाची चौकशी करतात, आरोपात तथ्य आढळल्यास सरपंच व उपसरपंचांना बडतर्फ केले जाते.

3) गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्यास सदस्यत्व रद्द होऊ शकते.

4) या विरोधात 30 दिवसांच्या आत वि. आयुक्ताकडे दाद मागता येते. वि. आयुक्ताकडे समाधान न झाल्यास राज्यशासनाकडे दाद मागता येते.

## सरपंच राजीनामा

सरपंचाने राजीनामा दिल्यानंतर पंचायत समितीने तो मंजूर करण्याआधी जर ग्रामसभेत सरपंचाविरुध्द अविश्वासाचा ठराव मांडला आणि तो बहुमताने पारित झाला तर सरपंचास पदावरुन दूर करता येते असा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने दिला आहे. त्यामुळे ग्रामसभा अधिकार याबाबत अधिक व्यापक झाले आहेत व त्याद्वारे बहुमताचा विश्वास गमावल्यानंतरही पदावर राहण्याचा सरपंचाचा मार्ग बंद केला आहे.

Reliable Academy 9222333999

## सरपंचाची कार्ये

- सरपंच हा ग्रा. प. ची राजकीय व कार्यकारी प्रमुख असतो.
- ग्रामपंचायतीच्या सभांचे कामकाज सरपंचाच्या अध्यक्षतेखाली होत असते.गावाच्या कारभारावर त्याचे प्रत्यक्ष नियंत्रण असते.
- गावातील विकासाची कामे त्याच्या देखरेखी खाली केली जातात.ग्रामसभेच्या बैठकीचे अध्यक्षस्थान स्वीकारणे.
- ग्रामपंचायत ठरावाप्रमाणे त्या ठरावांची प्रत्यक्ष कार्यवाही करणे.
- पुढील आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक चालू वर्षी ३१ डिसेंबरपूर्वी पंचायत समितीकडे पाठविणे.
- ग्रामपंचायतीची मालमत्ता व लेखे यावर देखरेख ठेवणे व मालमत्तेचे आणि निधीचा अपव्यय होणार नाही याची काळजी घेणे,ग्रामनिधीवर लक्ष ठेवून त्याचा गैरवापर टाळणे,उत्पन्नाचे दाखले देणे.
- जिल्हा परिषद, पंचायत समिती किंवा शासन यांनी ग्रामपंचायतीवर सोपविलेली कामे पार पाडणे,लेखा परीक्षण अधिकाऱ्यांनी बोलविल्यास त्यांची भेट घेऊन चर्चा करणे, शंकांची पूर्तता करणे.
- स्थायी समिती, पंचायत समिती, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांनी कायद्यान्वये सांगितलेली कामे पूर्ण करणे.

## मानधन

- ग्रामपंचायतच्या उत्पन्नाच्या 2 %किंवा 6000 यापैकी जे कमी असेल ते मानधन.
- सरपंचाला अतिथी भत्ता ग्रा. प. च्या उत्पन्नातून २% किंवा ६०० रु. भेटतो.

## महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम – १९५८

**सरपंच थेट जनतेमधुन निवडले जाणार** (कलम ३०अ - १अ)

❑ **सरपंच थेट जनतेमधुन निवडण्यामागची कारणे :**

१. पुर्वी १/३ (एक तृतीयांश) ने अविश्वास ठराव मांडून सरपंचावर अविश्वास ठराव आणला जाई.
२. परिणामी सदस्य वारंवार असा ठराव मांडत.
३. ज्यामुळे सरपंचाच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो आणि पंचायतीच्या कामकाजात अडथळा निर्माण होत असे.

❑ **सरपंच थेट जनतेमधुन निवडण्याचे फायदे :**

१. पंचायतीच्या कामकाजामध्ये स्थैर्य प्राप्त होईल.
२. पंचायतीच्या परिणामकारक कामकाजासाठी व विकासासाठी सरपंचाचे पद सक्षम बनेल.

❑ **पात्रता :**

१. प्रत्येक सार्वजनिक निवडणुकीकरता किंवा पोट निवडणुकीकरता नामनिर्देशित करण्यासाठी निश्चित केलेल्या दिनांकास मतदार यादीत नाव असलेली आणि वयाची २१ वर्षे पूर्ण असलेली व्यक्ती त्या गावाच्या कोणत्याही प्रभागासाठी आणि सरपंच पदासाठी निवडुन येण्यास अर्ह (पात्र) असेल.
२. १ जानेवारी १९९५ रोजी किंवा त्यानंतर जन्मलेली व्यक्ती किमान ७ वी (सातवी) उत्तीर्ण असावी किंवा त्यास समतुल्य शैक्षणिक अर्हता प्राप्त केलेली असावी.

❑ **राजीनामा :** सात दिवसांच्या आत सचिवाकडे अग्रेषित करील.

Reliable Academy 9222333999

❑ **निवड :**

१. पंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीबरोबरच सरपंचाची निवडणुक घेण्यात येईल.

२. ग्रामपंचायत मतदार यादीत नाव असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून सरपंचाची निवड

३. कोणत्याही कायद्याने अपात्र ठरवलेले नसावे.

४. निवडणुकीच्या वेळी कोणीही सरपंच निवडला गेला नाही तर, सरपंच निवडण्यासाठी नव्याने निवडणुक घेण्यात येईल.

नव्याने घेतलेल्या निवडणुकीमध्येही सरपंचाची निवड झाली नाही तर, अशी रिक्त जागा निवडून आलेल्या पंचायत सदस्यांद्वारे त्यांच्यामधुन निवडणुकीद्वारे भरण्यात येईल. (या पद्धतीने निवडलेल्या सरपंचाचा कालावधी हा पंचायतीच्या सदस्याइतकाच असेल.)
सरपंचाच्या निवडणुकीत समसमान मते पडल्यास निवडणुकीचा निकाल, 'राज्य निवडणुक आयुक्ताद्वारे किंवा त्या प्रयोजनार्थ त्याने नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याद्वारे चिट्ठया टाकून ठरवण्यात येईल.

❑ **निवडीबाबत अपिल :**
दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ / वरिष्ठ) अर्ज करता येईल.

❑ **उपसरपंच निवड :**

१. ज्या पंचायतीचा सरपंच थेट निवडून दिलेला असेल त्या पंचायतीच्या संबधात प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर घेण्यात आलेल्या पहिल्या सभेमध्येच उपसरपंचाची निवडणुक घेण्यात येईल.
२. उपसरपंच निवडणुकीत समसमान मते पडल्यास सरपंच निर्णायक मत देणार. (सरपंच पद रिक्त असल्यास निकाल पीठासीन अधिकारी निर्धारित करतील अशारितीने त्यांच्या समक्ष चिट्ठी टाकून देण्यात येईल.)

❑ **अविश्वास ठराव – सरपंच / उपसरपंच :**

१. ग्रामपंचायतीच्या सभेत उपस्थित असणाऱ्या व मतदानाचा हक्क असणाऱ्या एकूण सदस्य संस्थेच्या २ / ३ च्या बहुमताने ठराव मांडता येईल.
२. पंचायतीच्या कोणत्याही सभेस उपस्थित राहण्याचा व मतदानाचा हक्क असणाऱ्या एकूण संख्येच्या ३ / ४ (तीन चतुर्थांश) ने संमत व्हावा.
३. सदर अविश्वास ठराव हा जिल्हाधिकाऱ्याने या प्रयोजनार्थ नियुक्त केलेल्या अधिकाऱ्याच्या अध्यक्षतेखाली त्याच्या समक्ष विशेष ग्रामसभेसमोर गुप्त मतदानाद्वारे संमत झाल्यास सरपंच / उपसरपंच त्यांचे अधिकार, कार्य व कर्तव्ये ताबडतोब थांबवतील.
४. अविश्वास ठराव फक्त सरपंचाविरुद्ध असेल तर त्यानंतर त्याचे अधिकार उपसरपंचाकडे विहीत होतील.
५. निवडणुकीच्या दिनांकापासून २ वर्षाच्या कालावधीच्या आत आणि पंचायतीची मुदत समाप्त होणाऱ्या दिनांकाच्या लगतपुर्वीच्या ६ (सहा) महिन्यांच्या आत असा कोणताच अविश्वास प्रस्ताव आणला जाणार नाही.
६. अविश्वासाचा प्रस्ताव निष्फळ ठरल्यास त्यानंतर पुढील दोन वर्षाच्या कालावधीत असा कोणताही प्रस्ताव आणला जाणार नाही.

❑ **मतदारांमार्फत सरपंचाची बडतर्फी –**

१. ग्रामपंचायतीचे वार्षिक खर्च ग्रामसभेसमोर सादर न केल्यास किंवा त्याची माहिती सुचना फलकावर न लावल्यास.

२. ग्रामपंचायतीचे कर भरलेल्या एकूण मतदारांपैकी २०% मतदारांनी तक्रार केली तर.

३. अशा पद्धतीने अपात्र ठरलेल्या सरपंच / उपसरपंच हे पुढील ६ (सहा) वर्षे निवडणुकीसाठी अपात्र असेल.

❑ **सरपंच रिक्त पद –**

- 'सरपंचाचे पद रिक्त झाल्याच्या दिनांकापासून ६ (सहा) महिन्यात निवडणुक घेऊन पद भरावे.

Reliable Academy 9222339099

## ग्रामसभा

- निवडणुकीनंतरच्या सर्व ग्रामसभांच्या अध्यक्षस्थानी सरपंच असेल.
- त्याच्या अनुपस्थितीत उपसरपंच अध्यक्षस्थानी असेल.
- या दोघांच्या अनुपस्थितीत ग्रामसभेच्या त्या सभेत उपस्थित असलेला वयाने सर्वात जेष्ठ असणारा पंचायतीचा सदस्य अध्यक्षस्थानी असेल.
- जर पंचायतीचा कोणताही सदस्य उपस्थित नसेल तर ग्रामसभेच्या त्या सभेत, उपस्थित असलेल्या व्यक्तींनी आपल्यामधून निवडून दिलेली व्यक्ती अध्यक्षस्थानी असेल.
- सरपंच हा पंचायतीचा पदसिद्ध सदस्य असेल.

❑ **ग्रामविकास समित्या –**
अध्यक्ष – सरपंच (पदसिद्ध)
सचिव - ग्रामसेवक (पदसिद्ध)

❑ **आरक्षण –**
व्यक्तींसाठी व स्त्रियांसाठी पंचायतीमध्ये सरपंच पदासाठी आरक्षण असेल.

## सरपंचाची कार्ये / कर्तव्ये / अधिकार

- पंचायतीच्या सभांच्या कार्यसुचीस अंतिम रुप देणे.
- अ) पण जर तीन किंवा त्यापेक्षा जास्त सदस्य कार्यसूचीवर कोणत्याही बाबींचा समावेश करण्याची मागणी करत असतील, ती कार्यसूची सरपंच पुढील सभेत समाविष्ट करेल.
- आ) कोणतेही अनौपचारिक वित्तीय कामकाज हे अग्रेषित कार्यसूचीचा भाग असल्याखेरीज चालविले जाणार नाही.
- इ) सरपंचाच्या मते पंचायतीचा कोणत्याही विषयावरील ठराव हा त्या गावाच्या व्यापक हितास बाधक ठरणारा असेल तर सरपंच तो ठराव लगतनंतरच्या पुढील ग्रामसभेपुढे अंतिम निर्णयासाठी ठेवण्याची व्यवस्था करील आणि त्यावरील ग्रामसभेचा निर्णय अंतिम राहील.
- पंचायतीचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे.
- पंचायतीशी विचारविनिमय करुन योजना राबवण्यासाठी इतर सर्व अधिकारांचा वापर करणे.

## अंदाजपत्रकासंदर्भात सरपंचाचे कर्तव्य

खर्चाचे विवरण सरपंच प्रत्येक वर्षाच्या ५ जानेवारी (पाच) रोजी किंवा त्यापुर्वी निर्धारित करेल.
अ) निधीतील प्रारंभिक शिल्लक व पुढील वित्तीय वर्षासाठी पंचायतीची अंदाजित प्राप्ती.
ब) अस्थापनेसाठी व आपली कर्तव्ये पार पाडण्यासाठी योजलेला खर्च.
क) जिल्हा ग्रामविकास निधीला द्यावयाची अंशदानाची रक्कम. ('या अन्वये तयार केलेले विवरणपत्र सरपंच पंचायत समितीसमोर ठेवील.)
अशा विवरणांना ग्रामपंचायत ३१ जानेवारी किंवा त्यापुर्वी त्याच्या शिफारशींना अंतिम स्वरुप देतील. (अंतर्गत)
अंतर्गत पंचायतीच्या शिफारशींसह ते विवरण ग्रामसभेपुढे तिच्या अनुसमनार्थ ठेवण्यात येईल. त्यास ग्रामसभा २८ फेब्रुवारी किंवा त्यापुर्वी अनुसमर्थन देईल.
ग्रामसभेच्या निर्णयानंतर सदर विवरण पंचायत समितीला सादर करण्यात येईल.
विहित करण्यात आलेल्या दिनांकापूर्वी –
अ) सरपंचाने विवरण सादर न केल्यास, किंवा
ब) पंचायतीने सदर विवरणास शिफारशी न दिल्यास, किंवा
क) ग्रामसभेने सदर शिफारशीस अनुसमर्थना बाबतचा निर्णय न घेतल्यास - असे विवरण ग्रा. पं. सचिव म्हणजेच 'ग्रामसेवक' तयार करील व पं. स. ला सादर करील.
पंचायत समिती अशा विवरणास ३१ मार्च रोजी किंवा त्यापुर्वी / विवरण मिळण्याच्या दिनांकापासून दोन महिन्यात परवानगी देईल / किंवा खर्च कमी किंवा वाढवण्याचा निर्देश देईल.
पंचायत समितीने मान्यता दिलेल्या विवरणपत्रात जर सुधारित किंवा पुरक बदल करावयाचे असतील तर त्यास मुळ विवरणपत्र समजुन वित्तीय वर्षात कोणत्याही वेळी मान्यता देण्यात येईल.

Reliable Academy 9922333999

## प्रस्तावित सुधारणांची ठळक वैशिष्टये

१. पंचायतीच्या पात्र मतदारांकडून गुप्त मतदान पद्धतीने सरपंचाची निवड करण्यात येईल.
२. सरपंच, पंचायतीच्या सर्व ग्रामसभांचा आणि ग्रामविकास समित्यांचा अध्यक्षस्थानी असेल.
३. सरपंचाविरुद्ध, पंचायतीकडून जर अविश्वासाचा ठराव मंजूर केला असेल तर तो, अनुसमर्थनासाठी ग्रामसभेसमोर ठेवण्यात येईल.
४. अर्थसंकल्प तयार करण्याची जबाबदारी सरपंचाकडे असेल.
५. निवडून दिलेला सरपंच हा आपल्या गावातील लोकांना थेट जबाबदार असेल.

❑ आरक्षण खालीलप्रमाणे ठरवतात.

| वर्गवारी | % लोकसंख्येच्या प्रमाणात |
|---|---|
| Sc / ST | २७ % |
| महिला | ५० % |

❑ उपसरपंच :
१. सरपंच जेव्हा १५ दिवसापेक्षा अधिक दिवस गैरहजर असेल तर त्याचे काम कार्यालयीन काम उपसरपंच पार पाडतो.
२. सरपंच, उपसरपंच सलग तीन महिने गैरहजर राहिल्यास त्यांची चौकशी जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी करतो. त्याच्या विरुद्ध तीस दिवसांच्या आत विभागीय आयुक्ताकडे अपील करावे लागते.

❑ **उपसरपंचाची कार्ये :– (ग्रामसभाचे अध्यक्ष स्थान स्विकारतील.)**
1) सरपंचाचे अनुपस्थितीत उपसरपंच हा सरपंचाची कर्तव्ये पार पाडीत असला तरी त्यास ग्रामपंचायत ठरावाशिवाय कोणतीही रक्कम अदा करता येत नाही.
2) सेवकांचे पगार सोडून इतर प्रकारच्या देण्याचे चेक देऊ नयेत.
3) ग्रामपंचायतीला एखाद्याचे पैसे परत करण्यास मंजुरी देऊ नये.
4) सरपंचांचे आदेश रद्द करु नयेत./त्यात बदल करु नयेत.
5) चालू कामे बंद करु नयेत. याबाबत पंचायत विस्तार अधिकाऱ्यांशी चर्चा करुन बेकायदेशीर गोष्टी समजून घ्याव्यात.

❑ **रजा :**
१. सरपंच सलग ४ महिन्यापर्यंत विनापरवानगी गैरहजर राहू शकतो
२. सरपंचाला ६ महिन्यापर्यंतची रजा ग्रामपंचायतीद्वारे मंजूर केली जाते.

❑ **ग्रामपंचायतीची उत्पन्नाची साधने :–**
1)ग्रामपंचायत मार्फत आकारले जाणारे कर.
2)जमिन महसूल कर.
3)इमारती व जमिनीवरील कर.
4)जमिन सुधारणा कर.
5)यात्रा कर, व्यवसाय कर.
6)पाणी पट्टी कर, दिवाबत्ती कर.
7)कोंडवाडा कर, मच्छिमारी कर व सरकारी अनुदाने.

- वरील सर्व करातून मिळणारे उत्पन्न ग्रामनिधी म्हणून ओळखले जाते.
- ग्रामपंचायतचे आर्थिक वर्ष हे 1 एप्रिल पासून सुरू होते.
- राज्याच्या कोषागारातून जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायतीला अनुदान मिळते.
- ग्रामपंचायतीने मांडलेले अंदाजपत्रक पंचायत समिती मंजूर करते.
- मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 62 नुसार ग्रामपंचायतीस अंदाजपत्रक पंचायत समिती पुढे सादर करावे लागते.

Reliable Academy 9222333999

# ग्रामपंचायतमधील सभा

## ग्रामपंचायत सदस्यांची सभा

- ग्रामपंचायत सदस्यांची दरमहा एक सभा होणे आवश्यक आहे.
- या सभेची नोटीस सरपंचाच्या सहीने (तो नसल्यास उपसरपंचाच्या सहीने) काढली जाते.सदर नोटीस ग्रामसेवक स्वतः सदस्यांना घरी नेऊन देतो. (3 दिवस अगोदर)
- जर सदस्य घरी नसेल तर घरातील प्रौढ व्यक्ती ती नोटीस स्वीकारू शकते. तसे न केल्यास घरावर चिटकवली जाते.ग्रा. प. ची बैठक ग्रामपंचायतीच्या कार्यालयात म्हणजे चावडीत बोलवतात
- ग्रामसभेच्या वर्षातून 4 बैठका बोलावल्या जातात. या सभा 26 जानेवारी किंवा 15 ऑगस्ट, 1 मे, 2 ऑक्टोबर या दिवशी स्थानिक गावात ग्रामसभा बोलावण्याचा अधिकार हा ग्रामपंचायतीच्या सरपंचाला असतो. सरपंच हा ग्रामसभेचा अध्यक्ष असतो.
- सरपंचाच्या गैरहजेरीत उपसरपंच आणि दोघांच्या गैरहजेरीत गटविकास अधिकारी हा ग्रामसभा बोलावू शकतो. हया ग्रामसभेची गणपुर्ती घेण्यासाठी त्या गावातील 100 मतदान ग्रामसभेला हजर राहणे आवश्यक असते किंवा एकूण मतदारापैकी 1/20 टक्के मतदार ग्रामसभेला उपस्थित असणे आवश्यक आहे. अन्यथा ग्रामसभेची बैठक रद्द समजली जाते व त्याच दिवशी पुढील सभेची तारीख निश्चित केली जाते.

## गणसंख्या :–(सदस्य सभाची गणसंख्या)

- सरपंच व उपसरपंच धरून निम्म्यापेक्षा जास्त सदस्य उपस्थित असावे.
- अध्यक्ष – सरपंच, उपाध्यक्ष – उपसरपंच, सचिव – ग्रामसेवक

1) अध्यक्षपदी सरपंच उपस्थित नसतील तर उपसरपंच अध्यक्ष होतात. उपसरपंचही नसतील तर ज्येष्ठ सदस्य अध्यक्ष होतात.
2) पण सभा चालू असताना सरपंच आल्यास अध्यक्षपद त्यांना बहाल करावे लागते.

## हिशोब तपासणी

- ग्रा. प. ची हिशोब तपासणी जि. प. कडून वर्षातुन २ वेळा केली जाते.
- ग्रामपंचायतीचे आर्थिक वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च हे आहे.
- जर ग्रामपंचायतीचे वार्षिक उत्पन्न ५०००/- रुपयापेक्षा कमी असेल तर अशा ग्रामपंचायतीची हिशोब तपासणी जिल्हा परिषदेमार्फत केली जाते.
- जर ग्रामपंचायतीचे उत्पन्न ५०००/- रुपयापेक्षा अधिक असेल तर अशा ग्रामपंचायतीची हिशोब तपासणी स्थानिक निधी लेखापालामार्फत केली जाते.
- ग्रामपंचायतीची कार्यालयीन तपासणी करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकार (CEO) यांना आहेत.

❑ **ग्रामसभा –** ग्रामसभा घटनात्मक तरतूद : 243 (I) :–

ग्रामशिक्षण समितीची निवड करते. (स्त्रिया 50 %)

1)मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 कलम 7 नुसार ग्रामसभेची तरतूद आहे.

2)ग्रामसभेचे अध्यक्ष – आता सर्व ग्रामसभांचा सरपंच, उपाध्यक्ष – उपसरपंच, दोघेही नसल्यास ज्येष्ठ नागरिक.

३)ग्रामपंचायत ही ग्रामसभेची कार्यकारी समिती असते.

❑ **ग्रामसभेचे अधिकार व कार्ये :**

- ग्रामपंचायतीला मार्गदर्शन व सूचना करणे.
- अंदाजपत्रकाला व हिशोबाला मंजुरी देणे.
- गावातील विकास काम निश्चित करणे.
- ग्रामपंचायतीच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
- गावकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देणे.
- ग्रामशिक्षण समितीचे निवड करणे.

❑ **सदस्य (ग्रामसभेतील) –**18 वर्षावरील मतदानाचा हक्क असलेली प्रौढ व्यक्ती.

❑ **गणसंख्या :–**

1)एकूण प्रौढ व्यक्तीच्या 15% किंवा 100 यापैकी जी संख्या कमी असेल ती संख्या.

Reliable Academy 9422338999

2)बलवंतराय मेहता समितीच्या शिफारशीनुसार ग्रामसभा बोलवण्यासाठी सणांचा आधार घेण्यात आला होता. यात प्रामुख्याने होळी, दिवाळी, गुढीपाडवा, पोळा हे सण येत होते.
महाराष्ट्र शासनाने 2003 पासून 4 ग्रामसभा घेणे गरजेचे आहे असे सांगितले आहे.
(1) 26 जानेवारी (2) 1 मे (3) 15 ऑगस्ट (4) 2 ऑक्टोबर (5) 8 मार्च
(6) ग्रामपंचायत स्वतः ठरवते. → या दोन्हीं ऐच्छिक ग्रामसभा आहेत.
ग्रामसभा घेण्यापूर्वी कोतवालामार्फत गावात दवंडी पिटवली जाते व ग्रामपंचायत कार्यालयावर तशी नोटीसही लावली जाते. ही प्रक्रिया सभेपूर्वी 5 दिवस अगोदर व 2 दिवस अगोदर अशी 2 वेळा घेतली जाते.

### ❑ महिला ग्रामसभा :–
1) या ग्रामसभा मुख्य ग्रासभेच्या अगोदर घेतल्या जाव्यात.
2) या ग्रामसभेला गणसंख्येची अट नाही.
3) या ग्रामसभेत मंजुर झालेले विषय मुख्य ग्रामसभेत चालले जातात.

### ❑ ग्रामपंचायतचे कार्य :–
- ग्रामपंचायत एकूण 79 विषय हाताळते.
- सार्वजनिक आरोग्य यावर लक्ष ठेवणे.
- उदा. साथीच्या रोगाविरूद्ध लसीकरण, दिवाबत्तीची सोय, पेयजल पुरवठा, लघुपाटबंधारे बांधणे, कुटीरउदयोग, ग्राम उद्योगांना प्रोत्साहन, महिला बचत गटाची स्थापना करणे, आर्थिक सक्षमीकरण, कृषिसाक्षरता, प्रौढ साक्षरता इ.

### ❑ ग्रामपंचायतची बरखास्ती :–
1)मुदतीपूर्व ग्रामपंचायत बरखास्त करण्याचा अधिकार राज्यशासनास आहे.
2)मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958, कलम 145 नुसार राज्यशासन ग्रामपंचायत बरखास्त करू शकते.
3)अधिकाराचा दुरूपयोग, कर्तव्यात शिथिलता, दफ्तर दिरंगाई ही बरखास्तीची कारणे आहेत.
4)जर निम्म्यापेक्षा जास्त सदस्य रिक्त झाले तर ग्रामपंचायत बरखास्त होते व 6 महिन्यात पुन्हा निवडणूका घ्याव्या लागतात.

## ग्रामसेवक

- ❖ तरतूद :– मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 मधील कलम 60 प्रमाणे प्रत्येक गावासाठी किंवा दोन, तीन गावासाठी 1 ग्रामसेवक अशी तरतूद आहे.
- ❖ निवड :– जिल्हा निवड मंडळ,
- ❖ नियुक्ती–(CEO)
- ❖ निलंबन, बदली व बढती :–(CEO)
- ❖ नजीकचे नियंत्रण :–(BDO)

1)ग्रामसेवक हा ग्रामपंचायतचा नोकर नसून चिटणीस (सचिव) आहे.
2)अपवादात्मक परिस्थितीमध्ये दोन गावासाठी एक ग्रामसेवक दिला जातो.

- ❖ वेतन :– जिल्हानिधीतून

ग्रामसेवक हा ग्रामविकास खात्याचा वर्ग 3 चा कर्मचारी

### ❖ कार्य :–
- ग्रामपंचायतच्या नोकरवर्गावर नियंत्रण.
- ग्रामपंचायतने संमत केलेल्या ठरावाची अंमलबजावणी.
- मागील वर्षाचे ग्रामपंचायतीचे हिशोब व ऑडिट अहवाल मंजूर केले जातात.
- खेडयातील उत्पादन व्यवस्थेची योजना मंजूर केली जाते.
- पाणीपट्टी व घरपट्टीची वसूली.
- ग्रामविधी सांभाळणे.
- ग्रामसभेत उपस्थित राहून इतिवृत्तांत लिहिणे.
- विस्तार अधिकाऱ्यांच्या सल्ल्यावरून इतर योजनांची माहिती ग्रामसेवक देतो.
- विवाह व जन्म–मृत्यूची नोंद.

Reliable Academy 9222333999

- ग्रामसेवक हा ग्रामस्तरावरील बालविवाह प्रतिबंधक अधिकारी असतो.
- ग्रामपंचायतचे दफ्तर सांभाळणे व ग्रामपंचायत अंतर्गत येणारे सर्व आर्थिक व्यवहार यांचा हिशोब ठेवणे.
- ग्रामशिक्षण समितीचे निवड करणे.

## ❖ मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील काही महत्वाची कलमे :

- कलम ४- गाव जाहीर करणे
- कलम ५ – प्रत्येक खेडयासाठी ग्रामपंचायतीची तरतुद
- कलम ७ – एका आर्थिक वर्षात ग्रामसभेच्या किमान ४ बैठका होणे बंधनकारक
- कलम १० (१) - ग्रामपंचायतीची सदस्य संख्या ७ ते १७ ठरवून दिलेली आहे.
- कलम ३ – सरपंच व उपसरपंच यांना गैरवर्तणूकीबद्दल पदावरुन दुर करण्याचा हक्क जिल्हा परिषदेच्या स्थायी समितीला आहे.
- कलम ३४ – सरपंच / उपसरपंच यांचा राजीनामा
- कलम ३५ – सरपंच / उपसरंपंच यांच्यावर अविश्वासाचा ठराव
- कलम ३८ – सरपंचाचे अधिकार व कार्ये
- कलम ५७ - ग्रामनिधीची तरतूद
- कलम ६० - ग्रामसेवकाविषयीची तरतूद
- कलम १४५ - ग्रामपंचायत अकार्यक्षम ठरल्यास ती विसर्जित करण्याचा अधिकार राज्यशासनाला आहे.

## ग्रामपंचायतीबद्दल संकीर्ण माहिती

- आंध्रप्रदेशात ग्रा. प. सदस्यांची संख्या ५ ते १७ आहे. तर उत्तरप्रदेशात सर्वात जास्त म्हणजेच १६ ते ३१ इतकी आहे.
- गोळा होणाऱ्या प्रत्यक रुपया शेतसाऱ्यामागे ग्रामपंचायत २० पैसे सेस ( ॲडिशन टॅक्स) आकारते.
- ग्रामपंचायत निवडणूक झाल्यानंतर निवडून आलेल्या सदस्यांची यादी जिल्हाधिकारी प्रसिद्ध करतात.
- ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गौण खनिजाच्या झालेल्या विक्रीतून २०% हिस्सा ग्रामपंचायतीला मिळतो.
- महाराष्ट्रातील सर्वात श्रीमंत ग्रामपंचायत अकलूज (सोलापूर ) ही आहे.
- महाराष्ट्रात अरगाव (कोकण ) या ठिकाणच्या ग्रामपंचायतीमध्ये सर्व सदस्य महिला आहेत.
- महाराष्ट्रात सर्वात जास्त ग्रामपंचायती सातारा जिल्हयात आहेत.
- ग्रामपंचायतीच्या एकूण खर्चापैकी आरोग्य व स्वच्छतेवर ३६% खर्च, सार्वजनिक बांधकामावर ३३% खर्च, तर प्रशासनावर १५% ते१०% रक्कम महिला विकासावर खर्च करावी लागते.
- भारतात सर्वप्रथम प्रत्येक खेडयात ग्रामपंचायत स्थापनेची शिफारस करणारा आयोग - रॉयल आयोग
- ग्रामपंचायती ठराव रोखण्याचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यास आहेत.
- ग्रामपंचायत स्थापन करण्यासाठी त्या गावातील दरडोई उत्पन्न किमान ३.५० रुपये असणे आवश्यक आहे.

### वेगवेगळ्या राज्यातील ग्रामपंचायतीची नाव

| ग्रामपंचायतीचे नाव | राज्य |
|---|---|
| शहरपंचायत | तामिळनाडू |
| नगरपंचायत | गुजरात |
| गावसभा | उत्तरप्रदेश |
| गाव पंचायत | आसाम |
| पालीसभा | ओडीशा |
| पंचायत | बिहार |

### वार्षिक सभा

| | |
|---|---|
| ग्राम पंचायत | १२ |
| ग्राम सभा | ४ |
| पंचायत समिती | १२ |
| सरपंच समिती | १२ |
| तालुका आमसभा | २ |
| जिल्हापरिषद | ४ |
| जिल्हापरिषद स्थायी समिती | १२ |
| जिल्हा आमसभा | २ |
| नगरपालिका | १२ |
| महानगरपालिका | १२ |

Reliable Academy 9922333999

### ❖ ग्रामरक्षा दल :

गावातील मालमत्तेचे, नागरिकांच्या संपत्तीचे व जीविताचे रक्षण करण्यासाठी व गावात शांतता निर्माण करण्याच्या उद्देशाने हा दल उपयोगी पडतो.

या दलात १८ ते ३० वर्षाच्या तरुणांचा समावेश असतो.

### ❖ ग्राम शिक्षण समिती :

- अध्यक्ष – सरपंच
- सचिव – स्थानिक पातळीचे शाळेचे मुख्याध्यापक

### ❖ कार्य :

१. गावाचे शैक्षणिक कार्य साधुन शिक्षणाचा उद्देश खऱ्या अर्थाने पूर्ण करणे.
२. शिक्षकांच्या उपस्थितीवर नियंत्रण ठेवणे.
३. निवृत्त शिक्षक ,पालक, उच्च शिक्षित ग्रामस्थ इ. या सर्वांचा समितीत समावेश होतो.
४. ग्रामपंचायतीची तपासणी करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा विस्तार अधिकारी यांना असतो.

**पंचायत राज पद्धतीचे सार**

| | |
|---|---|
| एकस्तरीय | जम्मू कश्मीर, मेघालय, मिझोराम, नागालँड |
| चारस्तरीय | त्रिपूरा व आसाम |
| द्विस्तरीय | सिक्कीम व गोवा |
| त्रिस्तरीय | मध्य प्रदेश / आंध्र प्रदेश / बिहार, छत्तीसगढ, गुजरात, हारियाणा, हिमाचल प्रदेश, झारखंड, कर्नाटक, केरळ, महाराष्ट्र, मणिपूर, ओरीसा, पंजाब, राजस्थान, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, उत्तराखंड<br>दिल्लीमध्ये पंचायतराज व्यवस्था नाही. |

| | जिल्हा परिषद | पंचायतसमिती | ग्रामपंचायत |
|---|---|---|---|
| अनामत | सर्वसाधारण - १००० | ७५० | ५०० |
| रक्कम | अनु.जाती/जमाती ७५० | ५०० | १०० |

**राजीनामा**

| कोण | कोणाकडे |
|---|---|
| ग्रामपंचायत सदस्य | सरपंचाकडे |
| सरपंच | पंचायत समिती सभापतीकडे |
| उपसरपंच | सरपंचाकडे |
| पंचायत समिती सदस्य | पंचायत समिती सभापतीकडे |
| जिल्हा परिषद सदस्य | जिल्हा परिषद अध्यक्षाकडे |
| विषय समित्यांचे सभापती | जिल्हा परिषद अध्यक्षाकडे |
| पंचायत समिती सभापती | जिल्हा परिषद अध्यक्षाकडे |
| पंचायत समिती उपसभापती | पंचायत समिती सभापतीकडे |
| जि. प. उपाध्यक्ष | जि. प.अध्यक्षाकडे |
| जि. प. अध्यक्ष | विभागीय आयुक्तांकडे |
| स्थायी समिती सभापती | विभागीय आयुक्तांकडे |
| नगरसेवक | महापौरांकडे |
| उपमहापौर | महापौरांकडे |
| महापौर | विभागीय आयुक्तांकडे |

| घटक | निवड /नियुक्ती | नेमणूक |
|---|---|---|
| C. E. O | U. P. S. C | राज्यशासन |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | (केंद्रीय लोकसेवा अयोग) | राज्यशासन |
| B. D. O | M. P. S. C | राज्यशासन |
| गट विकास अधिकारी | (महाराष्ट्र लोकसेवा आयोग) | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ग्रामसेवक | जिल्हा निवड समिती | मुख्य कार्यकारी अधिकारी |
| DY. CEO | M. P. S. C | राज्यशासन |
| (उप मुख्य कार्यकारी अधिकारी) | (महाराष्ट्र लोकसेवा आयोग) | राज्यशासन |

Reliable Academy 9922333999

❖ यशवंत पंचायत राज अभियान २०१७ :- (सी. विद्यासागर राव.)

- यशवंत पंचायत राज अभियान पुरस्काराचे वितरण १३ एप्रिल २०१७ रोजी मुंबई येथे झाले.

| क्रमांक | जिल्हा परिषद | पुरस्काराचे स्वरुप |
|---|---|---|
| प्रथम | लातूर | ३० लाख रु. स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र |
| द्वितीय | सोलापूर | २० लाख रु. स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र |
| तृतीय | जळगाव | १० लाख रु. स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र |

| क्रमांक | पंचायत समिती | पुरस्काराचे स्वरुप |
|---|---|---|
| प्रथम | पंचायत समिती खानापूर (सांगली) | २० लाख रु. स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र |
| द्वितीय | पंचायत समिती देवगड | १७ लाख रु. स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र |
| तृतीय | पंचायत समिती अचलपूर (अमरावती) | १५ लाख रु. स्मृतिचिन्ह प्रमाणपत्र |

Reliable Academy 9922333999

# 3. पंचायत समिती

## तरतूद

- त्रिस्तरीय पंचायतराज्य व्यवस्थेमध्ये पंचायत समिती हा ग्रामपंचायत आणि जिल्हापरिषद यांना जोडणारा दुवा असतो. जिल्हयाची विभागणी गटांमध्ये केलेली असते. साधारणपणे प्रत्येक तालुका हा विकास गट मानलेला असतो. प्रत्येक विकास गटासाठी पंचायत समिती असते.
- साधारणतः 75 ते 125 खेडे मिळून एक विकास गट म्हणून पं. स. चे कार्य गट स्तरावर आहे.
- महाराष्ट्रात सध्या 356 तालुके आहेत. पण 353 इतक्या पं. स. आहेत. त्यात नागपूर, ठाणे, पुणे शहर, उल्हासनगर हे पूर्णतः नागरी तालुके आहेत. त्यामुळे इथे पं. स. नाहीत.

## रचना

- तालुका किंवा विकास गटातून लोकांनी प्रत्यक्षरीत्या निवडलेले सभासद पंचायत समितीत असतात.
- त्यांची संख्या साधारणपणे त्या विकास गटातून जिल्हापरिषदेवर निवडून गेलेल्या सभासदांच्या
- दुप्पट असते.
- जि. प. पं. स. अधिनियम, 57 व 58 नुसार 17 ते 21 इतके सदस्य असतात.
- जि. प. च्या एका मतदार संघामध्ये पं. स. चे दोन गण (मतदार संघ) असतात.

## सदस्यांची निवड

- सदस्यांची निवड प्रत्यक्ष निवडणूकीद्वारे होते.
- एक सदस्य =20,000 लोकसंख्या.
- 11 ऑक्टोबर 2011 च्या घटनादुरूस्तीनुसार 50% जागा महिलांसाठी राखीव

## सदस्यांची पात्रता

- भारताचा नागरिक असावा.
- वयाची २१ वर्षे पूर्ण असावीत.
- जिल्हयाच्या मतदार यादीत नाव असणे तसेच पंचायत समितीच्या स्वतःच्या घरी स्वच्छता गृह असणे आवश्यक.

## आरक्षण

- महिलांसाठी ५०% जागा राखीव असतात.
- इ. मा. वर्गीयांना – २७%
- अनुसूचित जाती व जमाती यांना लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखीव असतात.
- आरक्षणाच्या जागा निर्धारित करण्याचा अधिकार राज्य सरकारला असतो.

## अनामत रक्कम

सर्वसाधारण – ७५०/- अनु. जाती / जमाती – ५००रु.

## सदस्यांचा राजीनामा

सदस्य आपला राजीनामा सभापतीकडे देतात. सलग तीन महिने अनुपस्थित असल्यास अथवा 6 महिने परवानगीसह अनुपस्थित असल्यास त्याचे सदस्यत्व रद्द होते.

## हिशोब तपासणी

पंचायत समितीची हिशोब तपासणी स्थानिक निधी लेखापालाद्वारे केली जाते.

## पं. स. चा अध्यक्ष व उपाध्यक्ष– सभापती व उपसभापती

- पं. स. मध्ये निवडून आलेल्या सदस्यामधून एकाची सभापती व दुसऱ्याची उपसभापती म्हणून निवड केली जाते.
- सभापतीचा कार्यकाल अडीच वर्षाचा असतो. सभापतीच्या गैरहजेरीत उपसभापती पंचायत समितीचे कामकाज चालवतात. पंचायत समितीच्या पहिल्या बैठकीत जिल्हाधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी अथवा प्रांतअधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समितीचे सभापती व उपसभापती यांची निवड केली जाते.
- पंचायत समितीचे सभापतीपद क्रमवार पद्धतीने दिले जाते.
- उपसभापती या पदाला आरक्षण लागू नाही.

## सदस्यांचा कार्यकाल :– 5 वर्षे

- हा कार्यकाल वाढवण्याचा अथवा कमी करण्याचा अधिकार राज्यशासनास आहे.
- जि. प. व पं. स. च्या निवडणूका एकत्र घ्यावयाच्या असल्यास अथवा आर्थिक आणीबाणी लागू झाली असल्यास 6 – 6 महिन्याच्या टप्प्याने 2 वर्षे वाढवता येतो.
- जर मूदतीपूर्व पं. स. बरखास्त केली असेल तर 6 महिन्याच्या आत निवडणूका घ्याव्या लागतात.

Reliable Academy 9223339999

## निवड प्रक्रिया

1)पं. स. च्या निवडणूकीनंतर 15 दिवसांच्या आत त्या गटाचे प्रांत अधिकारी किंवा जिल्हाधिकाऱ्यांनी प्राधिकृत केलेला. अधिकारी सभापती व उपसभापती निवडीची सभा बोलवतो.
2)या निवडीच्या सभेमेध्ये दोन उमेदवारांना समान मते पडल्यास चिट्‌टया टाकून सभापती निवडतात.
3)निवडीच्या निकालावर असमाधानी उमेदवाराला 7 दिवसांच्या आत वि. आयुक्ताकडे दाद मागता येते.
4)वि. आयुक्ताच्या निर्णयावर समाधान न झाल्यास 30 दिवसांच्या आत राज्य शासनाकडे दाद मागता येते.
5जर संबंधित विकास गटात 50% पेक्षा जास्त लोकसंख्या अनु. जाती, जमातीची असल्यास सभापती व उपसभापती त्यांच्यातून निवडला जातो.

- ➢ सभापतीचे मानधन – 10,000 रू.
- ➢ उपसभापती– 8000 रू. त्याचबरोबर मोफत निवासस्थान
- ➢ राजीनामा – सभापती आपला राजीनामा जि. प. अध्यक्षाकडे, उपसभापती सभापतीकडे
- ➢ सभापतीची कार्ये –

1)पं. स. च्या बैठकांचे अध्यक्षस्थान भूषवणे.
2)पं. स. ची अभिलेख व कागदपत्रे तपासू शकते. 3)BDO वर देखरेख ठेवतो.
४)बैठकीमध्ये महत्त्वपूर्ण विविध योजना मांडून त्यांना मंजुरी मिळवून देणे.
५) पंचायत समितीच्या विविध सदस्यांकडून आवश्यक ती माहित, तक्ते, आराखडे मागवणे व तपासणे.
6)मालमत्ता संपादन व विक्री हस्तांतरण याला मंजुरी देण्याचे अधिकार.

### ❖ रजा :

१. १महिन्याची विनापरवानगी रजा मिळते.
२. ३ महिन्यापर्यंतच्या रजा मंजूरीचा अधिकार पंचायत समितीला असतो.
३. ६ महिन्यापर्यंतची रजा स्थायी समिती मंजूर करते.

### ❖ सभापतीवरील अविश्वासाचा ठराव :–

1)जि. प. व पं. स. अधिनियम कलम 77 नुसार अकार्यक्षमता व गैरव्यवहार या कारणामुळे सभापती व उपसभापतीवर अविश्वासाचा ठराव मांडता येतो.
2)निवडणूकीनंतर 6 महिने अविश्वासाचा ठराव मांडता येत नाही.
3)एकदा ठराव फेटाळल्यानंतर पुढील 1 वर्ष ठराव मांडता येत नाही.

### ❖ प्रक्रिया :–

1)एकूण सदस्यांपैकी 1/3 सदस्यांनी सभापती/उपसभापती यांच्याविरूद्ध अविश्वासाचा ठराव लेखी स्वरूपात मांडल्यास (जिल्हाधिकाऱ्याकडे लेखी) विशेष सभा बोलवली जाते.
2)ही सभा बोलवण्यापूर्वी 7 दिवस अगोदर सभापती व उपसभापतीला पूर्वसूचना देण्यात येते.
3)बोलवलेल्या विशेष सभेचे अध्यक्ष उपजिल्हाधिकारी (प्रांताधिकारी)
4)या विशेष सभेत अविश्वासाचा ठराव 2/3 बहुमताने मंजुर झाल्यास सभापती/उपसभापती यांना पद सोडावे लागते.
5)महिला सभापती बाबत वेगळी तरतूद आहे. मांडण्यासाठी 2/3 व मंजुर होण्यासाठी 3/4.

### ❖ पं. स. च्या सभा :–

1)पहिली सभा प्रांत अधिकारी म्हणजेच उपजिल्हाधिकारी बोलवतो.
2)जि. प. पं. स. अधिनियम 1961 मधील कलम 117 नुसार दोन सभेत 1 महिन्यापेक्षा जास्त अंतर असू नये (दर महा 1 सभा)
3) पंचायत समितीकडे साधारणत: 74 विषय सोपविले असून प्रत्येक सभेच्या वेळी अध्यक्ष म्हणून पंचायत समितीचे सभापती कार्य पाहतात तर सचिव म्हणून गटविकास अधिकारी हे कार्य पाहतात. प्रत्येक सभेचा अहवाल गटविकास अधिकारी तयार करतात.

### ❖ पं. स. साठी वित्तीय तरतुदी व अनुदान :–

1)पं. स. ला स्वत:चे उत्पन्न नाही.
2)पं. स. ला, जि. प. व राज्यसरकारकडून दरवर्षी ठराविक अनुदान मिळते.
3)पं. स. चे आर्थिक वर्ष 1 एप्रिल पासून सुरू होते.

Reliable Academy 9222333999

❖ **पं. स. च्या समित्या :–**
पं. स. ला विषय हाताळते. याची विभागणी 7 समित्यांमध्ये केली आहे. (1 + 6)

❖ **स्थायी समिती**– अध्यक्ष – पं. स. सभापती सचिव – BDO

❖ **सार्वजनिक बांधकाम समिती** – BDO

❖ **शेती समिती** – आपल्या तालुका पातळीवरील शेती क्षेत्राचा विकास करणे, शेती क्षेत्रासाठी आधुनिक पध्दतीचा स्विकार करणे, बियाणे, किटकनाशके, खते, शेतीची अवजारे इत्यादीचे वाटप करणे खरीप व रब्बी पिकांची माहिती देणे. आवश्यकता पडल्यास शेतमालाच्या साठवणुकीसाठी गोदाम तयार करणे.
सचिव – विस्तार अधिकार (शेती)

❖ **आरोग्य व शिक्षण समिती :–**
- आपल्या तालुका पातळीवरील नागरिकांच्या आरोग्य व शिक्षणाची काळजी घेणे हे पंचायत समितीचे महत्वाचे कार्य म्हणून ओळखले जाते.
- आपल्या गटात काही साथीचे रोग, हिवताप, मलेरिया, कावीळ किंवा इतर संसर्गजन्य रोग असल्यास त्यावर प्रतिबंध करणे हा पंचायत समितीच्या अधिकारातील एक महत्वाचा भाग असतो
- शिवाय आपल्या तालुका गटातील गावांना पाणीपुरवठा करणे. आरोग्याच्या बद्दल जनतेला साक्षर करणे शिवाय आपल्या तालुका गटातील केंद्र व राज्य सरकारच्या शिक्षण विषयक विविध योजना राबवणे व त्यावर नियंत्रण इत्यादी महत्वाची कामे पंचायत समितीला करावे लागते.
- आरोग्य समिती – सचिव – विस्तार अधिकार (आरोग्य)
- शिक्षण समिती – सचिव – गट शिक्षण अधिकारी

❖ **समाज कल्याण समिती :–** आपल्या गटातील मागासवर्गीयांसाठी विशेष योजना रावबणे, शासनाची सबसिडी किंवा काही आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे, जातीभेद निर्मुलन, करुन आंतरजातीय विवाहाला प्रोत्साहन देणे इत्यादी विविध प्रकारची कार्ये पंचायत समितीला करावी लागते. सचिव – विस्तार अधिकारी (समाजकल्याण)

❖ **पशुसंर्वधन व दळणवळण समिती :–**
आपल्या तालुका पातळीवर शेतीच्या विकासासोबतच पशुसंवर्धन व दुग्धविकास इत्यादीबद्दल विशेष योजना राबवणे, आपल्या विभागातील पशुंसाठी वैद्यकिय सुविधा पुरवणे, जनावरांचे प्रदर्शन भरवणे, पशुमध्ये उत्तम प्रकारच्या पशुपैदाशीस उत्तेजन देणे, चारा उपलब्ध करुन देणे, गरीब, दारिद्रय
शेतकऱ्यांना जनावराचे वाटप या सोबतच आपल्या विभागातील रस्ते तयार करणे, दुरुस्ती व त्यावर नियंत्रण ठेवणे, गृहबांधणी, नाला, पुल, तलाव बांधणे हे देखील पंचायत समितीच्या अखत्यारीतील महत्वाचे विषय म्हणून ओळखले जातात.

❖ **पं. स. सरपंच समिती :–**
- तालुक्यातील पंचायत समिती व ग्रामपंचायतीशी योग्य समन्वय राहावा. यासाठी सरपंच समिती स्थापली गेली.
- ल. ना. बोंगिलवार समितीने सरपंच समितीची शिफारस केली होती.
- कार्यकाल – १ वर्षे – पात्रता – सदस्याने आपल्या वयाची २५ वर्षे पूर्ण केलेली असावीत.
- तालुका स्तरावर विकास योजना राबवताना जिल्हा परिषदेला शिफारशी करणे.
- प्रत्येक गटातील एकूण 15 सरपंच किंवा गटातील एकूण सरपंचाच्या 1/5 यापैकी जी संख्या
- मोठी असेल त्या सरपंचाचा या समितीमध्ये समावेश केला जातो.
- अध्यक्ष –पं. स. चा उपाध्यक्ष हा सरपंच चा अध्यक्ष असतो. (पदसिद्ध)
- सचिव – विस्तार अधिकारी (शेती)

❖ **आमसभा (तालुका आमसभा) :–**
- पंचायत समितीच्या विकास कामाचा वार्षिक आढावा घेण्यासाठी आमसभा बोलावली जाते.
- या सभेला सामान्य जनतेची सभा असेही म्हणतात. ही सभा 6 महिन्यातून एकदा बोलवली जाते. (वर्षातून दोन होतात)
- पहिली सभा – खरीप पेरणीच्या अगोदर, दुसरी सभा रब्बी पेरणीच्या वेळी.
- अध्यक्ष – संबंधित गटातील जेष्ठ आमदार, सचिव – तहसीलदार

Reliable Academy 9222333999

# गटविकास अधिकारी

- जि. प. पं. स. अधिनियम 1961 मधील, कलम 97 प्रमाणे प्रत्येक पं. स. साठी एक गट विकास अधिकारी असावा.
- निवड –MPSC (राज्यसेवा)
- नेमणूक – राज्यशासन
- काही BDO हे विस्तार अधिकाऱ्यामधून पदोन्नतीद्वारे निवडले जातात.
- वर्ग – 2 कर्मचारी
- BDO वर नजीकचे नियंत्रण CEO चे असते.
- BDO आपला राजीनामा कडे CEO देतो.
- BDO हा ग्रामविकास खात्याचा अधिकारी असतो.
- गटविकास अधिकारी हे पद १९५२ साली निर्माण करण्यात आले.
- गटविकास अधिकाऱ्यावर राजकीय नियंत्रण पंचायत समिती सभापतीचे असते.
- गटविकास अधिकारी जिल्हापरिषद व ग्रामपंचायत यामधील दुवा म्हणून कार्य करतो.
- पंचायत समितीचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठवणे.
- पंचायत समितीचे अंदाजपत्रक तयार करुन मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठवणे.
- पंचायत समितीचा निधी सांभाळणे.

## गट विकास अधिकाऱ्याचे अधिकार व कार्ये

- गट स्तरावरील प्रशासकीय अधिकारी या नात्याने विकास कामांची अंमलबजावणी. पं. स. व स्थायी समितीचा पदसिद्ध सचिव. पं. स. वर्ग 3 व 4 कर्मचाऱ्यांच्या रजा मंजूर करणे.
- पं. स. च्या सभांना उपस्थित राहून इति वृत्तांत लिहिणे. पं. स. च्या अनुदानातून रकमा काढणे व वाटप करणे.
- पं. स. अधिनियमानुसार जमिनी अधिग्रहण करणे व विक्री करणे.विस्तार अधिकाऱ्यांवर नियंत्रण.
- राज्यशासन व पं. स. यामधील दुवा.
- पंचायत समितीचे महत्वाची कागदपत्रे सांभाळणे. पंचायत समितीच्या अनेक कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे व रजा मंजुरी करणे. पंचायत समितीच्या सभेमध्ये घेतलेल्या विविध ठरावाची अंमलबजावणी करणे.
- आवश्यक त्या कर्मचाऱ्याकडून योग्य ती माहिती मागवणे आणि जिल्हा परिषदेला आवश्यक ती माहिती अहवाल विवरणपत्रे सादर करणे.
- पंचायत समितीचा पत्रव्यवहार सांभाळून आवश्यक त्या कागदपत्रावर सहया करणे. पंचायत
- समितीच्या प्रत्येक बैठकीला उपस्थित राहून तेथील चर्चेत आवश्यक ते मार्गदर्शन करणे परंतु त्यांना मतदाराचा अधिकार नसतो.
- पंचायत समितीचे सभापती, उपसभापती किंवा समितीतील कोणत्याही अधिकाऱ्याने दिलेल्या निर्णयाची फेरतपासणी करणे किंवा त्यात बदल करणे.
- आपल्या अंदाजपत्रकातील अनुदानासंबंधी फेर तपासणी करणे.
- जिल्हा परिषदेकडून विकास गटात हाती घेतली जाणारी कामे व विकास योजना यांबाबत शिफारशी करणे.
- जिल्हा परिषदेने किंवा तिच्या वतीने सोपविण्यात आलेली इतर कामे पार पाडणे.
- पंचायत समिती तिच्याकडे सोपविल्या गेलेल्या कामाच्या संदर्भात गट विकास अधिकाऱ्याच्या कामावर देखरेख, नियंत्रण ठेवते.

Reliable Academy 9222333999

- पंचायत समितीबद्दल इतर महत्वाची माहिती :

| वेगवेगळया राज्यातील पंचायत समितीचे नाव | |
|---|---|
| राज्य | पंचायत समितीचे नाव |
| कर्नाटक | तालुका विकास |
| अरुणाचल प्रदेश | अंचल समिती |
| आसाम व प. बंगाल | आंचलिक पंचायत |
| तामिळनाडू | युनियन कौन्सिल |
| आंध्रप्रदेश | मंडळ पंचायत |
| केरळ | ब्लॉक पंचायत |
| गुजरात | तालुका परिषद |
| मध्यप्रदेश | जनपद पंचायत |
| उत्तर प्रदेश | क्षेत्रसमिती, श्वेतासमिती |

महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम कायदा ८ सप्टेंबर १९५६ रोजी मुजूर झाला.

यातील महत्त्वाची कलमे पुढीलप्रमाणे

- कलम ५६ प्रत्येक गटासाठी पं स. ची तरतूद
- कलम ५७ व ५८ – पंचायत समितीची रचना
- कलम ७२- पंचायत समिती सभापती व उपसभापती यांचयाविरुद्ध अविश्वास ठराव
- कलम ७७ (अ) – सरपंच समितीची दर महिन्याला एक बैठक होणे
- कलम ११७ – पंचायत समितीची दर महिन्याला एक बैठक होणे अवश्यक
- कलम १४२ (अ) – पंचायत समितीच्या हिशोब तपासणीचा अधिकार लेखापालाला आहे.
- बलवंतराय मेहता समितीने पंचायत समितीला अधिक महत्त्व दिले होते.
- पंचायत अधिकाऱ्यांसाठी गारगोटी (कोल्हापूर) येथे प्रशिक्षण केंद्र आहे.

Reliable Academy 9922333999

# 4. जिल्हा परिषद (ZP)




## तरतूद

- महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मधील कलम 6 नुसार प्रत्येक जिल्हयात एक जिल्हा परिषद असावी.1 मे 1962 पासून महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हयांसाठी जिल्हा परिषद स्थापन झाली आहे. जिल्हयातील सर्व ग्रामीण विभाग हे जिल्हा परिषदेचे कार्यक्षेत्र असते. जिल्हा परिषदेच्या कार्यक्षेत्रात महानगरपालिका व नगरपालिका यांचे कार्यक्षेत्र येत नाही. जिल्हा परिषदेचे कार्यालय जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी असते.
- महाराष्ट्रात 34 जिल्हा परिषद आहेत. मुंबई शहर व उपनगर हे पूर्णतः शहरीकरण झालेले जिल्हे असल्याने येथे जिल्हा परिषद नाहीत.

## रचना

- कमीत कमी 50 तर जास्तीत जास्त 75 सदस्य असावेत.
- साधारणतः 400,000 लोकसंख्येमागे एक प्रतिनिधी याप्रमाणे सदस्यसंख्या ठरते.
- जिल्हयातील सर्व पंचायत समितीचे सभापती हे जिल्हा परिषदेचे पदसिद्ध सदस्य असतात. (पण त्यांना मतदानाचा अधिकार नसतो)
- अन्य सदस्य –Deputy CEO (उपमुख्य कार्यकारी अधिकारी) (प्रशासकीय अधिकारी पण सचिव या नात्याने)
- 50 टक्के जागा महिलांसाठी राखीव असतात, अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींना त्यांचे लोकसंख्येतील प्रमाण विचारात घेऊन आरक्षण दिले जाते.27 टक्के जागा इतर मागास वर्गीसाठी राखून ठेवलेल्या असतात.
- ७३ व्या घटनादुरुस्तीनंतरच्या जिल्हा परिषदेच्या रचनेसंबंधीच्या तरतुदी खालीलप्रमाणे आहेत :
- प्रौढ मतदारांनी प्रत्यक्ष रीतीने निवडून दिलेले ५० ते ७५ सभासद असतात. सामान्यत: ४०००० लोकसंख्येसाठी एक सभासद असतो. यातील काही जागा लोकसंख्येच्या प्रमाणामध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीय नागरिक यांच्यासाठी राखून ठेवलेल्या असतात.

### जिल्हा परिषद :–

- अनामत रक्कम – १००० रु – सर्वसाधारण, ७५०रु. - अनु. जाती व जमाती

### पात्रता :–

- वयाची 21 वर्ष पूर्ण असावे.
- संबंधित जिल्हयातील कोणत्याही मतदार यादीत त्याचे नाव असावे.
- लहान कुटुंब असावे ( जास्तीत जास्त 2 अपत्य )निवडणूक जिंकल्यावर ही तिसरे अपत्य झाल्यास अशा उमेदवाराचे सभासदत्व रद्द होते.

Reliable Academy 9922380919

- शासनाने नुकत्याच विहीत केलेल्या कायद्यानुसार जिल्हा परिषद उमेदवाराला जास्तीत जास्त 45 हजार रुपये निवडणुक खर्च करता येतो.
- जिल्हा परिषदेचा सदस्य निवडून येणारा व्यक्ती हा सरकारी नोकर नसावा. थकबाकीदार, दिवाळखोर, मुकबधीर किंवा फौजदारी गुन्हाखाली शिक्षा झालेला व्यक्ती नसावा.


**आरक्षण :** आरक्षणाच्या जागा निर्धारित करण्याचा अधिकार राज्यशासनाला असतो.

### कार्यकाल :– 5 वर्षे (सदस्य)

- राज्यशासन मुदतीपूर्व जिल्हा परिषद बरखास्त करू शकते.
- कार्यकाल जिल्हा परिषदेच्या पहिल्या सभेपासून मोजला जातो (ही सभा निवडणूकीनंतर 8 दिवसाच्या आत घ्यावी लागते)
- आणीबाणीच्या प्रसंगी हा कार्यकाल प्रथम 6 महिन्यांपर्यंत वाढवला जाऊ शकतो किंवा आर्थिक कारणामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती यांच्या निवडणूका एकत्र घ्यावयाच्या असल्यास 2 वर्षांपर्यंत वाढवला जाऊ शकतो.

### जिल्हा परिषदेच्या सभा :–

- जिल्हा परिषदेच्या दोन सभेमध्ये 3 महिन्यापेक्षा जास्त अंतर असता कामा नये. म्हणजेच कमीत –कमी 4 सभा व्हाव्यात.जिल्हा परिषदेची पहिली बैठक जिल्हाधिकारी किंवा उपजिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली घेतली जाते.
- या पहिल्या बैठकीत जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांची निवड केली जाते. जिल्हा परिषदेच्या दोन सभामधील अंतर 3 महिन्यापेक्षा जास्त असता कामा नये असे असले तरी जिल्हा परिषदेतील एकूण सभासदाच्या 1/5 सभासदांची लेखी अर्ज केल्यास (सर्वसाधारण सभेची सुचना – 15 दिवस विशेष सभेची सुचना – 10 दिवस अगोदर द्यावी अशी तरतूद आहे) जिल्हा परिषद अध्यक्षाला विशेष सभा बोलवावी लागते. कोणत्याही सभेची सुचना ही किमान सात दिवसाच्या आत सभासदांना द्यावी लागते.




### सदस्याची अपात्रता : –

- सलग सहा महिने सदस्य अनुपस्थित राहत असल्यास अथवा परवानगीसह 12 महिने गैरहजर राहिल्यास सदस्यत्व रद्द होते.
- सदस्याच्या कुटुंबामध्ये अपत्य संख्या 2 पेक्षा जास्त झाली तर त्याचे सदस्यत्व रद्द होते. (2005)
- सदस्यांचा राजीनामा – सदस्य आपला राजीनामा जिल्हापरिषद अध्यक्षाकडे सोपवतात.

### जिल्हापरिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष :–

- निवडणूकीनंतर पहिली सभा जिल्हाधिकारी बोलवतात. या सभेत अध्यक्ष व उपाध्यक्षाची निवड केली जाते.
- या निवडीपासून त्यांचा कार्यकाल गणला जातो.

Reliable Academy9922333999

### निवड :–


- निवडून आलेल्या सदस्यांमधून एकाची अध्यक्ष तर दुसऱ्याची उपाध्यक्ष म्हणून निवड केली जाते.
- या निवडणूकीदरम्यान समान मते पडल्यास अध्यक्षपदी असलेला अधिकारी (जिल्हाधिकारी) चिट्टया टाकून अध्यक्ष निवडतात.
- या निवडीबद्दल काही आक्षेप असल्यास पराभूत उमेदवार 30 दिवसाच्या आत विभागीय आयुक्ताकडे दाद मागतात.
- सदर उमेदवाराचे विभागीय आयुक्ताकडे समाधान न झाल्यास तो राज्यशासनाकडे दाद मागतो. जिल्हा परिषद अध्यक्ष हे पद मागासवर्गीय प्रवर्गासाठी क्रमवार (By Rotation) पद्धतीने आरक्षित ठेवले जाते. हे आरक्षण उपाध्यक्ष पदास लागू नाही. 1995 पासून जिल्हा परिषद अध्यक्षास राज्यमंत्री पदाचा दर्जा देण्यात आला आहे.

### कार्यकाल :–

- जि. प. अध्यक्ष व उपाध्यक्षांचा कार्यकाल $2\frac{1}{2}$ वर्षे इतका आहे (पदभार स्वीकारल्याच्या दिवसापासून)
- पूर्वी सलग 10 वर्षे जर सदस्यत्व घेतले असेल तर पुन्हा निवड होत नाही.

### अधिकार

- जि. प. च्या सभा बोलवतो व तिचे कामकाज पाहतो.
- जि. प. च्या सर्व कागदपत्राची पाहणी व तपासणी करण्याचे अधिकार.
- आर्थिक व कार्यकारी प्रशासनावर देखरेख.
- मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यावर नियंत्रण.
- स्थायी समितीचा पद्सिद्ध अध्यक्ष म्हणून काम करतो.
- CEO चा गोपनीय अहवाल (CR- Confidential Report)लिहून पाठवणे.
- जि. प. बरखास्तीचा प्रस्ताव राज्यशासनास पाठविणे.




**राजीनामा**– उपाध्यक्ष → अध्यक्ष → वि. आयुक्त

Reliable Academy 9222333999



**स्थायी समिती कार्ये**

↓

जि. प. च्या दैनंदिन कार्याचा आढावा घेणे.

↓

विषय समित्यांवर नियंत्रण.

↓

जि. प. च्या अर्थसंकल्पास मान्यता देणे.

↓

ग्रा. पं. तील सरपंच व उपसरपंच यांच्या गैरव्यवहाराची चौकशी व बरखास्त करणे.

↓

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यास एक महिन्यापर्यंत रजा देणे.

## स्थायी समिती

- एकूण सदस्य – 15. 8 निवडून आलेले (2 अनुसुचित जाती जमातीचे), इतर विषय समित्यांचे सभापती स्थायी समितीचे पदसिद्ध सदस्य असतात.
- जि. प. अध्यक्ष (पदसिद्ध), उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पदसिद्ध सचिव)
- महत्त्वाचे – इतर विषय समितीने घेतलेले निर्णय स्थायी समितीच्या सर्वसाधारण सभेमध्ये बरखास्त करता येतात.
- स्थायी समितीच्या सदस्यांना 4000 रू. मानधन मिळते.
- जिल्हा परिषदेच्या कोणत्याही कर्मचारी अधिकाऱ्याकडून आवश्यक ते कागदपत्र दस्ताऐवज मागवणे व त्यावरील विषयावर चर्चा करणे आपल्या अधिकार क्षेत्रातील सर्व प्रकारच्या कामाची तपासणी करणे, जिल्हा निधीवर नियंत्रण ठेवणे, थकबाकी वसुलीवर देखरेख करणे.
- जिल्हा परिषदेच्या मासिक खर्चाचे हिशोब किंवा अर्थसंकल्प मंजुर करणे.
- जिल्हा परिषदेच्या मार्फत राबवल्या गेलेल्या विविध कार्याचा आढावा घेणे.

## समाज कल्याण समिती

- सभापती – अनुसुचित जाती जमातीचा.
- सदस्य – 11. (9 जि. प. तून निवडून आलेले त्यापैकी 5 अनु. जाती जमातीचे + 2 स्त्री सदस्य)
- सचिव – जिल्हा समाज कल्याण अधिकारी.
- कार्ये – जिल्हयातील अनु. जाती व मागासवर्गीयांसाठी शैक्षणिक व आरोग्य व समानता यासाठी कार्य करणे.



## कृषी व सहकार समिती

- सदस्य – 11 (सर्व निवडून आलेले)
- सचिव –जिल्हा व कृषी अधिकारी
- कार्ये – कृषी अवजारे व बि–बियाणांचे वाटप इ.

## अर्थ/वित्त समिती

- सदस्य – 8 (निवडून आलेले)
- सचिव – मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि. प.
- जि. प. चे उपाध्यक्ष हे अर्थ समितीचे सभापती असतात.






## अर्थ/वित्त समिती कार्ये

- जि. प. व पं. स. चे अंदाजपत्रक छाननी करणे.
- जि. प. व पं.स. चे लेखापरीक्षण छाननी करणे.
- जिल्हा परिषदेच्या योजनांचे आराखडे तयार करणे व ते स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे.
- वेगवेगळया विभागासाठी किती खर्च करावा त्याचा अंदाज बांधणे.
- जिल्हा क्षेत्रातील उत्पादन व खर्चावर नियंत्रण ठेवणे.
- जिल्हा क्षेत्रातील विविध बाबींवर वेगवेगळया करांची तरतूद करणे.
- शासनाच्या विविध योजना राबवून त्यावर नियंत्रण ठेवणे.

Reliable Academy 92233999




## शिक्षण समिती

- सदस्य – 8 (निवडून आलेले)
- सचिव – जिल्हा शिक्षण अधिकारी
- सभापती/अध्यक्ष – जि. प. चे उपाध्यक्ष



## सार्वजनिक आरोग्य समिती

- सदस्य – 8 (निवडून आलेले)
- सचिव – जिल्हा आरोग्य अधिकारी
- अध्यक्ष/सभापती – जि. प. चे उपाध्यक्ष

## सार्वजनिक आरोग्य समिती कार्ये

1) ग्रामीण भागात आरोग्य केंद्राची उभारणी.
2) रोग प्रतिबंधक लसी पुरवणे.
3) ग्रामीण भागात आरोग्याविषयी जनजागृती.
4) बालसंगोपन व स्त्रियांचे आरोग्याचे विविध कार्यक्रम राबवणे.
5) शासनाच्या कुटुंब नियोजनाच्या संबंधी विविध कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे.

## सार्वजनिक बांधकाम समिती

- सदस्य – 8 (निवडून आलेले)
- सचिव –अधिक्षक अभियंता (बांधकाम)
- अध्यक्ष – जि. प. उपाध्यक्ष



## सार्वजनिक बांधकाम समिती कार्ये

1) गावातील रस्ते बांधणे व विस्तार करणे.
2) जि. प. च्या शाळांचे बांधकाम.
3) पूल बांधणे इ.
4) शासनाच्या विविध योजना बांधकामासंदर्भात राबवणे.
5) गावांना पाणीपुरवठा करणाऱ्या शासनाच्या विविध योजना राबवणे किंवा पाण्याची टाकी बांधणे.
6) ग्रामपंचायतीच्या बांधकामासाठी आवश्यक ती मदत करणे.

## महिला व बालकल्याणसमिती

महिला व बाल विकास WOMEN & CHILD DEVELOPMENT

- सदस्य – 8 (निवडून आलेले)
- सभापती–महिला व बालकल्याण समितीचे सभापती ही महिलाच असली पाहिजे. (1992 पासून जि. प. व पं. स. अधिनियमामध्ये हा बदल करण्यात आला आहे)
- सचिव–महिला व बालकल्याण अधिकारी (उपमुख्य कार्यकारी अधिकारी)
- आवश्यकतेनुसार दोन तज्ञ सहयोगी सभासद या समितीत असतात. या समितीत जवळपास 70 टक्के महिला सदस्य असतात.

1) जिल्हा क्षेत्रांतील महिला व बालकांच्या आरोग्याची काळजी घेणे.
2) महिला व बालसंगोपनाचे विविध कार्यक्रम राबविणे.
3) जिल्हा क्षेत्रात स्त्रीयांना स्वावलंबी बनवण्याच्या योजना राबविणे.




## जल व्यवस्थापन व जल निःसारण समिती

महाराष्ट्र शासनाचे जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम 1961 मध्ये सुधारणा करुन जलसंधारण व पाणीपुरवठा ही नवी समिती तयार केलेली आहे. जिल्हयातील पाणी पुरवठयाच्या सोयी उपलब्ध करुन त्यावर नियंत्रण ठेवणे. हे या समितीचे प्रमुख कार्य असते. दोन तज्ञ व अनुभवी सदस्याचा या समितीत समावेश असतो. जिल्हयातील पाणी पुरवठा अधिकारी हा समितीचा पदसिध्द सचिव असतो. 4 जानेवारी 2005 पासून या समितीकडे राज्य शासनाने जिल्हयातील विविध महत्त्वाची जबाबदारी हस्तांतरीत केलेली आहे.

Reliable Academy 9922333999

| जल व्यवस्थापन व जल निःसारण समिती | जल व्यवस्थापन व जल निःसारण समिती कार्ये |
|---|---|
| ➢ सदस्य – 16<br>➢ पदसिद्ध अध्यक्ष – जि. प. चे अध्यक्ष<br>➢ इतर सदस्य –<br>➢ 1)कृषी + वित्त सभापती + (CEO) + कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा + कार्यकारी अभियंता लघु पाठबंधारे सचिव अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी | • जिल्हाभर पाणी पुरवठयाच्या सोयी करणे.<br>• जिल्हयातील शेतीला पाणी पुरवठा कशा पध्दतीने होईल याचे व्यवस्थापन करणे.<br>• विविध क्षेत्रात किंवा विभागात पाईपलाईन टाकून पाणीपुरवठा करणे.<br>• ग्रामीण भागात शेत तळे बांधण्यासाठी अनुदान देणे.<br>• शासनाच्या जलसंधारणाच्या संदर्भात असलेल्या विविध योजना राबवून त्यावर नियंत्रण ठेवणे. |

Reliable Academy 9222333999

## ❖ जिल्हा परिषदेची आमसभा :

१. जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकावर प्राथमिक स्वरुपाची चर्चा करण्यासाठी, जिल्हयात राबविण्यात येणा-या विविध विकास योजनांवर सविस्तर चर्चा घडवून आणण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षातून दोनदा जिल्हा परिषदेची आमसभा बोलवतात.
२. अध्यक्ष – जिल्हयाचे पालकमंत्री
३. सचिव – जिल्हाधिकारी
४. जिल्हा परिषदेच्या १/५ सदस्यांनी मागणी केल्यास जिल्हा परिषदेची विशेष सभा बोलवली जाते.

## ❖ जिल्हा परिषदेचे अनुदान व महसूल :–

- जि. प. ला राज्यशासनाकडून विकास कामासाठी 75% अनुदान मिळते.
- जि. प. मध्ये जमा झालेल्या महसूलातून 70 % जि. प. व 30 % राज्यशासनाला दिली जातात.
- जि. प. ला मिळालेल्या जमिन महसूलातून 70 % जि. प. व 30 % राज्यशासनाला दिली जातात.
- वरील सर्व जि. प. ला मिळणारी रक्कम त्यापैकी 70 % रक्कम ग्रामपंचायतला दिली जाते. (30 % प्रत्यक्ष स्वरूपात तर 40 % विकास कामे करून)

## ❖ अंदाजपत्रक :–

- सर्व पं. स. चे अंदाजपत्रक म्हणजेच जि. प. चे अंदाजपत्रक.
- जि. प. आपल्या अंदाजपत्रकास मान्यता (दुरूस्तीशिवाय किंवा दुरूस्तीसह) देण्याचे अधिकार जि प. ला आहे.
- जि. प. अंदाजपत्रकास स्थायी समितीने (6 स्थायी स.) मान्यता न दिल्यास CEO ते अंदाजपत्रक राज्यशासनाकडे पाठवतात.
- CEO ने पाठवलेले अंदाजपत्रक राज्यशासन (दुरूस्तीशिवाय वा दुरूस्तीसह) राज्यशासन मंजूर करते. अशा वेळी ते जि. प. ने मंजुर केले आहे. असे मानतात.
- जि. प. चा सचिव Dy. CEO अंदाजपत्रक जि. प. मध्ये स्थायी समितीपुढे मांडतो.

## ❖ जिल्हा परिषदेची आमसभा :

१. जिल्हा परिषदेच्या अंदाजपत्रकावर प्राथमिक स्वरुपाची चर्चा करण्यासाठी, जिल्हयात राबविण्यात येणा-या विविध विकास योजनांवर सविस्तर चर्चा घडवून आणण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षातून दोनदा जिल्हा परिषदेची आमसभा बोलवतात.
२. अध्यक्ष – जिल्हयाचे पालकमंत्री
३. सचिव – जिल्हाधिकारी
४. जिल्हा परिषदेच्या १/५ सदस्यांनी मागणी केल्यास जिल्हा परिषदेची विशेष सभा बोलवली जाते.

## ❖ जिल्हा परिषदेचे अनुदान व महसूल :–

- जि. प. ला राज्यशासनाकडून विकास कामासाठी 75% अनुदान मिळते.
- जि. प. मध्ये जमा झालेल्या महसूलातून 70 % जि. प. व 30 % राज्यशासनाला दिली जातात.
- जि. प. ला मिळालेल्या जमिन महसूलातून 70 % जि. प. व 30 % राज्यशासनाला दिली जातात.
- वरील सर्व जि. प. ला मिळणारी रक्कम त्यापैकी 70 % रक्कम ग्रामपंचायतला दिली जाते. (30 % प्रत्यक्ष स्वरूपात तर 40 % विकास कामे करून)

अंदाजपत्रक :–

- सर्व पं. स. चे अंदाजपत्रक म्हणजेच जि. प. चे अंदाजपत्रक.
- जि. प. आपल्या अंदाजपत्रकास मान्यता (दुरूस्तीशिवाय किंवा दुरूस्तीसह) देण्याचे अधिकार जि प. ला आहे.
- जि. प. अंदाजपत्रकास स्थायी समितीने (6 स्थायी स.) मान्यता न दिल्यास CEO ते अंदाजपत्रक राज्यशासनाकडे पाठवतात.
- CEO ने पाठवलेले अंदाजपत्रक राज्यशासन (दुरूस्तीशिवाय वा दुरूस्तीसह) मंजूर करते. अशा वेळी ते जि. प. ने मंजुर केले आहे. असे मानतात.
- जि. प. चा सचिव Dy. CEO अंदाजपत्रक जि. प. मध्ये स्थायी समितीपुढे मांडतो.

## ❖ प्रशासकीय अधिकारी :– CEO (मुख्य कार्यकारी अधिकारी)

### तरतूद

- जि. प. व पं. स. अधिनियम 1961 मधील कलम 94 प्रमाणे प्रत्येक जिल्हयासाठी एक ब्ल्असावा अशी तरतूद आहे. भारतीय प्रशासकीय सेवेतील एक अधिकारी म्हणून जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याची नेमणुक केली जाते.
- यांच्या मदतीला एक किंवा एकापेक्षा अधिक उपमुख्य कार्यकारी अधिकारी असतात यांची नेमणूक मात्र राज्य लोकसेवा आयोगांकडून केली जाते.
- जिल्हा परिषदेतील मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचे कर्तव्य आणि जबाबदारी शिवाय अधिकार लक्षात घेतल्यावर हे मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद व राज्य शासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा ठरतात.

- निवड –UPSC
- नेमणूक – राज्यशासन
- नेमणूक करतेवेळी तो भारतीय प्रशासन सेवेतील वरिष्ठ अधिकारी असावा.
- वेतन – नियमाप्रमाणे राज्याच्या संचित निधीतून
- राजीनामा – वि. आयुक्ताकडे यांच्यामार्फत राल्यपालाकडे.

- कार्ये :–
  - ➢ जि. प. व पं. स. च्या बैठकीला उपस्थित राहणे.
  - ➢ जि. प. तील इतर अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्ये ठरवून घेणे.
  - ➢ जि. प. तील वर्ग –1 व वर्ग –2 या अधिकाऱ्यांचे गोपनीय अहवाल (Confidential Report) लिहिणे.
  - ➢ स्थायी समितीमध्ये होणाऱ्या निर्णयाची अंमलबजावणी करणे.
  - ➢ दैनंदिन प्रशासन, हिशोब, अभिलेख यावर देखरेख ठेवणे.
  - ➢ Z. P. चा अर्थसंकल्प तयार करतो.

### CEO चे अधिकार

- एकापेक्षा जास्त क्लण ब्ल्असल्यास एकाची स्थायी समितीचे सचिव म्हणून नेमणूक करतो.
- जि. प. त वर्ग–3 व 4 कर्मचाऱ्यांची नियुक्ती
- जि. विकास फंडातील रक्कम काढणे व वाटप करणे-D.D.O. – Drawing Distributing Officer
- वर्ग–1 व 2 अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची दोन महिन्यांची रजा मंजूर करणे.
- विकास निधीतून पैसे काढणे व विकास कार्यावर खर्च करणे. त्यापुढील रजा मंजुर करण्याचे अधिकार राज्यशासनास आहेत. कोणताही कर्मचारी व अधिकाऱ्याला त्यांच्या कामाचह विवरण पत्रे मागू शकतो.
- जिल्हयातील पं. स. चा BDO वर नियंत्रण ठेवतो.
- वरील अधिकारात कोणी अडथळा निर्माण केल्यास त्या संदर्भात CEO आपला अहवाल विभागीय आयुक्तांना पाठवतात.
- जि. प. मध्ये आर्थिक गैर व्यवहार जि. प. , पं. स. अधिनियमानुसार कामकाज चालत नसेल तर क्लण CEO आपला अहवाल राज्यशासनास देतात. त्यात ते जि. प. बरखास्त करण्याची शिफारस करतात.

Reliable Academy 9222333999

➢ CEO ची बदली व बडतर्फी :–

1)अकार्यक्षमता व गैरव्यवहार या कारणामुळे राज्यशासन CEO ला बडतर्फ करू शकते. तत्पूर्वी त्यांना त्यांची बाजू मांडू दिली जाते.

2)दर तीन वर्षांनी जि. प. ते जि. प. अशी बदली होते.

3)बदलीचा ठराव–जि. प. च्या सर्वसाधारण सभेमध्ये 1/3 सदस्यांनी ठराव मांडून व 2/3 सदस्यांनी मंजुर करून CEO ची बदली होऊ शकते.

➢ उपमुख्य कार्यकारी अधिकारी (Dy CEO):–

- निवड –MPSC
- नेमणूक – राज्यशासन

1)जि. प. चा सचिव तसेच स्थायी समितीची सचिव अशी महत्त्वाची भूमिका.

2)मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या रजेच्या काळात कार्यकाल पाहणे इ.

**जिल्हा परिषदेचे विसर्जन – अकार्यक्षमता व गैरव्यवहार या कारणामुळे राज्यशासनाकडून जिल्हा परिषद बरखास्त केली जाते.**

## जिल्हा परिषदेची कामे

१९६१ सालच्या महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आणि पंचायत समिती कायद्याच्या पहिल्या परिशिष्टात नमूद केलेल्या १२८ विषयांची जबाबदारी जिल्हा परिषदांकडे सोपविण्यात आली आहे. त्यातील प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे आहेत :

**१.शेतीविषयक :** पीक स्पर्धा घेणे, पिकांचे रक्षण करणे, पीक मोहिमा हाती घेणे, शेती सुधार प्रयोग व प्रात्यक्षिके, शेती अवजारे व साधनांचे वाटप करणे, खते, मिश्र खते पुरविणे, पोलाद, सिमेंट वाटप, सुधारित बी-बियाणांची आयात व वाटप, गुदामे बांधणे व व्यवस्था ठेवणे, घातक वनस्पतींचा नाश करणे.

**२.पशुसंवर्धन :** गुरे-ढोरे, घोडे यांची उपयुक्तता वाढवण्याच्या दृष्टीने प्रयोग, पैदाशीत सुधारणा, चारा साठवण, कुक्कुटपालन, वराहपालन, चराऊ राने, गुरांची प्रदर्शने भरवणे, जंगलांचा विकास करणे.

**३.समाजकल्याण :** मागासवर्गीयांचा शैक्षणिक विकास, त्यांना शिष्यवृत्त्या देणे, त्यांच्याकरिता शाळा, वसतिगृहे स्थापन करणे व अनुदाने देणे. त्यांचा आर्थिक विकास साधणे, त्यासाठी कर्ज, चरखे पुरविणे, मागास क्षेत्रात दळणवळणाची सोय करणे, सहकार वस्तू भांडार चालविणे.

**४.शिक्षण :** प्राथमिक शाळा, मुलोद्योग सोयी, त्यांची तपासणी, अनुदाने व भेटी देणे, माध्यमिक शिक्षणाची सोय, विद्यार्थ्यांना कर्जे, शिष्यवृत्त्या, शाळांच्या इमारती बांधणे, क्रीडांगणांची सोय करणे, साधनसामग्री पुरविणे.

**५.वैद्यकीय :** तालुका, दवाखाने व त्यांची व्यवस्था, कुटीर रुग्णालये, वैद्यक व्यवसाय केंद्रांना आर्थिक मदत, आयुर्वेदिक व युनानी, होमिओपॅथी अशा दवाखान्यांना अनुदाने

**६.आरोग्य :** प्राथमिक आरोग्य केंद्रे स्थापन करणे, फिरती आरोग्य पथके, देवी प्रतिबंधक लस, साफ-सफाई, गलिच्छ वस्त्यांचे पुनर्वसन, खेडयात औषधी पेटया, शिशु संगोपन केंद्रे

**७.इमारती, दळणवळण पाटबंधारे :** ग्रामीण रस्ते, जिल्हा रस्ते, पूल बांधणे व व्यवस्था, ग्रामीण उद्याने, बागा, जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय इमारती बांधणे, रस्त्याशिवाय दळणवळणाची इतर साधने, सार्वजनिक नावा, रस्त्यालगत झाडे.

**८.इंजीनिअरिंग कामे :** ग्रामीण पाणीपुरवठा, छोटे पाटबंधारे (१०० हेक्टर जमिनीसाठी), पाणी दूषित होऊ नये म्हणन उपाय.

**९.उद्योगधंदे -** स्थानिक व लघुउद्योग, कुटीरोद्योग, स्थानिक कला, रु. १०००० पर्यंत कर्ज देणे, प्रशिक्षण व उत्पन्न केंद्रे, विक्री, भांडारे व दुकाने काढणे, कारागिरांना आर्थिक मदत, विद्यावेतनावरील उद्योगातील मालाच्या विक्रीच्या सोयी, औद्योगिक सहकारी संस्था व हातमाग यांना मदत.

Reliable Academy 9422333999

## जिल्हा परिषदेची कामे

**१०.सहकार** –सहकारी संस्थांची नोंदणी, देखरेख, वाढ करणे, त्यांचे भाग विकत घेणे, कृषी उत्पादनाच्या बाजारावर देखेरेख नियंत्रण.

**११.सामूहिक विकास व स्थानिक विकास**

**१२.समाज शिक्षण :** यासाठी मनोरंजन केंद्रे, प्रौढ साक्षरता केंद्रे, शेतकरी मेळावे, शिबिरे, ग्रंथालये, वाचनालये, प्रदर्शने इ. याशिवाय पंचायत समित्यांच्या कार्याची चौकशी करणे, पंचायत समितीच्या अंदाजपत्रकाला मान्यता देणे, त्यांच्या योजनांना योग्य स्वरुप देणे ही जबाबदारी जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आली आहे. जिल्हयाचा योजनाबध्द विकास घडवून आणणे व जिल्हयातील जनतेचे आरोग्य, शिक्षण सुखसोयी याकरिता उपाययोजना करणे ही जिल्हा परिषदेची जबाबदारी आहे. राज्य सरकारने कायद्याने सोपविलेली इतर कामे व जबाबदाऱ्या पार पाडणे. अनुसूचित जाती-जमाती व मागासवर्गाच्या विकासाकरिता राज्य सरकारने काढलेल्या आदेशांची अंमलबजावणी करणे.

## जिल्हा परिषदेबद्दल इतर महत्त्वाची माहिती

- प्रभाग समित्या स्थापन करणारी महाराष्ट्रातील पहिली जिल्हा परिषद - अहमदनगर जि. प.
- जि. प. अध्यक्षाला कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा देणारे राज्य – मध्य प्रदेश
- पशसंवर्धन व दुग्धविकास समिती ल. ना. बोंगीरवार समितीच्या शिफारशी नुसार स्थापन झाली.
- जिल्हा परिषदेला ७५ लाखापर्यंत योजना तयार करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.
- ज्या ग्रामपंचायतीचे उत्पन्न ५००० पेक्षा कमी असल्यास हिशोब तपासणी जिल्हा परिषद करते.
- पुर्वी जिल्हा परिषदेवर सहयोगी सदस्यांचे नामनिर्देशन केले जात असे. सहकारी संघाचे अध्यक्ष, भूविकास बँकेचा संचालक इ.) २४ एप्रिल १९९४ पासून सहयोगी सदस्यत्वाची पद्धत रद्द झालेली आहे.
- जि. प, पं. स. ग्रामपंचायत यांना आपल्या अर्थसंकल्पाच्या १०% खर्च महिला व बालकल्याण आणि २० % खर्च समाजकल्याणावर करावा लागतो.
- दर महिन्याचा पहिला सोमवार जिल्हा अधिकारी कार्यालयात आणि दर महिन्याच्या चौथ्या सोमवारी तहसील कार्यालयात लोकशाही दिन साजरा करतात.

## जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील महत्वाची कलमे

- कलम ६ – प्रत्येक जिल्हयासाठी एक जिल्हा परिषद
- कलम १० (२) – जि. प. सदस्यांचा कार्यकाल
- कलम ५० – सदस्यांची पदच्युती
- कलम १११ – जि. प. च्या सभा
- कलम ९४ – प्रत्येक जिल्हयासाठी एक C.E.O.
- कलम १४२ – (ब) – जिल्हा परिषदेच्या हिशोब तपासणीचा अधिकार स्थानिक लेखापालाला आहेत.
- कलम ८३ (३) जि. प. समाजकल्याण समितीवर त्याच जाती जमातीतील अध्यक्ष असावा.
- कलम १०० – जि. प. अंदाजपत्रक तयार करते.

Reliable Academy 9922333999

# 5. नागरी प्रशासन

## महानगरपालिका



### पार्श्वभूमी

- भारतातील नागरी प्रशासनाला मोठी पार्श्वभूमी आहे.
- प्राचीन काळात नगर प्रशासनाचा उल्लेख वेगवेगळया ग्रंथामध्ये आढळतो.
- चंद्रगुप्त मौर्याच्या काळात नगरप्रमुख हे पद अस्तित्वात होते. सामवेदात 'नगरपंच' असा उल्लेख आढळतो. म्हणजेच नागरी प्रशासन अस्तित्वात होते असे दिसते.
- महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नागरी अधिनियम – १९९४
- १७२६ ला मुंबई शहरात ' मेयर्स कोर्टाची ' स्थापना करण्यात आली.
- १८८४ मुंबई लोकल बोर्डची स्थापना करण्यात आली.
- ७४ व्या घटनादुरुस्तीमुळे नागरी स्थानिक संस्थाना घटनात्मक दर्जा मिळाला. कलम २४३ (p) ते २४३ (zG) ही कलमे समाविष्ट करण्यात आली.
- १९६५ साली 'महाराष्ट्र नगरपालिका कायदा' अस्तित्वात आला.
- महाराष्ट्रातील झिरो बजेटवरील पहिली महानगरपालिका - अकोला
- केंद्रशासित प्रदेशामध्ये महानगरपालिका स्थापण्याचा अधिकार संसदेला असतो.
- ब्रिटीशांनी स्थापन केलेली 15 महानगरपालिका– मद्रास

### महाराष्ट्रातील महानगरपालिका सद्यस्थिती

1) मुंबई (सर्वात जुनी आणि पहिली– 1881) 2) नागपूर 3) पुणे 4) कोल्हापूर 5) सोलापूर 6)नाशिक 7) ठाणे 8) अमरावती 9) औरंगाबाद (1984 पर्यंत) 10) पिंपरी–चिंचवड (आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका) 11) कल्याण–डोंबिवली 12) नवी मुंबई 13) उल्हासनगर 14) नांदेड–वाघाळा 15) सांगली–मिरज उपवाड महानगरपालिका (1998 पर्यंत) 16) अकोला 17) भिवंडी–निजामपूर 18) मिरा–भाईंदर 19) मालेगाव (नाशिक 2002 पर्यंत) 2003 मध्ये 20) धुळे 21) अहमदनगर 22) जळगाव, 2009 मध्ये 23) वसई–विरार. 12 जानेवारी 2012 पासून 3 नवीन महानगरपालिका कार्यान्वितझाल्या .24) परभणी 25) चंद्रपूर 26) लातूर 27) पनवेल

### महानगरपालिका संदर्भातील कायदे

| | | | |
|---|---|---|---|
| मुंबई महानगरपालिका अधिनियम 1888 | नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम 1949 | महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषद अधिनियम 1965 |

### महानगरपालिका रचना

- ज्या शहराची लोकसंख्या 5 लाखापेक्षा जास्त आहे. अशा शहरामध्ये महानगरपालिका स्थापन केली जाते. सदस्यसंख्या – 65 ते 221 (ही लोकसंख्येच्या प्रमाणात ठरते)

(१) महानगरपालिका
(२) पदाधिकारी
(३) महानगरपालिकेच्या समित्या
(४) महानगरपालिका आयुक्त

} हे महानगरपालिकेचे महत्त्वपूर्ण घटक आहेत

Reliable Academy

## महानगरपालिकेची कार्ये

१. शहराच्या विविध समस्यांवर चर्चा करणे.

२. प्रश्नांच्या सोडवणुकीसंबंधीचे धोरण ठरविणे.

३. महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकाला मान्यता देणे.

४. विविध समित्यांच्या सदस्यांची निवड करणे.

५. विविध समित्यांनी घेतलेल्या निर्णयांना मंजुरी देणे.

६. आवश्यकतेप्रमाणे उपविधी (by laws) तयार करणे.

७. शहराच्या सांस्कृतिक व इतर महत्त्वाच्या क्षेत्रांशी संबंधित निर्णय घेणे.

Reliable Academy 9222333999

❖ **पात्रता :**

१. वयाची २१ वर्षे पूर्ण केलेली असावीत.
२. संबंधित शहराचा नागरिक असावा.
३. तो व्यक्ती मनपा कराचा थकबाकीदार नसावा.
४. तो व्यक्ती कोणत्याही शासकीय सेवेत नसावा.

❖ **महानगरपालिका (सदस्य संख्या) :–**

महानगरपालिकांचे लोकसंख्येच्या आधारावर चार गटात विभाजन केले जाते व त्यांचा दर्जा ठरविला जातो. सर्वसाधारण सभेतील प्रतिनिधींची संख्या महानगरपालिकेच्या या दर्जानुसार निश्चित होते. असे असले तरी सर्वसाधारण यात किमान 65 व कमाल 221 सदस्य असतात.

❖ **अनामत रक्कम :**

- सर्वसाधारण –५००० /-
- अनु.जाती/जमाती –२५००/-

❖ **महानगरपालिकेच्या उत्पन्नाची साधने**

- पाणीपट्टी, जकात, घरपट्टी, स्थानिक उपकर इ. कर
- राज्यशासनाकडून मिळणारी अनुदाने, स्थानिक कर्जे

❖ **बैठक**– महानगरपालिकेची बैठका ३ महिन्यातून एकदा होते.
हिशोब तपासणी –महानगरपालिकेची हिशोब तपासणी चीफ ऑडीटरद्वारे केली जाते.

❖ **निवडणूका :**

१. महानगरपालिकेच्या मतदार संघाला 'वार्ड' म्हणतात.
२. महानगरपालिकेचे वॉर्ड राज्यशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी पाडतात.
३. प्रत्यक्ष, प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने मतदान होते.
४. दर ५ वर्षाला महानगरपालिकेच्या निवडणूका राज्य निवडणूक आयोगामार्फत घेण्यात येतात.

❖ कार्यकाल :– (सदस्य) 5 वर्ष

- निवडून आलेल्या उमेदवाराला 'नगरसेवक' म्हणतात. 'नगरसेवक' हा शब्द– बाळासाहेब ठाकरे यांनी सुचवला.
- पहिले महापौर – फिरोजशहा मेहता
- 2011 पासून स्त्रियांना 50%आरक्षण आहे.

## समित्या

### विधिविहित समिती

अ) स्थायी समिती
ब) शिक्षण समिती
क) वाहतूक समिती
ड) आरोग्य समिती
ई) पाणीपुरवठा, जल निःसारण, बांधकाम.

### विधिविरहित समिती

अ) रूग्णालय समिती
ब) बागबगिचा समिती
क) बाजार समिती

Reliable Academy 9222333999

| स्थायी समिती | कार्ये |
| --- | --- |
| • कार्यकाल – १ वर्ष<br>• बैठक - आठवडयातून एकदा<br>• १ ली सभा महानगरपालिका आयुक्त बोलावतात. सदस्य १२<br>• महानगरपालिकेच्या मतदार संघाच्या रचनेला अंतिम मंजुरी राज्य निर्वाचन आयोगाद्वारे दिली जाते. अंतिम रचना प्रसिद्ध करण्याचा अधिकार महानगरपालिका आयुक्त यांना असते. | • महानगरपालिकेच्या करारांना संमती देणे.<br>• महानगरपालिकेच्या अर्थसंकल्पाची छाननी करणे.<br>• निधी व गुंतवणूक विषयक निर्णय घेणे.<br>• लेखापालाची कार्य पध्दती ठरवणे.<br>• आपल्यापैकी एकाची ($2\frac{1}{2}$ वर्षे) अध्यक्ष म्हणून निवड केली जाते. स्थायी समिती, आयुक्त व नगरपालिका यातील दुवा. |

## महापौर (Mayor)

- महापौर हा महानगरपालिकेचा कार्यकारी व राजकीय प्रमुख असतो.
- भारतातील पहिल्या महिला महापौर - अरुणा असफअली (मुंबई)
- निवड– निवडून आलेले सभासद आपल्यापैकी एकाची महापौर व दुसऱ्याची उपमहापौर म्हणून निवड करतात.
- कार्यकाल :– $2\frac{1}{2}$ वर्षे
- आरक्षणः–त्वजंजपवद डमजीवकए फक्त महापौर पदास लागू आहे. उपमहापौर पदास आरक्षण लागू नाही.
- राजीनामाः– वि. आयुक्ताकडे.
- उपमहापौर→महापौर→नगरसेवक→महापौर.

# महापौराची कार्ये

- महानगरपालिकेच्या सभांचे अध्यक्षस्थान भूषवणे.
- सर्व करार निविदांवर स्वाक्षरी करणे.
- सर्व बैठकांवरती नियंत्रण ठेवणे.
- सर्वसाधारण सभेचे अध्यक्ष भूषवणे.
- शहरात येणाऱ्या सन्माननीय व्यक्तींचा सत्कार करणे.
- महानगरपालिकेच्या प्रशासकीय व राजकीय कामांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
- महानगरपालिकेच्या आयुक्तांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
- महानगरपालिकेचे विविध रेकॉर्ड व अभिलेख तपासणे.

❖ **महापौराबद्दल इतर महत्त्वाचे :–**

- शहराचा प्रथम नागरिक.
- महापौर हा शब्द वि. दा. सावरकरांनी सुचवला.
- पहिले महापौर – फिरोजशहा मेहता.

❖ **महापौर परिषद :**

- नागपूर आणि मुंबई या महानगरात महापौर परिषद ही पध्दती क्रमश: १९९७ आणि १९९८ साली स्थापन करण्यात आली. या पध्दतीत महापौरास व्यापक स्वरुपाचे कार्यकारी अधिकारी प्राप्त झाले होते. १९९९ साली महाराष्ट्र शासनाने पदच रद्द करुन महानगरपालिका कायद्यातील मूळ तरतुदी पुन्हा प्रस्थापित केल्या.

Reliable Academy 9922333999

❖ **महानगरपालिका आयुक्त :–**

- महानगरपालिका व आयुक्त यांनी परस्पर सहकार्य व सामंजस्याने काम करावे अशी अपेक्षा असते. असे सहकार्य मिळविणे कठीण होत असल्यास आणि दोहोंमध्ये वारंवार संघर्ष होत असतील तर महानगरपालिका ठराव संमत करुन राज्यशासनास आयुक्तास परत बोलावण्याची विनंती करु शकते.
- महानगरपालिका आयुक्तांना त्यांच्या कार्यात मदत करण्यासाठी उपायुक्त, नगर अभियंता, वैद्यकीय आणि आरोग्य अधिकारी, शिक्षणाधिकारी आणि अग्निशामन अधिकारी असतात.

❖ **निवड :–** UPSC, I.A.S. सेवेतील वरिष्ठ अधिकारी

- प्रशासकीय नियंत्रण – विभागीय आयुक्त
- बडतर्फी - केंद्रशासनाकडून होते. महानगरपालिका सदस्यांनी २/३ बहुमतानी ठराव पारित केल्यास महानगरपालिका आयुक्त बडतर्फ होतो.

❖ **नियुक्ती :–** राज्यशासन

❖ **कार्यकाल :–** 3 वर्षे

❖ **वेतन :–** राज्यशासन

❖ **राजीनामा :–** विभागीय आयुक्त

## महानगरपालिका आयुक्त कार्ये व अधिकार

- महानगरपालिकेच्या प्रशासन यंत्रणेचा कार्यकारी प्रमुख.
- महानगरपालिकेच्या बैठकीला उपस्थित राहू शकतो, पण मतदान करू शकत नाही.
- महानगरपालिकेने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी.
- नागरी समस्येबाबत सभागृहासमोर निवेदने व सभासदांच्या प्रश्नांना उत्तरे देणे.
- महानगरपालिका प्रशासनाचा वार्षिक अहवाल सादर करणे.
- वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे व स्थायी समितीकडे पाठवणे.
- स्थायी समितीचा पदसिद्ध सचिव.
- महानगरपालिकेला सल्ला व मार्गदर्शन.
- महानगरपालिका व शासन यामधील दुवा.
- महानगरपालिकेतील वर्ग ३ व ४ च्या कर्मचाऱ्यांची भरती करणे.
- महानगरपालिका क्षेत्रातील विविध अतिक्रमणे हटविणे.

❖ **महानगरपालिकेची कामे :–**

महानगरपालिका कायद्यात महानगरपालिकांनी करावयाच्या कार्यांची सूची समाविष्ट असते. त्यानुसार महानगरपालिका कार्यांची आवश्यकत कार्ये आणि ऐच्छिक कार्ये अशी विभागणी करण्यात येते.

| आवश्यक कामे | ऐच्छिक कार्य |
|---|---|
| १. खाजगी आणि सार्वजनिक वापरासाठी पाणीपुरवठा करणे.<br>२. सार्वजनिक रस्ते तयार करुन त्यांची व्यवस्था पाहणे.<br>३. पूल आणि गल्ल्या तयार करणे व त्यांची व्यवस्था पाहणे.<br>४. मोठे व लहान रस्ते यांना नावे देणे.<br>५. सांडपाणी वाहून जाण्यासाठी गटारे बांधून त्यांची व्यवस्था पाहणे.<br>६. सार्वजनिक शौचालये आणि प्रसाधनगृहे बांधणे.<br>७. सार्वजनिक रुग्णालये व दवाखाने स्थापन करुन ते चालविणे.<br>८. सार्वजनिक बाजारपेठा उभारणे.<br>९. पशुवधकेंद्राची व्यवस्था पाहणे.<br>१०. रस्त्यांवर दिव्यांची सोय करणे.<br>११. घरांना क्रमांक देणे.<br>१२. नगरातील धोकादायक इमारती पाडणे.<br>१३. प्राथमिक शिक्षणाची सोय करणे.<br>१४. गलिच्छ वस्त्या सुधारणे.<br>१५. स्मशानभूमीची व्यवस्था करणे.<br>१६. जन्म-मृत्यूची नोंद करणे.<br>१७. साथीच्या रोगांबाबत प्रतिबंधक व्यवस्था करणे. | • क्रीडांगणे, उद्याने बगीचे, वाचनालये इ. ची स्थापना, विद्युतपुरवठा, परिवहन सेवा इ.<br>• उत्पादनाची साधने उपलब्ध असल्यास करावयाच्या ऐच्छिक कार्यांमध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.<br>१. माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षणाची व्यवस्था करणे.<br>२. सार्वजनिक वाचनालयांची स्थापना करणे.<br>३. वीज आणि स्वयंपाकाचा गॅस यांचा पुरवठा करणे.<br>४. सार्वजनिक वाहतूक व्यवस्था करणे.<br>• सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य आणि सुविधा या दृष्टीने आवश्यक असलेली परंतु महानगरपालिकेच्या आवश्यक कार्यांमध्ये समाविष्ट न केलेली अशी इतर कोणतीही कार्ये. |

❖ **उत्पन्नाची साधने :**

महानगरपालिकांना आपली कार्येपार पाडता यावीत यासाठी महानगरपालिका कायद्यातील तरतुदींद्वारा खालील उत्पन्नाची साधने उपलब्ध करुन देण्यात आली आहेत :

**(अ) करापासूनचे उत्पन्न :**

(१) संपत्तीवरील कर, (२) पाणीपट्टी, वाहन व प्राण्यांवरील कर, (३) शहर सुधारणा कर, (४) सिनेमागृहांवर लावण्यात येणारा कर, करमणूक कर व पाळीव प्राणी, उपयुक्त इत्यादींवर कर, (५) जकात कर, (६) उद्योग, व्यवसाय व शिक्षण यावरही कर

साधारणत: वरील गोष्टींवर कर लावून महानगरपालिका आपले उत्पन्न मिळवते व हे उत्पन्न हमखास असते.

**(ब) संपत्ती व उपक्रमांपासून मिळणारे उत्पन्न :** महानगरपालिकेचे दुसरे उत्पन्नाचे साधन म्हणजे महानगरपालिकेची संपत्ती व उपक्रम हे होय.

**(क) आर्थिक साहाय्य :** राज्य सरकार महानगरपालिकेला आर्थिक सहाय्य देते.

**(ड) कर्ज :** महानगरपालिका कर्ज घेऊ शकते. आपल्या योजना पूर्ण करण्यासाठी किंवा नागरिकांना सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी महानगरपालिका कर्ज घेऊ शकते.

Reliable Academy 9222333999

# 6. नगरपालिका / नगरपरिषद




- देशामध्ये नगर प्रशासनाची सुरुवात ही इंग्रजांच्या काळापासूनच सुरु झाली. 1726 मध्ये नगर प्रशासन प्राथमिक स्वरुपात इंग्रजांनी सुरु केले असले तरी 1856 च्या कायद्याने मुन्सीपल कमीशन आणि 1873 च्या कायद्याने लोकसंख्येच्या आधारावर नगरपालिका व शहर पालिका असा फरक करण्यात आला. पूर्वीपासून चालत आलेल्या नियमावर या नगरपालिकेचे कार्य चालत होते. परंतु हे सर्व नियम कायदे रद्द करुन स्वतंत्र महाराष्ट्रात 1965 पासून या नगरपालिकेच्या बाबतीत नविन नियमावली तयार करण्यात आली.

- महाराष्ट्रातील नगरपरिषदांचा कारभार १९९४ साली सुधारित महाराष्ट्र नगरपरिषद कायद्याप्रमाणे चालतो. या कायद्याप्रमाणे पंचवीस हजारांहून कमी लोकसंख्या नसलेल्या स्थानिक क्षेत्रांना 'नागरी क्षेत्र' असे घोषित करण्यात येते. लोकसंख्येच्या प्रमाणानुसार नागरी क्षेत्रांचे ३ वर्ग करण्यात आले आहेत. महाराष्ट्रात एकूण २२३ नगरपरिषदा आहेत. जत (सांगली) नगरपरिषद स्थापन करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे.

१. एक लाखांहून अधिक लोकसंख्या असलेले 'अ' वर्ग नागरी क्षेत्र

२. ४०००० हून अधिक परंतु एक लाखापेक्षा कमी असलेले 'ब' वर्ग नागरी क्षेत्र

३. ४०००० किंवा त्याहून कमी लोकसंख्या असलेले 'क' वर्ग नागरी क्षेत्र

- वरील ३ प्रकारच्या क्षेत्रांमध्ये 'अ', 'ब' आणि 'क' दर्जाच्या नगर परिषदा स्थापन करण्यात आल्या आहेत. डोंगरी भागात, थंड हवेच्या ठिकाणी लोकसंख्येचे बंधन न घालता नगर परिषदा स्थापन करण्यात येतात. त्यांना स्वतंत्र दर्जा दिलेला असतो.

| सध्या महाराष्ट्रामध्ये | |
|---|---|
| 1 | चिखलदरा |
| 2 | खुल्ताबाद |
| 3 | महाबळेश्वर |
| 4 | माथेरान |
| 5 | पाचगणी |
| 6 | पन्हाळा |
| या ६ थंड हवेच्या ठिकाणी नगरपरिषदा आहेत. | |

❖ तरतूद :–

- महानगरपालिका, नगरपरिषद अधिनियम 1965 नुसार निर्मिती.

- नगरपालिका स्थापन करण्यासाठी लोकसंख्या हा निकष तर आहेच त्याचबरोबर कृषीशिवाय रोजगार ३५% पेक्षा जास्त असणे आवश्यक आहे.

Reliable Academy 9222283909

❖ **रचना :–** ज्या शहरांची लोकसंख्या 25,000 पेक्षा जास्त असेल व 5,00,000 पेक्षा कमी असेल तेथे नगरपालिका स्थापन केली जाते.

❖ **सदस्यसंख्या :–** 17 ते 65
अनामत रक्कम सर्वसाधारण – १००० रु.
अनु.जाती / जमाती – ५०० रु.

❖ **नगरपरिषदेचे प्रकार व सदस्यसंख्या :–**

| लोकसंख्या | वर्ग | सदस्य संख्या |
|---|---|---|
| 1) 30,000 – 40,000 | 'क' | 17 ते 23 |
| 2) 40,000 – 1,00,000 | 'ब' | 23 ते 37 |
| 3) 1,00,000 – 5,00,000 | 'अ' | 38 ते 65 |

**सद्यस्थिती :–** 222 नगरपरिषदा.
सध्या महाराष्ट्रात 222 नगरपरिषदा आहेत. अपवादात्मक परिस्थितीमध्ये थंड हवेच्या ठिकाणी महाराष्ट्र शासनाने नगरपरिषदांना लोकसंख्येची अट न घालता मंजुरी दिली आहे. माथेरान, महाबळेश्वर, पाचगणी, चिखलदरा, पन्हाळा, खोपोली, खुल्ताबाद, सातपुर (जि. नाशिक)

❖ **निवडणूक पद्धती :**
- नगरपालिकांच्या मतदार संघाला 'वार्ड म्हणतात, जिल्हाधिकारी हे वॉर्ड पाडतात.
- प्रत्यक्ष, प्रौढ व गुप्त मतदान पद्धतीने निवड होते.
- बैठका एका वर्षात १२ बैठका घेणे आवश्यक.
- हिशोब तपासणी – नगरपालिकेची हिशोब तपासणी स्थानिक निधी लेखापालाद्वारे होते.

❖ **कार्यकाल (सदस्य) : –** 5 वर्षे
महिला सदस्यांना 50 % आरक्षण.

❖ **राजीनामा :–** नगराध्यक्षाकडे.

❖ **नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष :–**
नगराध्यक्ष व उपाध्यक्ष हे नगर परिषदेचे पदाधिकारी असतात. परिषदेचे निर्वाचित सदस्य आपल्यापैकी एकाची अध्यक्ष म्हणून व अन्य एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात. या पदाधिकाऱ्यांची निवड अडीच वर्षांसाठी केली जाते.
नगराध्यक्ष हा नगरपालिकेचा राजकीय कार्यकारी प्रमुख असतो.

❖ **पात्रता :**
- वयाची 21 वर्षे पूर्ण केलेली असावी.
- ती व्यक्ती नगरपालिकेचा सदस्य असावा.
- राज्य निवडणूक आयोगाने वेळोवेळी ठरविलेल्या अटी मान्य केलेल्या असाव्यात.
- 2001 नंतर 3 रे अपत्य नसावे.
- पूर्वी नगराध्यक्षाची निवड प्रत्यक्ष मतदानांनी केले जात असे. 2006 पासून बंद करण्यात आली.

❖ **निवड प्रक्रिया :–** या अगोदर ही प्रक्रिया : 1974 व 2001 – 02 मध्ये 2016 नंतर हा तिसरा प्रयोग आहे.
नगर अध्यक्ष – प्रत्यक्ष जनतेमधून निवडला जातो.

❖ **नगराध्यक्ष (आरक्षण) :–** मतदान यंत्रावर गुलाबीरंग नगराध्यक्षसाठी तर निळा, पांढरा आणि हिरवा सदस्यांसाठी, खाली नोटांचा पर्याय असतो. या पदांसाठी महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गांसाठी आरक्षण असून ती पदे त्यांना नियमानुसार क्रमाने प्राप्त होतात.

❖ **कार्यकाल :–** $2\frac{1}{2}$ वर्षे

❖ **राजीनामा :–**
- उपनगराध्यक्ष –– नगराध्यक्षाकडे    नगराध्यक्ष –– जिल्हाधिकाऱ्याकडे

Reliable Academy 9222333999

## ❖ वेतन

| | | |
|---|---|---|
| 'अ' वर्ग | 2000 रू. महिन्याचे | 5000 रू. वार्षिक अतिथी भत्ता |
| 'ब' वर्ग | 1,500 रू. महिन्याला | 4,500 रू. अतिथी भत्ता |
| 'क' वर्ग | 1,000 रू. महिन्याला | 2,500 रू. वार्षिक अतिथी भत्ता |

### अविश्वासाचा ठराव

- नगरपरिषदेच्या एकूण सदस्यांपैकी 1/3 सदस्यांनी लेखी मागणी केल्यास नगराध्यक्ष व उपनगराध्यक्षावर अविश्वासाचा ठराव येतो.
- हा ठराव 3/4 सदस्यांनी मंजूर केल्यास नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष यांना पदावरून पायउतार व्हावे लागते.
- पहिले 2 वर्षे अविश्वासाचा ठराव मांडता येत नाही.
- हा ठराव फक्त एकदाच मांडता येतो.

### नगराध्यक्षांची अधिकार व कार्ये

- शहराचा प्रथम नागरिक या नात्याने प्रतिनिधित्व करणे व शहरात येणाऱ्या सन्मानीय व्यक्तींच्या सत्कार करणे.
- पहिली सभा बोलविण्याचा आधिकार आहे. जो अगोदर जि. आ. असे.
- मुख्याधिकाऱ्यांच्या कार्यावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
- नगरपालिकेच्या वित्तीय व कार्यकारी प्रशासनावर तसेच कर्मचाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे, आवश्यक ती माहिती मागवणे ती तपासणे.
- जिल्हाधिकारी व राज्यशासनाला वेळोवेळी अहवाल पाठवणे.

### नगरपरिषदेच्या समित्या

- एकूण : ७
- ७ वी महिला व बालकल्याण समिती (१९९२) पासून कार्यरत
- नगरपालिकेच्या स्थायी समितीला सुकाणू समिती असे म्हणतात.
- नगरपालिकांच्या सभासदांना नगरसेवक म्हणतात.
- ३ लाखापेक्षा अधिक लोकसंख्येच्या नगरपरिषदेमध्ये प्रभाग समितीची स्थापना केली जाते. [कलम २४३(५)(२) ]

### स्थायी समिती (Standing Comitee) व इतर विषय समित्या

- सार्वजनिक बांधकाम समिती
- शिक्षण समिती
- आरोग्य समिती
- पाणीपुरवठा व जल निस्सारण समिती
- नियोजन व विकास समिती
- महिला व बालकल्याण समिती

**स्थायी समिती (Standing Comitee) :**

- नगरपालिका तसेच विषय समित्यांच्या कार्यात सुसूत्रता साधण्याचे कार्य स्थायी समिती करते.
- स्थायी समितीचा पदसिद्ध अध्यक्ष नगराध्यक्ष असतो.

**सदस्य – 9**

स्थायी समितीची बैठक महिन्यातून एकदा होणे गरजेचे आहे.

**स्थायी समितीची कार्ये :–**

- नगरपालिकेच्या करारांना संमती देणे.
- नगरपालिकेच्या अर्थसंकल्पाची छाननी करणे.
- निधी व गुंतवणूक विषयक निर्णय घेणे.
- लेखापालाची कार्य पध्दती ठरवणे.
- आपल्यापैकी एकाची ($2\frac{1}{2}$ वर्षे) अध्यक्ष म्हणून निवड केली जाते.

**उत्पन्न :–**

(1) घरपट्टी, कर , वाहतूक कर, बाजार कर, यात्राकर, जकात कर, स्थानिक व्यवसाय कर (Local Business Tax)
(2) जमिनीची विक्री व हस्तांतरण करून कर्ज उभारणी केली जाते.
(3) सरकारी अनुदान

Reliable Academy 9922333999

| नगरपरिषदेची कार्ये | |
|---|---|
| नगर परिषद अनेकविध स्वरुपाची कामे पार पाडते, त्या कामांचे दोन गटात वर्गीकरण केले जाते. | |
| **आवश्यक कामे** | **ऐच्छिक कामे** |
| • पाणीपुरवठा<br>• सार्वजनिक रस्ते व पूल बांधणे, त्यांची देखभाल करणे व दिवाबत्तीची सोय करणे.<br>• सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता<br>• बाजाराची व्यवस्था व त्यावर नियंत्रण<br>• जन्म–मृत्यूंची नोंदणी, स्मशानभूमीची व्यवस्था<br>• प्राथमिक शिक्षण<br>• अग्निशमन यंत्रणा<br>• बांधकाम परवाने देणे व कर वसूल करणे | • माध्यमिक शाळा, ग्रंथालये, दवाखाना स्थापन करणे.<br>• सार्वजनिक बागा, नाटयगृहे उपलब्ध करुन देणे.<br>• शहराचे सुशोभिकरण, वृक्षारोपण आणि पर्यावरण संरक्षण करणे |

❖ **मुख्याधिकारी :–**

मुख्याधिकारी नगरपालिकेचे प्रशासकीय प्रमुख असतात, तसेच ते नगरपालिकेचे पदसिद्ध सचिव असतात.

मुख्याधिकारी हे नगरपालिका व राज्यशासन यांमधील दुवा म्हणून कार्य करतात.

| | |
|---|---|
| तरतूद | महानगरपालिका, नगरपरिषद अधिनियम 1965 नुसार. |
| निवड | MPSC |
| नियुक्ती | राज्यशासन |
| कार्यकाल | 3 वर्षे |
| वेतन | राज्यशासन |
| राजीनामा | जिल्हाधिकाऱ्याकडे |

❖ **मुख्याधिकाऱ्याची कार्ये :–**

१. नगरपालिकेच्या हद्दीतील विविध कर गोळा करणे.
२. नगरपालिकेचा अर्थसंकल्प तयार करुन नगरपालिकेच्या स्थायी समितीसमोर सादर करणे.
३. नगरपालिकेच्या विकास निधीमधून पैसे काढून ते विविध विकास कामांवर खर्च करणे.
४. नगरपालिकेच्या वर्ग –३ व ४ च्या कर्मचाऱ्यांना रजा देणे.
५. नगरपालिकांच्या विविध विकास कामांवर तसेच अधिकार व कर्मचाऱ्यांवर नियंत्रण ठेवणे.
६. नगरपालिकेचे अभिलेखे, अहवाल व नोंदणी पुस्तके सांभाळणे.
७. सभेचा इतिवृत्तांत लिहिणे.

# नगरपंचायत

❖ **नगर पंचायत :-**

महाराष्ट्रातील शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांचा सर्वात कनिष्ठ स्तर म्हणून नगर पंचायतीकडे पाहिले जाते. 'महाराष्ट्र नगर परिषद, नगर पंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५' अन्वये महाराष्ट्रातील नगर पंचायतींचा कारभार चालविला जातो. तथापि, या अधिनियमामध्ये वेळोवेळी सुधारणा व बदल करण्यात आलेले आहेत. १९९२ पूर्वी लहान शहरांमध्ये 'टाऊन एरिया कमिटी' आणि 'अधिसूचित क्षेत्र समिती' या स्थानिक संस्था कार्यरत होत्या. ७४ वी घटनादुरुस्ती करुन या दोन संस्थांऐवजी 'नगर पंचायत' या शहरी स्थानिक संस्थेची तरतूद भाग ९ 'अ' च्या कलम २४३ (Q) मध्ये केलेली आहे. ग्रामीण भागाचे शहरी भागात रुपांतर होण्याच्या स्थितीत (संक्रमणकालीन) कार्यरत असणारी संस्था म्हणजे नगर पंचायत होय. सध्या नगरपंचायती १५०+ जास्त आहेत.

## रचना

- लोकसंख्येच्या आधारावर नगर पंचायतीतील सदस्य संख्या निश्चित केले जाते. राज्य निवडणूक आयोगाच्या सहकार्याने व सल्ला मसलतीने जिल्हाधिकारी नगर पंचायतींच्या मतदारसंघांची म्हणजे वॉर्डाची निर्मिती करतो. ७४ व्या घटनादुरुस्ती कायद्यातील कलम २४३ (R) मध्ये नगर पंचायतीची रचना पुढीलप्रमाणे स्पष्ट केलेली आहे :
  १. प्रौढ व गुप्त आणि प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे नगर पंचायतीतील सर्व सदस्यांची निवड केली जाईल.
  २. नागरी प्रशासनाचा अनुभव किंवा या क्षेत्राचे विशेष ज्ञान असलेल्या २ तज्ज्ञ सदस्यांची नियुक्ती राज्य सरकार करु शकते. मात्र अशा सदस्यांना पंचायतीच्या बैठकीत मतदान करण्याचा अधिकार नाही.
  ३. संबंधित नगर पंचायतीच्या क्षेत्रातून निवडून आलेले संसद आणि राज्य विधिमंडळाचे सदस्य हे नगर पंचायतीचे पदसिध्द सदस्य असतात. त्यांना पंचायतीच्या बैठकांमध्ये मतदानाचा अधिकार नसतो.
- अशाप्रकारे, नगर पंचायतमध्ये निर्वाचित, नामनिर्देशित आणि पदसिध्द असे एकूण ३ प्रकारचे सदस्य असतात. अध्यक्ष, उपाध्यक्ष हे राजकीय पदाधिकारी तर कार्यकारी अधिकारी हा नगर पंचायतीचा प्रशासकीय प्रमुख असतो.

Reliable Academy 9922333999

❖ सभासद :

नगर पंचायतीमध्ये सर्वसाधारण ९ ते २० या दरम्यान सभासद/सदस्य असतात. ही सभासद संख्या निर्वाचित प्रतिनिधींची आहे. यामध्ये नामनिर्देशित आणि पदसिध्द सभासदांची गणना केली जात नाही.

| नगर पंचायतीचा सदस्य होण्यासाठी पुढील पात्रता पूर्ण करावी | | |
|---|---|---|
| | १ | तो उमेदवार भारताचा नागरिक असावा. |
| | २ | त्याने वयाची ३१ वर्षे पूर्ण केलेली असावीत. |
| | ३ | राज्याच्या लोकसभा वा विधानसभेच्या मतदार यादीत त्याचे नाव नोंदविलेले असावे. |
| | ४ | ती व्यक्ती शासकीय सेवेत कार्यरत असू नये. |
| | ५ | फौजदारी गुन्हयांमध्ये तिला शिक्षा झालेली नसावी. |

❖ आरक्षण :

- नगर पंचायतीमध्ये पुढील समाजघटकांना आरक्षण दिले जाते :-

१. अनुसूचित जाती आणि जमातींना त्या क्षेत्रातील त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणात काही जागा आरक्षित ठेवल्या जातात. त्यांपैकी ५० टक्के जागा त्याच संवर्गातील महिलांसाठी आरक्षित ठेवल्या जातात.

२. महाराष्ट्र शासनाने इतर मागासवर्गीयांना २७ टक्के आरक्षण लागू केले आहे. त्यापैकी ५० टक्के जागा त्याच संवर्गातील महिलांसाठी राखीव ठेवल्या जातात.

३. वरील जागांशिवाय एकूण निर्वाचित जागांपैकी ५० टक्के जागा महिलांसाठी आरक्षित केल्या आहेत.

## अध्यक्ष आणि उपाध्यक्ष

नगर पंचायतीच्या अध्यक्षाला पुढील कार्ये पार पाडावी लागतात.

१. नगर पंचायतीची बैठक बोलाविणे व तिचे अध्यक्षस्थान भूषविणे.
२. पंचायतीच्या आर्थिक व प्रशासकीय कारभारावर नियंत्रण ठेवणे.
३. पंचायतीच्या कार्यकारी अधिकाऱ्यांच्या कामकाजावर नियंत्रण व देखरेख ठेवणे.
४. नगर पंचायत कायद्याद्वारे शासनाने वेळोवेळी सोपविलेली कार्ये पार पाडणे.
५. अध्यक्षांच्या गैरहजेरीत उपाध्यक्ष वरील कार्ये पार पाडतो.

| नगरपंचायतीचा कार्यकाल व बरखास्ती | नगरपंचायतीचा कार्यकाल व बरखास्ती |
|---|---|
| सर्वसाधारणपणे नगर पंचायतीचा कार्यकाल ५ वर्षे इतका आहे. परंतु अकार्यक्षमता, कर्तव्ये पार पाडण्यात टाळाटाळ, सत्तेचा दुरुपयोग आणि आर्थिक पेचप्रसंग या कारणांपैकी कोणत्याही एका कारणामुळे राज्य सरकार संबंधित नगर पंचायत मुदतीपूर्व बरखास्त झाल्यापासून ६ महिन्यांच्या आत पुन्हा निवडणुका घेणे बंधनकारक आहे. | नगर पंचायतीच्या प्रशासकीय प्रमुखास कार्यकारी अधिकारी म्हणतात. शिवाय तो, नगर पंचायतीचा सचिव म्हणूनही कार्यरत असतो. त्याची निवड राज्यशासनाकडून होते. नगर पंचायतीचे निर्णय तो अंमलात आणतो. |

## नगरपंचायतीची कामे

नगर पंचायतीच्या कार्याचे आवश्यक आणि ऐच्छिक कार्ये असे वर्गीकरण केले जाते.

| आवश्यक कामे | ऐच्छिक कामे |
|---|---|
| पुढील कार्ये नगर पंचायतीला पार पाडावीच लागत असल्याने त्यांना आवश्यक कार्ये म्हणतात.<br>१. पाणी पुरवठयाची व्यवस्था करणे.<br>२. रस्त्यावर दिव्यांची सोय करणे. सार्वजनिक गटारे साफ करणे, स्वच्छता ठेवणे.<br>३. सार्वजनिक आरोग्य आणि स्वास्थ्य राखणे.<br>४. विवाह, जन्म-मृत्यू यांची नोंद ठेवणे. | नगर पंचायतीचे उत्पन्न अधिक असेल तर ती पुढील कार्ये ऐच्छिक स्वरुपात करु शकते.<br>१. प्राथमिक शाळा, दवाखाने, वाचनालये स्थापन करणे व ती चालविणे.<br>२. यात्रांचे आयोजन व व्यवस्थापन करणे.<br>३. बाग-बगिचे व मनोरंजनाची इतर साधने उभारणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे.<br>• याशिवाय आर्थिक विकास आणि सामाजिक न्यायासाठी आराखडे, योजना तयार करणे, राज्य सरकारने १२ व्या अनुसूचीतील काही विषय हस्तांतरित केले असतील तर त्यांची कार्यवाही करण्याचे मुख्य कार्यदेखील नगर पंचायतींना करावे लागते. |

Reliable Academy 9922233999




### उत्पन्नाची साधने

नगर पंचायतीला पुढील स्त्रोतांच्या आधारे उत्पन्न मिळते.
१. नगर पंचायतीची स्थावर मालमत्ता
२. परवाना फी, बांधकाम कर, पाणीपट्टी आणि व्यापार-व्यवसाय तसेच इतर कर
३. घेतलेले कर्ज
४. केंद्र सरकार आणि राज्यशासनाकडून मिळणारे अनुदान

### नगर पंचायतीवर नियंत्रण :

नगर पंचायतीवर राज्य शासनाचे संपूर्ण नियंत्रण असते. नगर संचालक व जिल्हाधिकारी यांच्यामार्फत हे नियंत्रण ठेवले जाते. तिच्या कार्याचे पर्यवेक्षण करणे, तिने संमत केलेले ठराव रोखून धरणे, विशिष्ट कार्याच्या अंमलबजावणीसाठी आदेश देणे आणि नगर पंचायत तहकूब करणे याद्वारे तिच्यावर नियंत्रण ठेवले जाते.

### औद्योगिक नगर वसाहत प्राधिकरण :

- १९४७ पासून भारतात सार्वजनिक उपक्रमातील प्रमुख उद्योगांसाठी नगर वसाहती स्थापन करण्याचे कार्य सुरु आहे. ग्रामीण नागरी संबंध समितीने या नगर वसाहतीचे वर्गीकरण खालीलप्रमाणे केलेले आहे.

१. एकच उद्योग असलेली नगर वसाहत उदा. रुरकेला, भिलाई वगैरे
२. बहुसंख्य उद्योग असणाऱ्या नगर वसाहती उदा. दुर्गापूर
३. लहान नगर वसाहत. उदा. हेवी इलेक्ट्रिकल्स लि.
४. या औद्योगिक नगर वसाहतींची वैशिष्टये पुढीलप्रमाणे -
५. या नगर वसाहती पूर्णपणे नियोजनबध्द आखणी केलेल्या असतात.
६. नागरी सुविधा आणि इतर सोयींची गुणवत्ता अधिक उच्चतरपणे राखली जाते.
७. या सर्व सेवा आणि सुविधा पुरविण्यासाठी तेथील उद्योगव्यावसायिक निधी उपलब्ध करुन देतात.
८. अशा नगर वसाहतींमध्ये रोजगाराच्या अनेक संधी असल्याने लोक त्याकडे आकर्षित होतात.

- ७४ वी घटनादुरुस्ती करुन औद्योगिक नगर वसाहत स्थापन करण्याचे अधिकार राज्य शासनाला दिलेले आहेत.
- या तरतुदींमुळे नवीन सुधारणा करुन महाराष्ट्र शासनाने आपल्या अधिनियमाचे नाव –'महाराष्ट्र नगर परिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगर अधिनियम, १९६५' असे केले आहे. औद्योगिक सहकारी संस्था किंवा औद्योगिक विकासमंडळाने निर्माण केलेल्या औद्योगिक वसाहतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करण्याचा अधिकार संबंधित राज्यशासनाला आहे.
- नवीन सुधारणेनुसार, औद्योगिक वसाहतींसाठी कलम ३४१ (F) नुसार 'औद्योगिक वसाहत प्राधिकरण' स्थापन करता येते.
- यामध्ये अध्यक्ष आणि अन्य ५ सभासद असतात. त्यांपैकी जिल्हाधिकारी एकाला नामनिर्देशित करु शकतात. उर्वरित सदस्य महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, औद्योगिक सहकारी संस्था आणि संबंधित क्षेत्रातील उद्योगांच्या संघाकडून नामनिर्देशित केले जातात.

### ❖ नगरपाल :

- नगरपालीची निवड शासकीय यंत्रणेमार्फत होते. हे पद महापौरानंतर येते.
- दरवर्षी २० डिसेंबरला नगरपालीची नियुक्ती केली जाते.

| कार्य | | |
|---|---|---|
| १.राष्ट्रपती, पंतप्रधान, विदेश प्रमुख यांसारख्या अतिमहत्त्वाच्या व्यक्तींच्या स्वागतासाठी उपस्थित राहणे त्यांचा सत्कार करणे. | २.सार्वजनिक सभा आयोजित करणे. | ३.सर्वोच्च, उच्च व दिवाणी न्यायालयाने जारी केलेल्या सर्व वॉरंटाची प्रोसेसची कार्यवाही करणे, सत्र न्यायालयातील साथीदारांना समन्स बजावणे. |

Reliable Academy 9222332999

### नागरी स्थानिक संस्थांबद्दल इतर महत्त्वाची माहिती

- नगरपालिकेच्या उत्पन्नपैकी ५५% उत्पन्न कर रुपाने मिळते.
- राज्य सरकारकडून नगरपालिकांना शेती विरहित उत्पन्नाच्या ७५% व शेतसाऱ्याच्या १५% अनुदान मिळते.
- मुंबई महानगरपालिका १७७३ मुंबई मध्ये स्थापन करण्यात आली.
- महापौर परिषद महाराष्ट्रात सर्वप्रथम नागपूर येथे स्थापन झाली होती.
- महानगरपालिकेतील लोकलेखासमितीचा पदसिद्ध अध्यक्ष हा विरोधी पक्षाचा नेता असतो.
- नगरपालिकेचा मुख्याधिकारी हा गटविकास अधिकारी या दर्जाचा असतो.
- नगरपालिकेच्या सदस्यांनी सभेची मागणी केल्यास १५ दिवसांच्या आत सभा बोलवता येते.
- महानगरपालिकेच्या खर्चापैकी ५-७ % खर्च बांधकामावर होतो.
- १२-२ % खर्च पाणीपुरवठयावर होतो, ५-९ % खर्च जलनिस्सारण व मलनिस्सारण यावर होतो.
- महानगरपालिका आयुक्ताने दरवर्षी ३१ जुलैपूर्वी पर्यावरण परिस्थिती विषयक अहवाल महानगरपालिकेसमोर ठेवणे आवश्यक आहे.

## कटक मंडळे (लष्करी छावण्या) Contonment Board

❖ **कन्टोन्मेंटच्या निवडणुकीसाठी 'नोटा' चा पर्याय रद्दबातल :-**

संरक्षण खात्याच्या आदेशानुसार प्रिन्सिपल डायरेक्टर ऑफ डिफेन्स इस्टेटने २३ डिसेंबर २०१४ रोजी तिन्ही बोर्डाच्या अधिकाऱ्यांना पत्र पाठवून देशभरातील कन्टोन्मेंटच्या निवडणुकीत ईव्हीएम (EVM- Electronic Voting Machine) वरील नोटाचा पर्याय वाढून टाकण्याच्या सूचना दिल्या आहेत.

त्यामुळे कॅन्टोन्मेंट बोर्डाच्या निवडणुकांमध्ये नोटाच्या अधिकारापासून मतदारांना वंचित रहावे लागणार आहे.

## महाराष्ट्रातील कटक मंडळे

PUNE CANTONMENT BOARD
कर्तव्यं ददाति सिध्दिः।
**पुणे**

CANTONMENT BOARD Kamptee ESTD 1835 सत्यमेव जयते
**कामठी**

Cantonment Board Deolali
**देवळाली**

ESTD. 1958 CANTONMENT BOARD, DEHUROAD
**देहूरोड**

KCB ESTD.1817 CANTONMENT BOARD KIRKEE
**खडकी**

आमचे ध्येय समृद्ध जनजीवन AURANGABAD CANTONMENT BOARD
**औरंगाबाद**

AHMEDABAD CANTONMENT BOARD ADDING QUALITY TO LIFE
**अहमदनगर**

- **महाराष्ट्रामध्ये** - देहू, खडकी, पुणे कॅम्प (सर्व पुणे जिल्हा), अहमदनगर, देवळाली (नाशिक), औरंगाबाद आणि कामठी (नागपूर) या ७ ठिकाणी छावणी मंडळे आहेत.
- ब्रिटिशांनी १९२४ साली संमत केलेल्या 'कॅन्टॉन्मेंट अधिनियमानुसारच' या कटक मंडळांचा कारभार चालतो.
- स्वातंत्र्यपूर्व काळात या मंडळामध्ये ब्रिटीश सदस्यांचेच पूर्ण वर्चस्व होते. स्वातंत्र्यानंतर या मंडळांचा आढावा घेण्यासाठी भारत सरकारने १९५३ साली एस. के. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती नेमली.

Reliable Academy 9422233099

- समितीच्या शिफारशींवरुन सध्या, छावणी मंडळामध्ये सैनिकी व नागरी सदस्यांचे समसमान प्रमाण करण्यात आले आहे. लोकसंख्येच्या आधारे छावणी मंडळाचे पुढील प्रकार पाडले जातात.

१. १०००० पेक्षा जास्त नागरी लोकसंख्या असणारी 'प्रथम श्रेणी कटक मंडळे'
२. किमान २५०० आणि कमाल १० हजार नागरी लोकसंख्या असणारी 'द्वितीय श्रेणी कटक मंडळे'
३. २५०० पेक्षा कमी नागरी लोकसंख्या असणारी 'तृतीय श्रेणी कटक मंडळे'

- सैनिक ज्या ठिकाणी वास्तव्य करतात त्या प्रदेशाला छावणी वा कटक मंडळे म्हणतात. कँटॉन्मेंट याचा अर्थ सैनिक तुकडयांचे तात्पुरते मुक्काम स्थान होय. सैनिकांना सोयी-सुविधा पुरविणाऱ्या क्षेत्रात वास्तव्य करणाऱ्या इतर नागरी लोकांचा समावेशही यामध्ये केला जातो.
- भारत, पाकिस्तान आणि बांग्लादेशातही छावणी मंडळ हा शहरी स्थानिक स्वशासनाचा एक भाग मानण्यात आला आहे. परंतु, ही संस्था इतर स्थानिक शासनांपेक्षा फार भिन्न आहे. तिच्या काही वैशिष्टयांवरुन ही बाब स्पष्ट होते.

## छावणी मंडळाची वैशिष्टये

१. सैनिकी प्रशासनाचाच एक भाग म्हणून कार्यरत असते.
२. या संस्थांना निवडणुकीचे तत्त्व फारच मर्यादित प्रमाणात लागू असते.
३. तिला एक सामान्य मुद्रा असते.
४. ती स्वायत्त असते. त्यांचे नियमन भारत सरकारच्या संरक्षण खात्याकडून केले जाते.
५. लोकसंख्येच्या आधारावर तिचे ३ प्रकार पाडले जातात.
६. तिला स्वत:ची मालमत्ता प्राप्त करता येते, सांभाळता येते आणि तिची विल्हेवाटही लावता येते.

## छावणी मंडळाची कार्ये

नगरपरिषदांपेक्षा छावणी मंडळांना जास्त अधिकार असतात. त्यांची कार्ये पुढीलप्रमाणे :

| आवश्यक कामे | ऐच्छिक कामे |
|---|---|
| १. मोडकळीस आलेल्या इमारती नष्ट करणे.<br>२. सार्वजनिक रस्ते व दिवाबत्ती यांची सोय करणे व त्याची व्यवस्था पाहणे.<br>३. सार्वजनिक ठिकाणे, गटारे व नाल्यांची साफसफाई करणे.<br>४. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे.<br>५. सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य सुविधा पुरविणे.<br>६. जन्म-मृत्यूची नोंद ठेवणे.<br>७. प्राथमिक शाळा स्थापन करणे व चालविणे.<br>८. स्मशान, दफनभूमीची व्यवस्था करणे.<br>९. अग्निशमन दलाची व्यवस्था करणे.<br>१०. धोकादायक व गुन्हेगारीस प्रोत्साहन देणाऱ्या व्यापार, व्यवसायाला प्रतिबंध करणे.<br>११. महत्त्वाची सार्वजनिक बांधकामे करणे. | १. सार्वजनिक बांधकामे करणे.<br>२. साथींच्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी उपाययोजना करणे.<br>३. सार्वजनिक वाहतुकीची सोय करणे.<br>४. शिरगणना करणे.<br>५. विद्युत पुरवठयाची सोय करणे.<br>६. विविध प्रकारची सर्वेक्षणे करणे.<br>७. अस्वच्छ वस्त्यांचे पुनर्वसन करणे. |

## छावणी मंडळांची रचना

तर उल्लेख केल्याप्रमाणे सध्या छावणी मंडळांच्या रचनेत लष्करी व नागरी सदस्यांचे संतुलन साधले आहे. तथापि, छावणी मंडळाच्या श्रेणीनुसार त्यातील सदस्यांची संख्या बदलते. साधारणपणे, प्रथम श्रेणी कटक मंडळात एकूण १५ सदस्य असतात. त्यांपैकी ८ सदस्य नामनिर्देशित तर ७ सदस्य निर्वाचित असतात.

**(१) नामनिर्देशित सदस्य :** छावणीचा मुख्य लष्करी अधिकारी, जिल्हाधिकाऱ्याकडून नामनिर्देशित प्रथम वर्ग दंडाधिकारी (एक), छावणीचा आरोग्य अधिकारी, छावणीचा कार्यकारी अभियंता, याशिवाय मुख्य लष्करी अधिकाऱ्याकडून ४ सैनिक अधिकारी नामनिर्देशित केले जातात.

**(२) निर्वाचित सदस्य :**प्रौढ व गुप्त मतदानाद्वारे मतदारांकडून ७ सदस्य निवडले जातात.

त्या मंडळातील लष्कराचा मुख्य अधिकारी हा मंडळाचा अधक्ष असतो तर निर्वाचित सदस्यांतून एकाची उपाध्यक्षपदी निवड केली जाते. नामनिर्देशित सदस्य जोपर्यंत त्या क्षेत्रात पदावर कार्यरत असतात तोपर्यंत ते मंडळावर कार्यरत असतात. निर्वाचित सदस्यांचा कार्यकाळ मात्र ३ वर्षांचा असतो. देशातील ६३ छावणी मंडळामध्ये २००८ सालापासून ३३ टक्के महिला आरक्षण कायदा लागू करण्यात आला. मंडळाच्या नियमांनुसार महिला आरक्षण हे रोटेशन पध्दतीने करण्यात येते

Reliable Academy 9822333999

| उत्पन्नाची साधने | |
|---|---|
| करापासून मिळणारे उत्पन्न | कराव्यतिरिक्त मिळणारे उत्पन्न |
| इतर स्थानिक संस्थांप्रमाणे कटक मंडळांनादेखील कर आकारुन, कर गोळा करुन उत्पन्न मिळते. परंतु, असे कर लावण्यापूर्वी त्यास केंद्र सरकारची पूर्वपरवानगी आवश्यक असते. | यामध्ये विविध योजनांसाठी केंद्र सरकारकडून कटक मंडळांना मिळणाऱ्या निधीचा समावेश होतो. |

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगर कायद्यातील तरतुदींनुसार कॅबिनेट मंत्र्याकडे येणाऱ्या सुनावण्याचा व्याप कमी करण्यासाठी कॅबिनेट मंत्र्यांच्या या अधिकाराचे विकेंद्रीकरण करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. कॅबिनेट मंत्र्यांचे अधिकार राज्यमंत्री आणि सचिवांना मिळतील. मात्र हे अधिकार कॅबिनेट मंत्र्यांच्या परवानगीने वापरता येतील.

## इतर शहरी स्थानिक स्वराज्य संस्था

नगर पंचायत, नगर परिषदा आणि महानगरपालिका या ३ प्रमुख शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांशिवाय अन्य काही प्रकारच्या संस्था अत्यंत मर्यादित प्रमाणात राज्यात आढळून येतात. ती पुढीलप्रमाणे :

| | |
|---|---|
| (१) टाऊनशिप | या प्रकारच्या नागरी संस्थेची निर्मिती ही प्रामुख्याने शासकीय औद्योगिक प्रकल्पांच्या आणि शहरी वस्त्यांच्या जवळ केली जाते. आसपासची स्थानिक संस्था किंवा प्रशासनाकडून तिचा कारभार पाहिला जातो. औद्योगिक प्रकल्पांकडून तिला साहाय्य केले जाते. |
| (२) पोर्ट ट्रस्ट | ज्या शहरांना समुद्रकिनारा लाभलेला आहे व त्या शहरांचे वेगळे महत्त्व आहे. अशा ठिकाणी त्या शहरांचे व्यवस्थापन, संरक्षण आणि नागरिकांना सुविधा पुरविण्यासाठी पोर्ट ट्रस्टची स्थापना केली जाते. संसदेच्या अधिनियमाद्वारे त्यांची निर्मिती होत असून भारतात मुंबई, मद्रास, कोलकाता या ठिकाणी त्यांची निर्मिती केलेली आहे. यामध्ये कटक मंडळांप्रमाणे नामनिर्देशित आणि निर्वाचित अशा दोन्ही प्रकारचे सदस्य असतात. व्यापारी तत्त्वावर तिचे कार्य चालते. |
| (३) विशिष्ट हेतू अभिकरण | या प्रकारातील नागरी संस्थांची निर्मिती ही क्षेत्र आधारित केली जात नाही तर ती विशिष्ट कार्याधारित केली जाते. म्हणजे मोठया किंवा महत्त्वपूर्ण शहरांमध्ये विविध कार्य पार पाडण्यासाठी काही विशेष अभिकरणांची (एजन्सी) निर्मिती केली जात असते. उदा. शहर विकास प्राधिकरण, गृह निर्माण मंडळ, पाणी पुरवठा व मल:निस्सारण मंडळ, विद्युत वितरण मंडळ वगैरे |
| (४) राजपत्रित क्षेत्र समिती | शहरी वस्ती असणाऱ्या पण त्यांना नगर पालिकांचा तात्काळ दर्जा देता येत नाही, मात्र तेथील नागरिकांना पायाभूत नागरी सुविधा पुरविणे अत्यावश्यक आहे, अशा ठिकाणी राज्यपालाच्या संमतीने क्षेत्र समित्या स्थापन केल्या जातात. सध्या, या समित्या पंचायतराज व्यवस्थेत विलीन करण्यात आल्या आहेत. |
| (५) नगर क्षेत्र समिती | लहान शहरांच्या प्रशासकीय सोयीसाठी नगर क्षेत्र समित्या स्थापन केल्या जातात. त्यांचे स्वरुप निम नगरपालिका प्राधिकरणाप्रमाणे असते. त्यांना मर्यादित पण पायाभूत असे कार्य पार पाडावे लागते. राज्यविधिमंडळाच्या अधिनियमाद्वारे त्यांची निर्मिती केली जाते. |

Reliable Academy 9922233999

# 6. मुलकी प्रशासन

1) महसूल अधिनियम 1966 नुसार महाराष्ट्रात मुलकी प्रशासनाची तरतूद आहे.
2) 1960 मध्ये 4 महसूल विभाग आणि 26 जिल्हे होते.
3) सध्या राज्यात प्रशासकीय सोयीच्या 7 महसूल विभाग आणि 6 प्रशासकीय विभाग आहेत.

| 6 प्रशासकीय विभाग | | |
|---|---|---|
| 1) | अमरावती विभाग | वाशीम, यवतमाळ, बुलढाणा, अकोला, अमरावती. |
| 2) | नागपूर विभाग | वर्धा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर. |
| 3) | मुंबई (कोकण) विभाग | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रायगड, सिंधूदुर्ग, रत्नागिरी. |
| 4) | नाशिक विभाग | नंदुरबार, धुळे, जळगाव, अहमदनगर, नाशिक. |
| 5) | औरंगाबाद विभाग | हिंगोली, जालना, उस्मानाबाद, औरंगाबाद. |
| 6) | पूणे विभाग | सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, पूणे. |

- ➢ नांदेड (प्रस्तावित) – लातूर, नांदेड, परभणी, बीड.
- ➢ नांदेड हा महसूल विभाग आहे पण प्रशासकीय नाही.

## ❖ 26 जिल्हयांमधून इतर जिल्हयांची निर्मिती :–

| | |
|---|---|
| 1) रत्नागिरी – सिंधुदुर्ग –1981 | 6) अकोला – वाशीम –1998 |
| 2) औरंगाबाद – जालना –1981 | 7) धुळे – नंदूरबार –1998 |
| 3) उस्मानाबाद – लातूर –1982 | 8) परभणी – हिंगोली –1999 |
| 4) चंद्रपूर – गडचिरोली –1982 | 9) भंडारा – गोंदिया –1999 |
| 5) मुंबई – मुंबई उपनगर –1990 | |

### ❖ प्रस्तावित जिल्हे :–

1) बीड – आंबेजोगाई
2) ठाणे – ठाणे उपनगर + ठाणे शहर
3) पूणे – बारामती
4) अहमदनगर – श्रीरामपूर

# विभागीय आयुक्त : (Divisional Commisioner)

**तरतूद**

जमिन महसूल अधिनियम 1966 नुसार प्रत्येक प्रशासकीय विभागासाठी एक विभागीय आयुक्त असावा तो अधिकारी ण्।ैण् सेवेतील वरीष्ठ अधिकारी असावा.त्यांची निवड केंद्रीय लोकसेवा आयोगाद्वारे केली जाते. परंतु ज्या घटकराज्यात त्यांची बदली होईल त्या राज्यांच्या राज्यशासनानुसार या अधिकाऱ्यांना कार्य करावे लागते. याचे वेतन आणि भत्ते केंद्र सरकारच्या नियमांवर ठरवून दिलेले असले तरी घटकराज्याच्या राज्यसंचित निधीतून त्यांचे वेतन दिले जाते. विभागीय आयुक्त हे संबंधित विभागाचे प्रशासकीय अधिकारी असतात. आपल्या विभागात कायदा व सुव्यवस्था राखण्याचे कार्य त्यांना करावे लागते. आपल्या विभागात विभागीय नियोजन मंडळाचे ते पदसिध्द उपाध्यक्ष असतात.

| निवड | नेमणूक | नियुक्ती |
|---|---|---|
| UPSC | राज्य सरकार | प्रत्येक विभागात 3 वर्षासाठी |

Reliable Academy 9222333999

## कार्ये

- नेमून दिलेल्या (प्रादेशिक) प्रशासकीय विभागाचा सर्वोच्च प्रशासक व महसूल अधिकारी असतो.
- जिल्हाधिकाऱ्याच्या निर्णयावर अपिलामध्ये पूनर्निर्णय देणे. पंचायत संस्था, नगरपरिषदा व महानगरपालिका यांच्या संदर्भात विशेष अधिकार.
- विभागीय सर्व जिल्हा प्रशासनाचा अहवाल तपासणे.जमिनदारी पद्धतीवर अंकुश ठेवून गावातील पडीक जमिनीचे मागासवर्गीयांमध्ये वाटप करणे.
- विभागातील विविध यंत्रणांकडून माहिती मागवून, अहवाल तपासून राज्यशासनास अहवाल देणे जिल्हाधिकाऱ्यांवर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
- आपल्या विभागीय जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार इ. अधिकाऱ्यांच्या कार्यावर नियंत्रण ठेवणे ही महत्वाची जबाबदारी विभागीय आयुक्ताला करावी लागते. हे विभागीय आयुक्त आपल्या कार्याबाबत राज्य शासनाला जबाबदार असतात.

# जिल्हाधिकारी : (Collector)




- भारतात गव्हर्नर जनरल वॉरन हेस्टिंग्ज याने १७७२ ला जिल्हाधिकारी हे पद निर्माण केले.
- नियंत्रण – विभागीय आयुक्त
- जिल्हाधिकारी हा जिल्हा आमसभेचा सचिव असतो.

| तरतूद | निवड | नियुक्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| जमिन महसूल अधिनियम 1966 नुसार कलम 7 मधील उपकलम 1 नुसार I.A.S. सेवेतील अधिकारी. | UPSC | राज्यशासन | जिल्हा |

**जिल्हाधिकारी कार्यालयाचे तीन भागात विभाजन केले जाते**

1) महसूल गोळा करणारा विभाग (Revnue Department)
2) कायदा व सुव्यवस्था (Law & Order Department)
3) नागरी सुविधा पुरवणारा भाग(ब्भअपस)
4) प्रशासन

## कार्ये

- जिल्हाधिकारी हा संबंधित जिल्हयाचा दंडाधिकारी असतो. (महसूल निगडीत गुन्हयासाठी दंड आकारू शकतो)
- जिल्हयातील महसूल गोळा करणे.
- पिकांची आणेवारी प्रशासनाला कळवणे.
- जिल्हा निवडणूकीच्या काळात, जिल्हा निवडणूक अधिकारी, जनगणनेच्या काळात, जिल्हा जनगणना अधिकारी अशी कामे तो करतो.
- निवडणूक काळात जिल्हयातील मतदारांच्या यादया बनवणे.
- मुंबई कुळ वहिवाट व शेतजमीन अधिनियम 1948 नुसार मालमत्तेदार कोर्टाची कामे पार पाडणे.
- प्रांताधिकारी / उपजिल्हाधिकारी, तहसीलदार यांच्यावर नियंत्रण.
- जिल्हाधिकारी कार्यालयावरील कर्मचारी यांवर देखरेख व नियंत्रण.
- जिल्हयातील खजिना व स्टॅम्प (मुद्रांक) फिस (Fees) याचे रक्षण करणे.
- जिल्हा प्रशासनाचा अहवाल तयार करणे.
- पंचायत राज व नगरपालिकासंदर्भात विशेष अधिकार.
- जिल्हा प्रशासनाचा अहवाल तयार करणे.
- जिल्हयात येणाऱ्या मंत्री व वरिष्ठ यांचा दौरा निश्चित करणे.
- जिल्हाधिकारी हा जिल्हादंडाधिकारी असतो.
- पोलिसांच्या मदतीने गुंडांना पकडणे व तडीपार करणे.
- सभाबंदी व शस्त्रबंदी इ. जाहीर करणे.
- दुष्काळ पडला तर शेतकऱ्यांचा एका वर्षापर्यंतचा शेतसारा माफ करू शकतो.
- जिल्हा नियोजन व विकास मंडळाचा सचिव.

Reliable Academy 9222333999

### कार्ये

- रोजगार हमीचा जिल्हा स्तरावरील प्रमुख.
- जिल्हाधिकारी या नात्याने संचारबंदी लागू करणे.
- जिल्हयातील विविध प्रमाणपत्रांचे वितरण करणे.
- जिल्हास्तरावरील तुरुंगातील कैद्यांची मुदत पूर्व सुटका करणे, तुरुंगाची तपासणी करणे.

## उपजिल्हाधिकारी

| तरतूद | निवड | नियुक्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 प्रमाणे कलम 7. | UPSC | राज्यशासन | उपविभाग (काही तालुक्यांचा मिळून बनलेला भाग) |


- ➢ जर (I.A.S) अधिकारी तात्पुरत्या स्वरूपात (Training) अधिकारी अशी नेमणूक असल्यास त्याचे वेतन राज्यशासन देते.
- ➢ उपविभागीय अधिकारी (SDO)/प्रांताधिकारी

### कार्ये

- तहसीलदार कार्यालयावर देखरेख व नियंत्रण ठेवणे.
- प्रांतातील (दोन – तीन तालुक्यांचा १ प्रांत) निवडणूक व जनगणना अधिकारी म्हणून कार्य करणे.
- तालुक्याच्या प्रशासनावर नियंत्रण व देखरेख ठेवणे.
- उपजिल्हाधिकारी जिल्हाधिकाऱ्यास जबाबदार असतात.
- जिल्हाधिकारी व तहसीलदार यांच्यातील दुवा.
- उपविभागात कायदा व सुव्यवस्था राखणे.
- सरकारी आदेशाची अंमलबजावणी करणे.

**महत्त्वाचे :– उपजिल्हाधिकारी पोलीस पाटलाची नियुक्ती व बडतर्फी करतात.**

## तहसीलदार




Reliable Academy 9222333999

| तरतूद | निवड | नियुक्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 नुसार कलम 7 अन्वये प्रत्येक तालुक्यासाठी 1 तहसीलदार व 1 किंवा अधिक नायब तहसीलदार. | UPSC | राज्यशासन | उपविभाग (काही तालुक्यांचा मिळून बनलेला भाग) |

- काही पदे नायब तहसीलदारातून पदोन्तीने भरली जातात. – 25%
- तालुका पातळीवर महसूल प्रशासनाचा प्रमुख तहसीलदार असतो. दर्जा – Class I

### कार्ये

- मुंबई कुळ वहिवाट शेतजमिन अधिनियम 1948 नुसार मालमत्तेदाराचे अधिकार प्राप्त होतात.
- तालुक्यात शांतता व सुव्यवस्था राखणे.
- तालुका दंडाधिकारी या नात्याने कार्य पाहणे.
- नायब तहसिलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांच्यावर नियंत्रण.
- अधिकारपत्रांचे स्थानांतरण घोषित करणे.
- शेतजमिन व बिगर शेतजमिन (Non Agricultural)घोषित करतो. ही घोषणा तात्पुरत्या स्वरूपाची असते.
- तालुक्यातील पिकांची आणेवारी काढणे.
- कोतवालाची नेमणूक करणे.
- सर्वे नंबरच्या सरहद्दी ठरवतो.
- निवडणूकीच्या काळात मतदार यादया तयार करणे व सहाय्यक नोंदणी अधिकारी म्हणून काम पाहतो.
- रेशनकार्डाचे वाटप.
- तालुका स्तरावर रोजगार हमी प्रमुख.
- तालुका आमसभेचा प्रमुख.
- समन्स (Summons)काढण्याचा अधिकार व ते न पाळल्यास 50 रू. दंड आकरण्याचा अधिकार.
- सिमेंट व अन्नधान्य यांचा पुरवठा.
- कुटुंब कल्याण योजना राबवण्यासाठी विशिष्ट प्रयत्न करणे.
- हंगामी पोलीस पाटलांची नेमणूक करणे.
- तहसीलदार, उपजिल्हाधिकाऱ्यांना जबाबदार असतो.

# तलाठी

❖ **तरतूद :–** महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम 1966 नुसार कलम 7(3).
दर्जा – महसूल खात्याचा वर्ग – ३चा कर्मचारी
१९१८ साली राजर्षी शाहू महाराजांनी कुलकर्णी वतने रद्द करुन तलाठी हे पद निर्माण केले.
तलाठीच्या कार्यालयास 'सज्जा' असे म्हणतात.
तलाठयास शिक्षा करण्याचा अधिकार उपजिल्हाधिकारी किंवा प्रांतअधिकारी यांना असतो.

❖ **निवड – जिल्हा निवड मंडळ**
अलिकडच्या काळात संबंधित जिल्हाधिकाऱ्याकडून MKCL मार्फत अर्ज मागवले जातात व निवड प्रक्रिया राबवली जाते.

❖ **नेमणूक व बडतर्फी –** जिल्हाधिकारी

❖ **नियंत्रण –** तहसीलदार

❖ **नजिकचे नियंत्रण मंडळ –** मंडळ अधिकारी

❖ पूर्वी कर गोळा करण्याचे काम कुलकर्णी यांच्याकडे असे कालांतराने यात बदल होऊन पगारी तलाठी नेमण्यात आले

❖ **कार्ये :–**

- जिल्हाधिकाऱ्याने वेळोवेळी ठरवून दिलेली नोंदणी पुस्तके, अभिलेख (Records)जपून ठेवणे.
- तहसीलदार, पोलीस अधिकारी यांच्या सांगण्यानुसार नोटीसा बजावणे.
- मरणोत्तर चौकशीचे इतिवृत्तांत लिहिणे.

Reliable Academy 9222333999

- मृत्यूपूर्व जबानी फौजदारी प्रकरणात घेणे व तपासकार्यात मदत करणे.
- गावातील नोंदीचे उतारे देणे. उदा. 7/12, 8 अ चा उतारा.
- गावातील पिक–पाण्याची नोंद ठेवणे.
- साथीच्या रोगाची माहिती अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्याला पाठवणे.
- पिकांची आणेवारी काढणे व कोतवालावर नियंत्रण ठेवणे.

# कोतवाल

❖ नेमणूक –तहसीलदार (PSI किंवा PI च्या पूर्वसंमतीने)
❖ नजिकचे नियंत्रण – तलाठी
❖ कोतवालाची संख्या ही लोकसंख्येवर अवलंबून असते. मात्र एखादया गावी एकाहून अधिक कोतवाल नेमण्याचा अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्याला असतो.

1000 पर्यंत – 1 1000 ते 2000 – 2 2000 ते 3000 – 3

| पात्रता | कोतवालाची कार्ये |
|---|---|
| • वय – किमान – 18, कमाल – 40<br>• उमेदवार किमान ४ थी उत्तीर्ण असावा<br>• कोतवालापदी निवड होण्यासाठी कुळ कायद्यामध्ये कमाल जमीन धारणेपेक्षा जास्त जमिन असता कामा नये.<br>• 100 रू. तारण (Deposit) व 2 जामीन दयावे लागतात. | • वरिष्ठ अधिकाऱ्यांचे दफ्तर कार्यालयात ने–आण करणे.<br>• गावात दवंडी पिटवणे.<br>• गावातील जन्म, मृत्यू व विवाह यांच्या संदर्भातील माहिती ग्रामसेवकास देणे.<br>• गावात घडलेल्या गुन्हयासंदर्भात पोलीस पाटलांना माहिती देणे.<br>• गावात दवंडी पिटवून सरकारी आदेश जाहीर करणे.<br>• पोलीस पाटलांनी कैद केलेल्या रखवालीतील कैद्यावर पहारा ठेवणे. त्याचबरोबर कोंडवाडयातील जनावरावर पहारा ठेवणे.<br>• पोलीस पाटील, तलाठी व ग्रामसेवक यांच्या कामात मदत करणे.<br>• आवश्यक तेव्हा गावकऱ्यांना चावडी व सज्ज येथे बोलवणे. |

| इतर महत्त्वाचे | कोतवालाला रजा |
|---|---|
| • कोतवाल हा पूर्णवेळ काम करणारा चौथ्या श्रेणीतील ग्रामनोकर आहे.<br>• कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने कोतवालावर नियंत्रण पोलीस पाटील ठेवतो.<br>• कोतवालाला पदावरून काढण्याचे अधिकार तहसीलदाराला आहे. | • 8 दिवसांची किरकोळ रजा मंजूर करण्याचे अधिकार तलाठयास आहे.<br>• कोतवालास अर्जित (30) रजा तहसीलदार मंजूर करतो. वैद्यकिय (20)<br>• कोतवालास दर 6 महिन्याला 15 किंवा वर्षाला 30 दिवस अर्जित रजा मंजूर होऊ शकते.<br>• कोतवालाच्या रजेच्या काळात शेजारच्या गावचा कोतवाल त्याचे काम पाहतो.<br>• कोतवालास वयाची 60 वर्षे पूर्ण होईपर्यंत पदावर राहता येते.<br>• वेतन – 5000 रू. |

# पोलीस पाटील

महाराष्ट्र पोलीस अधिनियम 1967 नुसार कलम 7(3) पोलीस पाटलाची नियुक्ती केली जाते.
पोलीस पाटील आपल्या कार्याबद्दल तहसीलदारास जबाबदार असतो.
बॉम्बे सिव्हील ॲक्ट - १८५७ नुसार हे पद निर्माण करण्यात आले.
महाराष्ट्र मुलकी पोलीस अधिनियम १९६७ नुसार वंशपरंपरागत मिळणारे हे पद रद्द करण्यात आहे.

❖ नेमणूक – उपजिल्हाधिकारी/प्रांताधिकारी
❖ वय–25 ते 45 वर्षे,
❖ पात्रता :–

- कमीत कमी 10 वी पास (पूर्वी 4 थी पास), अपवादात्मक 7 वी पास.

Reliable Academy 9422333999

- जर संबंधित गावात वरील शिक्षणाची अट पूर्ण करणारा उमेदवार नसेल तर शेजारच्या गावच्या उमेदवाराची पोलीस पाटीलपदी नियुक्ती करण्यासाठी विभागीय आयुक्तांची परवानगी घ्यावी लागते.
- पोलीस पाटीलपदी नियुक्ती होण्यासाठी प्रथम गावातील मागासवर्गीय व्यक्तींना प्रथम प्राधान्य दिलेजाते. (मतदारयादीत नाव असले पाहिजे)

❖ **कार्यकाल :–** सुरूवातीला 5 वर्षासाठी, 5 पटीत वाढवली जात असे व तो 60 वर्षापर्यंत पदावर राहू शकतो.
आता ही निवड 10 वर्षाच्या पटीत वाढवली जाते.

❖ **बडतर्फीचे अधिकार :–** उपजिल्हाधिकारी / प्रांताधिकारी

❖ **पोलीस पाटलाची कार्ये :–**
- गावपातळीवर कायदा व सुव्यवस्थेच्यादृष्टीने बंदोबस्त राखणे.
- गुन्हयाची खबर पोलीस स्टेशनला देणे.
- विनापरवाना शस्त्र बाळगणाऱ्याकडून शस्त्र काढून घेणे.
- नैसर्गिक आपत्ती व संसर्गजन्य रोग पसरल्यास त्या संबंधीचा अहवाल वरिष्ठांना देणे.
- गावात अनैसर्गिक अथवा संशयास्पद मृत्यू झाल्यास तालुकादंडाधिकारी (तहसीलदार) व संबंधित पोलीस अधिकारी यांना खबर देण्याची जबाबदारी पोलीस पाटलावर असते.
- कोतवाल या ग्रामनोकराकडून कामे करून घेण्याची जबाबदारी पोलीस पाटलावर असते.

❖ **पोलीस पाटलाच्या रजा :–**
- 8 दिवसाची किरकोळ रजा मिळते.
- इतर रजा नसतात.
- शासनाच्या इतर सुविधा मिळत नाहीत पण अटीची पूर्तता केल्यास मुलांना मोफत शिक्षण मिळते.
- रजेच्या काळात शेजारच्या गावचा पोलीस पाटील काम करतो.

❖ **इतर महत्त्वाचे :–**
- पोलीस पाटलास पूर्णवेळ दुसरी नोकरी करता येत नाही. पण शेती मात्र करू शकतो.
- पोलीस पाटील पूर्णवेळ शासकीय नोकर नसल्यामुळे एखादे पद सहकरी संस्थामध्ये त्याला धारण करता येते.

➢ अलीकडे महाराष्ट्र शासनाने पोलीस पाटील हे पद भरताना स्पर्धा परीक्षेमार्फत भरले जाते.
➢ घेतल्या जाणाऱ्या स्पर्धापरीक्षाद्वारे मागासवर्गीय उमेदवारास प्राधान्य दिले जाते.

Reliable Academy 9222333999

# 7. पोलीस प्रशासन

## तरतूद


- घटनेतील 249 या कलमानुसार राज्यात पोलीस प्रशासनाची निर्मिती करण्यात आली.
- अंतर्गत शांतता व सुव्यवस्था हा विषय राज्यसूचीत येतो.
- पोलीस महानिरीक्षक हे पद पूर्वी सर्वोच्च मानले जात. परंतु त्यात बदल घडवून आता पोलीस महासंचालक हे पद सर्वोच्च मानले जाते.
- पोलीस महासंचालक हे पद 1982 पासून निर्मित करण्यात आले आहे.
- महाराष्ट्राचे पोलीस मुख्यालय पूर्वी 'पुणे' येथे होते. आता 'मुंबई' या ठिकाणी आहे. (1957 पासून)
- महाराष्ट्रात सध्या 10 पोलीस आयुक्तालय, परिक्षेत्रे, राज्य राखीव दलाच्या तुकडया

## महाराष्ट्र पोलीस प्रशासन

- गुन्हे अन्वेषण विभाग (CID- Crime Investigation Department)
- स्थापना – 1904
- मोटार वाहन कार्यशाळा.
- रेल्वे पोलीस
- पोलीस प्रशिक्षण
- बिनतारी संदेश यंत्रणा

### ❖ पोलीस प्रशासनाची 8 परिक्षेत्रे, पुढीलप्रमाणे :–

- नाशिक परिक्षेत्र – नाशिक (ग्रामीण), जळगाव, धुळे, नंदुरबार, अहमदनगर
- अमरावती परिक्षेत्र – अमरावती (ग्रामीण), अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ
- नागपूर परिक्षेत्र – नागपूर (ग्रामीण), वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व गोंदिया
- औरंगाबाद परिक्षेत्र – औरंगाबाद (ग्रामीण), जालना, बीड, उस्मानाबाद
- नांदेड परिक्षेत्र – नांदेड, हिंगोली, परभणी, लातूर
- ठाणे परिक्षेत्र – ठाणे (ग्रामीण), रायगड, रत्नागिरी, सिंधूदुर्ग
- कोल्हापूर परिक्षेत्र – पुणे (ग्रामीण), सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर
- रेल्वे परिक्षेत्र (2000 पासून ) – पुणे, मुंबई, नागपूर
- परिक्षेत्र– शहर (आयुक्तालय)(C.P.)
- ग्रामीण (पोलीस अधीक्षक कार्यालय)(S.P.)




Reliable Academy 9222333099

**महाराष्ट्र पोलीस खात्याची संरचना**

पोलीस महासंचालक (DGP)
⇩
अतिरिक्त महासंचालक (17 पदे)
⇩
विशेष पोलीस महानिरीक्षक Special IGP महसूल आयुक्त्याच्या दर्जाचे पद)
⇩
पोलीस उपमहानिरीक्षक (DIG)
⇩
सहाय्यक महानिरीक्षक (AIG)
⇩
पोलीस अधीक्षक (SP/DCP)
⇩
अतिरिक्त पोलीस अधीक्षक (Add. SP)
⇩
पोलीस उपअधीक्षक (DySP/DCP)
⇩
वरिष्ठ पोलीस निरीक्षक (Sr. PI)
⇩
पोलीस निरीक्षक (PI)
⇩
सहाय्यक पोलीस निरीक्षक (API)
⇩
पोलीस उपनिरीक्षक (PSI)
⇩
सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक (APSI)
⇩
पोलीस हवालदार (Head Constable)
⇩
पोलीस नाईक (Police Naik)
⇩
पोलीस शिपाई (Police Constable)

### ❖ शहरी पोलीस प्रशासन :–

शहरात पोलीस आयुक्ताची नेमणूक पोलीस महासंचालक करतात.
नियंत्रण – पोलीस महासंचालक

- ➢ शहराची विभागणी अनेक विभागामध्ये करतात त्यांना झोन्स (Zones) म्हणतात.
- ➢ प्रत्येक Zone साठी पोलीस आयुक्त(D.C.P.-Deputy Commisioner of Police)व सहाय्यक पोलीस आयुक्त(A.C.P.-Assistant Commisioner of Police) नेमला जातो.
- ➢ शहरी पोलीस आयुक्तांना दंडाधिकार आहेत.
- ➢ पोलीस आयुक्तालयामध्ये खालील विभाग असतात.
  - गुन्हे शाखा (Crime Branch)
  - Reserve Police
  - स्त्री पोलीस (Ladies Constable)
  - नियंत्रण कक्ष
  - Trafic कक्ष

वरील विभागातून शहरी पोलिसांचे कामकाज चालते. याशिवाय पोलिस भरती, रजा, पदोन्नती, बडतर्फी हे काम आयुक्त पाहतात.

### ❖ पोलीस आयुक्तालय :–

- मुंबई पोलीस आयुक्तास साहाय्य करण्यासाठी अतिरिक्त पोलीस आयुक्त आहेत.
- पोलीस आयुक्तालयामध्ये अनेक पोलीस ठाणी असतात. त्यांच्यावर देखरेखीसाठी पोलीस निरीक्षक व उपविभागीय अधिकारी व कर्मचारी असतात.
- श्वानपथक, छायाचित्रविभाग इ. अनेक विभाग या गुन्हाशाखेत आहेत.
- तसेच याशिवाय फिरती पोलीस पथके, विमानतळ सुरक्षा शाखा इ. स्वतंत्र शाखाही आहेत.

| | आयुक्तालय | निर्मिती वर्ष |
|---|---|---|
| 1 | मुंबई शहर | 14 / 12 / 1964 |
| 2 | पुणे शहर | 01 / 07 / 1965 |
| 3 | नागपूर शहर | 01 / 07 / 1965 |
| 4 | ठाणे शहर | 15 / 08 / 1981 |
| 5 | नाशिक शहर | 24 / 11 / 1990 |
| 6 | औरंगाबाद शहर | 19 / 10 / 1991 |
| 7 | नवी मुंबई | 01 / 11 / 1994 |
| 8 | सोलापूर | 19 / 05 / 1995 |
| 9 | अमरावती | जूलै 1997 |
| 10 | रेल्वे आयुक्तालय | 2000 |

### ❖ ग्रामीण पोलीस प्रशासन:–

- राज्य पोलीस मुख्यालय –D.G.P.
- परिक्षेत्र –Spl. I.G.P.
- जिल्हा पोलीस अधिक्षक –S.P.
- उपविभाग –D.S.P.
- पोलीस स्टेशन –Sr. P.I.
- आऊट पोस्ट –H.C.

Reliable Academy 9222333999

1) ग्रामीण पोलिस प्रशासनामध्ये परिक्षेत्रासाठी असलेले विशेष पोलिस महानिरीक्षक हे पद महसूल आयुक्ताच्या दर्जाचे आहे.
2) पोलिस अधिक्षक हे पद प्रत्येक जिल्हयासाठी 1 असे आहे.
3) जिल्हयाच्या विभागाचे उपविभाग पाडून त्या ठिकाणी क्ष्ॅण्च्णनेमला जातो.
4) उपविभागात साधारणतः 7–8 पोलिस स्टेशन येतात.
5) पोलिस स्टेशनचा प्रमुख अधिकारी वरिष्ठ पोलिस निरीक्षक (Sr.P.I.) असतो.
6) पोलिस स्टेशन अंतर्गत पोलिस निरीक्षक(A.P.I.), सहाय्यक (P.S.I.)व इतर पोलिस कर्मचारी असतात.
7) पोलिस स्टेशनचे विभाग पाडून Cut Post तयार करतात.
8) पोलिस स्टेशनपासून साधारणतः 7–8 कि.मी. वर ही Cut Post असते. या ठिकाणी हवालदार व जमादार असतात.
9) जिल्हयात साधारणतः 20–30 पोलिस स्टेशन असतात. जिल्हा पोलिस प्रशासन खालीलप्रमाणे काम करतात.

- ❑ गुन्हे अन्वेषण (C.I.D.)
- ❑ गुप्त वार्ता विभाग
- ❑ स्त्री पोलिस
- ❑ हत्यारी पोलीस
- ❑ बिनतारी संदेश यंत्रणा
- ❑ वाहतूक कक्ष
- ❑ मोटार वर्कशॉप
- ❑ नियंत्रण शाखा
- ❑ गुन्हे शाखा

## गुन्हे अन्वेषण (C.I.D.)




- यात काम करणाऱ्यांच्या रजा, बदल्या, पदोन्नती इ. कामे व ही सर्व व्यवस्था पोलीस आयुक्त हे पोलीस महासंचालक व महानिरीक्षक यांच्या नियंत्रणाखाली पाहतात.
- सर्वोच्च पद – विशेष पोलीस महानिरीक्षक (Sp.I.G.P.)
- गुन्हे अन्वेषण विभागात अंगुली मुद्रा (थ्पदहमत च्तपदज) या विभागाचे काम चालते.
- अलिकडे Finger Print Department चे कामकाज आधुनिक पद्धतीने चालते.
- 1958 मध्ये पोलिस तपास अधिक वेगाने होण्यासाठी न्याय वैदयकीय प्रयोगशाळा (Foreignsic Lab) मुंबई येथे स्थापन करण्यात आली. उपशाखा– पुणे, नागपूर, औरंगाबाद.

## स्त्री पोलीस



- जिल्हयाच्या ठिकाणी स्त्री पोलीस पथके असून त्यांची रचना पुढीलप्रमाणे असते.
  १. निरीक्षक
  २. उपनिरीक्षक
  ३. शिपाई
- कुंटणखाने व वैश्या वस्ती यातील लहान मूलींची व स्त्रियांची सूटका करणे. मोर्चे, सभा यातील स्त्रियांचा बंदोबस्त करणे, रेल्वे स्टेशन व यात्रा या ठिकाणी होणाऱ्या महिलांच्या गैरसोयी दूर करणे.
- 1955 साली पहिल्यांदा मुंबई प्रांतात स्त्री पोलिसांची नेमणूक.
- स्त्रीयांच्या संदर्भातील गुन्हे व त्यांची चौकशी करणे.
- स्त्री आरोपीस अटक करणे, स्त्री कैदयांची ने–आण करणे.

Reliable Academy 9222333999

# बिनतारी संदेश यंत्रणा

- पोलिस प्रमुख महासंचालक पोलिस स्टेशनमध्ये बिनतारी संदेश यंत्रणा कार्यान्वित झाली आहे.
- दंगल, नैसर्गिक आपत्ती व गुन्हेगार पकडण्यासाठी.

# जिल्हा पोलीस अधिक्षक

- पोलीस अधिक्षकला मदत करण्यासाठी अतिरिक्त पोलीस अधीक्षक असतात.
- जिल्हा – पोलीस अधिक्षक
- उपविभाग - उपविभागीय पोलीस अधिकारी
- पोलीस ठाणे - पोलीस निरीक्षक / उपनिरीक्षक
- दुरक्षेत्रे - हेड कॉन्स्टेबल
- मुख्यालयात ४०० ते १००० हत्यारी पोलीस शिपाई असतात.
- कारागृहावर पहारा देणे, मालमत्तेची सुरक्षा, कैद्यांची ने-आण करणे इ. अनेक कामे पोलीसांना करावी लागतात.




# राज्य राखीव पोलीस बल

- या दलातील पोलीसांना लष्कराप्रमाणे शिक्षण दिले जाते.
- प्रत्येक गटाला बिनतारी संदेश यंत्रणा, वाहने, रुग्णालये इ. सुविधा आहेत.
- दंगलीच्या वेळी किंवा आणीबाणीच्या प्रसंगी राज्य सशस्त्र राखीव दलाचे गट हे पोलीसांना मदत करतात. अशापैकी त्यांना लगेच पाचारण करण्यात येते.
- 1991 च्या कायदयाने राज्य राखीव पोलीस बल (SRPF- State Reserve Police Force) ची निर्मिती.
- सर्वोच्च पद Sp. I.G.P.(विशेष पोलिस महानिरीक्षक)
- प्रत्येक गटामध्ये एक Commandant लमादेशक असतो.
- महाराष्ट्रात सध्या 14 S.R.P.F. आहे.
- 14 वा गट औरंगाबाद या ठिकाणी स्थापन झाला आहे. त्याचे नाव– भारत राखीव बटालियन(I.R.B.)
- आता राज्य राष्ट्रीय गट 16 आहेत.

# होमगार्ड

- स्थापना –१९४६, मुंबई
- नैसर्गिक आपत्ती, तसेच दंगली, अग्निशमन ३ ठिकाणी देण्यात येणाऱ्या सेवेत नागरी संरक्षण दलाचा केंद्रबिंदु म्हणून होमगार्ड कार्य करते.
- महाराष्ट्रात ही स्वतंत्र संघटना असून 'महासमादेशक' (कमांडन्ट जनरल) हा होमगार्डचा प्रमुख असतो.
- भरती –३ वर्षांसाठी (निष्काम सेवा हा करार करुन)
- भारतीय पोलीस सेवेतील उच्चाधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी कार्यरत केंद्रे :-

१. लाल बहादुर शास्त्री राष्ट्रीय अकादमी मसूरी
२. सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय अकादमी, हैदराबाद

Reliable Academy 9222333999

चालु घडामोडी मासिके, अभ्यासक्रम, सराव प्रश्नपत्रिका, नोकरी संदर्भ, विषयावरील महत्त्वाच्या PDF साठी आमच्या संकेत स्थळाला भेट द्या.

www.reliableacademy.com

3 Year Course for Under Graduate

Personality Development

Memory Techniques Course

**मुख्य वैशिष्टये**

१) अनुभवी व तज्ञ प्राध्यापक (मुंबई-पुणे-औरंगाबाद-नाशिक)
२) दर्जेदार व अद्यावत नोट्स
३) सर्व स्पर्धापरीक्षेची पुस्तके व मासिके वाचनास मोफत उपलब्ध
४) पूर्व आणि मुख्य परीक्षाभिमुख सराव चाचण्या
५) मुलाखातीसाठी तज्ञ अधिकाऱ्यांचे मार्गदर्शन
६) स्पर्धापरीक्षेचे फॉर्म मोफत भरुन दिले जातील.
७) २४ तास सुसज्ज A/C लायब्ररी (मुले व मुलींसाठी स्वतंत्र)
८) शालेय पुस्तकांवर आधारीत सराव परिक्षा

**Features:**

- Expert Faculty
- Online Exam Practice
- Projector Presentations
- Qualititative Materials
- 200 Update Test Series Topicwise online / off Line
- 24*7 A/C Library
- Maths & Reasoning Tricks
- Personal Attention
- Interview Guidance
- CCTV Surveillance
- AC Class Room
- Personality Development
- Memory Technique Course
- Committed to Result

DOWNLOAD OUR ANDROID APP. AVAILABLE ON PLAY STORE

MPSC OFFICERS

BANK OFFICERS

**संपूर्ण मार्गदर्शन**

१) राज्यसेवा पूर्व व मुख्य परीक्षेची तयारी कशी करावी?
२) PSI/STI/ADO पूर्व व मुख्य परीक्षेची तयारी कशी करावी?
३) प्रत्येक विषयाचा अभ्यास कोणत्या पध्दतीने करावा?
४) सराव परीक्षांमध्ये कशाप्रकारे सुधारणा करावी?
५) अभ्यासाचे वार्षिक नियोजन कसे असावे?
६) वर्तमानपत्र वाचन व चालू घडामोडीची तयारी कशी करावी?
७) आगामी काळातील परीक्षेची एकत्रित तयारी करते वेळी कोणती काळजी घ्यावी?

Join Us :

@mpscofficers | @mpscofficers | 9222333999 | @Reliable Academy

## Kalyan (Head Office)

- 5th Floor, C.J.Joshi Complex, Above Vodafone Store, Opp. Railway reservation counter, Kalyan (W)

## Kalyan (Library)

- Near Vaman Hari Pethe Jewellers, Shivaji Chowk, Kalyan (W)

## Nashik (Office)

- Suyojit Avdhoot Tower, Below Vikhe Patil Bank, Dongre Vastigruh,Old Gangapur Naka, Nashik

## Nashik (Library)

- 2nd Floor, Shraddha Sankul Building, Nr.Vihar Hotel, Old Gangapur Naka, Gangapur Road, Nashik

## Parbhani

- Saraswati Complex, Near State Bank Of Hyderabad, Vasantrao Naik, Marathwada University Area, Vasmat Road, Parbhani.

Email : thereliableacademy@gmail.com

# 9222333999

Reliable Academy 9222333999